तळपती तलवार... : नारायण सुर्वे । योद्धा साहित्यिक : अण्णा भाऊ साठे
साहित्यातील अंगार : अमर शेख । सुरेश भट : रंग ह्यांचा वेगळा...
बा. सी. मर्ढेकर : नवकवितेचे जनक । ज्ञानपीठ विजेते : विंदा करंदीकर
साहित्यातील पारिजात : मंगेश पाडगावकर । वि. वा. शिरवाडकर - कुसुमाग्रज : मराठी-भाषा-वैभव
विदुषी : दुर्गा भागवत । ग्रेस : गूढ इथले संपत नाही...
नवकथा प्रणेते : गंगाधर गाडगीळ । विजय तेंडुलकर : समाजवास्तवाचे भाष्यकार
एक दुःखार्त झाड : दया पवार । मराठी साहित्यातला अढळ तारा : नामदेव ढसाळ
महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व : पु. ल. देशपांडे

## साहित्य-सरिता...

गेल्या ५०-६० वर्षांतील; विशेषकरून १९४० ते १९८०-९० पर्यंतच्या काळातील निवडक साहित्यिकांचा परिचय करून देणारी ही पुस्तकमालिका.

ह्या साहित्यिकांची ओळख करून देताना त्यावेळचा आपला मराठी समाज, १९४२ ची 'चले जाव' चळवळ, स्वातंत्र्यलढा, १९४७ चे भारताला मिळालेले स्वातंत्र्य, त्यानंतर संयुक्त महाराष्ट्र चळवळ, अशा ऐतिहासिक ठळक घटना आपल्यासमोर ओघाने येतात. तसेच मराठी साहित्यातील नवे प्रवाह; नवकविता, नवकथा, वैचारिक वाङ्मय, विनोदप्रधान साहित्य, वंचितांची अभिव्यक्ती असलेले साहित्य असे विविध प्रवाहदेखील आपल्याला ह्या पुस्तकांतून दिसतात.

परिचयात्मक अशी ही पुस्तके आहेत. त्यांच्या साहित्याची समीक्षा नाही किंवा केवळ त्या साहित्यिकांचे चरित्र नाही. त्यांच्या साहित्याचा हा परिचय आहे. तसेच ह्या लेखकांनी लिहिलेले साहित्यही संक्षिप्तपणे ओळख होण्यासाठी यामध्ये समाविष्ट केले आहे.

*इ.स. १९६२ साली **नारायण सुर्वे** यांचा पहिला काव्यसंग्रह 'ऐसा गा मी ब्रह्म' अभिनव प्रकाशनातर्फे प्रसिद्ध झाला. 'कामगार आहे मी तळपती तलवार आहे, सारस्वतांनो! थोडासा गुन्हा करणार आहे.' असे म्हणत, साठोत्तरी मराठी कवितेची मुहूर्तमेढ रोवत, सुर्वे यांनी तत्कालीन मराठी काव्यविश्वाला चांगलाच धक्का दिला.*

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

# तळपती तलवार...
# नारायण सुर्वे

माधव जोशी



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

साहित्य-सरिता
महाराष्ट्रातील प्रमुख निवडक साहित्यिकांचा परिचय

# तळपती तलवार...
# नारायण सुर्वे

**माधव जोशी**

सहलेखिका : रूपाली शिंदे

साहित्य-सरिता

महाराष्ट्रातील प्रमुख निवडक साहित्यिकांचा परिचय

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

➢ **पुस्तकाचे नाव :** साहित्य-सरिता : महाराष्ट्रातील प्रमुख निवडक साहित्यिकांचा परिचय
तळपती तलवार.... नारायण सुर्वे

➢ **संपादक/लेखक :** माधव जोशी

➢ **प्रथमावृत्ती :** २०२६

➢ **आयएसबीएन :** ९७८-९३-९३५९९-८५-८

➢ **प्रकाशक :**

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

➢ © **प्रकाशकाधीन :**

➢ **मुद्रक :**

व्यवस्थापक,
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,
चर्नी रोड स्टेशनजवळ,
मुंबई ४०० ००४.

➢ **किंमत :** रुपये ७१/-

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# निवेदन

नमस्कार,

प्रमुख पंधरा निवडक साहित्यिकांची ओळख पंधरा पुस्तकांद्वारे करण्यात आली आहे.

या पंधराही साहित्यिकांमुळे; कवी, कथाकार, कादंबरीकारांमुळे, त्यांच्या साहित्यामुळे मराठी साहित्य-सरितेच्या प्रवाहाला वेगळे वळण प्राप्त झाले आहे. ह्या अर्थाने ह्या पंधरा साहित्यिकांची निवड ही प्रातिनिधिक स्वरूपाची आहे तशीच ती महत्त्वाची ठरते.

ह्या पंधरा साहित्यिकांचा साहित्यिक काळ ढोबळ मानाने स्वातंत्र्यपूर्व काळापासून; १९४०च्या आसपास ते १९८५ पर्यंतचा हा ४०-५० वर्षांचा कालखंड आहे. ह्या काळामध्ये मराठी समाजाच्या विश्वात अनेक उलथापालथी झाल्या. आर्थिक, सामाजिक, राजकीय स्थित्यंतरे वेगाने घडत गेली. ह्या सर्व बाह्यपरिस्थितीचे प्रतिबिंब ह्या पंधराही साहित्यिकांच्या साहित्यामध्ये आपल्याला आढळून येते. शाहीर अमर शेख आणि अण्णाभाऊ साठे यांनी त्यावेळच्या वंचित समाजाचे विशेषकरून कामगारवर्गाचे वास्तव व भेदक चित्रण केले. तसेच ह्या कामगारवर्गाच्या, मध्यमवर्गाच्या बदलत्या जाणिवा गंगाधर गाडगीळ व बा. सी. मर्ढेकर यांच्या कृतीतून आपल्याला आढळून येतील. १९६०साली महाराष्ट्र राज्याचा उदय झाला त्याच्या आसपासच्या काळामध्ये मराठी भाषेचा अभिमान बाळगावा याचा जयजयकार कुसुमाग्रजांच्या प्रेरणादायी कृतीतून आढळतो. ‘मराठीच्या दुधाची साय’ खाणारे सुरेश भट यांनी आपल्या काव्यातून मराठी भाषेचा अभिमान बाळगण्यास वाचकाला उद्युक्त केले. महाराष्ट्राचा वैचारिक वारसा आपल्याला दुर्गाबाईंच्या साहित्यातून आढळतो तसेच मराठी भाषेचे लालित्य व सौंदर्य मंगेश पाडगावकर यांच्या कृतीतून आपल्याला दिसते. कामगारवर्गाचे चित्रण डाव्या विचारांनी व्यक्त होणारे साहित्य

विंदा करंदीकरांच्या काव्यातून आढळते. तसेच पंचावन्न ते साठसत्तर या काळातील गिरणगावातील भयावह चित्रण नारायण सुर्वे करताना आढळतात. मराठी भाषेतून गूढता व्यक्त करताना कवी ग्रेस आपल्या काव्याने वेगळीच उंची गाठतात. याच काळातील शहरी मध्यमवर्गीय माणसाचे, मराठी कुटुंबाचे भेदक चित्रण विजय तेंडुलकर आपल्या विविध नाटकांद्वारे करतात. पु. ल. देशपांडे यांचे साहित्य याच काळात बहरत होते आणि विनोदाची डूब असणारे त्यांचे साहित्य जनमानसावर संमोहिनी करून गेले. याच काळातील वंचितांच्या जाणिवा तीव्रपणे व्यक्त होऊ लागल्या, याचे प्रतिनिधित्व दया पवार आणि नामदेव ढसाळ हे करतात.

या निवडक पंधरा साहित्यिकांनी मराठी साहित्य-सरिता प्रवाहित ठेवत एकूण साहित्यविश्वाला अनमोल अशी देणगी दिली आहे. ह्या निवडक साहित्यिकांच्या साहित्यामुळे मराठी साहित्य विविध अंगांनी बहरले-फुलले. अभिजात अशी साहित्यपरंपरा त्यांच्या साहित्यामुळे अधिक सशक्तपणे प्रवाहित होत राहिली आहे.

ही पंधरा पुस्तके म्हणजे या साहित्यिकांची समीक्षा नव्हे तसेच त्यांचे चरित्रही नाही. त्यांच्या साहित्यातून त्यांची ओळख व्हावी आणि त्यांच्या साहित्याचा अभ्यास करावा, त्यांचे संपूर्ण साहित्य वाचावे ही प्रेरणा मिळावी या उद्देशाने सदर पुस्तके लिहिली गेली आहेत. मराठीच्या अभ्यासकापासून ते मराठी साहित्य वाचून आनंद घेणाऱ्या वाचकापर्यंत सर्वांना ही पुस्तके उपयुक्त ठरतील.

डॉ. सदानंद मोरे
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

कामगारवर्गाला संघटित लढ्यासाठी प्रवृत्त करणाऱ्या
कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या स्मृतीस...

# मनोगत

खयाल ट्रस्टतर्फे निर्मित केलेल्या नारायण सुर्वे यांच्यावरील एक लघुपटाचा एक खेळ एनसीपीएच्या सभागृहात होता. ही गोष्ट १७-१८ वर्षांपूर्वीची. एखाद्या कवीवर लघुपट स्वयंसेवी संस्थेने निर्माण करण्याचा हा दुर्मीळ योग होता आणि नारायण सुर्वे यांचा तो सन्मानही होता.

ज्या व्यक्तीला आपला जन्म कधी झाला, आपले जन्मदाते कोण, आपण कोण, म्हणून जन्माला आलो असे महत्त्वाचे प्रश्न अनेक वेळेला भेडसावूनदेखील ती व्यक्ती एक असाधारण कवी म्हणून प्रख्यात होते... हे सर्व विलक्षण आहे. गंगाराम सुर्वे यांना हे मूल रस्त्याकडेच्या कचराकुंडीत सापडले आणि त्यांनी ह्या मुलाला आपल्या घरी आणले. नारायण हे नाव देऊन त्याचा प्रतिपाळ केला. ही घटनादेखील विलक्षण आहे. जर, तरची भाषा वापरून ही घटना घडली नसती तर काय झाले असते? एक मात्र निश्चित, मराठी साहित्य एका महान साहित्यिक कवीला, एका कार्यकर्त्याला मुकले असते.

अशा कवीचे जगणे व त्यांचे आविष्कृत साहित्य यांचा हा थोडक्यात घेतलेला धांडोळा.

नारायण सुर्वेंसारख्या साहित्यिकांची ओळख तीसुद्धा थोडक्यात व्हावी असा प्रस्ताव घेऊन मी साहित्य संस्कृती मंडळाकडे गेलो. त्यांनी ह्या प्रस्तावाचे स्वागत केले. ह्या लेखनकामात रत्ना मगरे, रूपाली शिंदे आणि कोमल दवणे यांचे मोलाचे साहाय्य झाले. प्रा. नितीन आरेकर आणि प्रा. अभिजित देशपांडे ह्यांनी महत्त्वाचे मार्गदर्शन केले. दिनेश वाडेकर यांनी मुद्रिते तपासली, ऑलरिचचे अतुल जोशी ह्यांनी सुरेख अक्षरजुळणी आणि मुखपृष्ठ व पृष्ठमांडणी केली; या सर्वांचे आभार!

सदर पुस्तक लेखनास सुर्वे यांच्यावरच्या प्रसिद्ध झालेल्या साहित्याचा मोठा आधार प्राप्त झाला. सुर्वे यांच्या साहित्याच्या पुस्तकातून काही

मजकूर संपादित स्वरुपात इथे घेतला आहे. ह्या दोन्ही प्रकारच्या पुस्तकांचे लेखक आणि प्रकाशक यांचे आम्ही ऋणी आहोत.

साहित्य संस्कृती मंडळाचे तत्कालीन अध्यक्ष श्री. बाबा भांड, सचिव मीनाक्षी पाटील आणि मंडळाचे सदस्य यांचा मी आभारी आहे. हे पुस्तक सिद्ध होण्यासाठी ज्यांनी सर्व प्रकारचे सहकार्य केले त्यांचे मनापासून आभार.

❖❖❖

- संदर्भासाठी आणि लेखकाच्या साहित्याचा परिचय होण्यासाठी घेतलेले उतारे व वाक्ये त्यांच्या मूळ मजकूर बरहुकूम राखण्याचा प्रयत्न केला आहे.

# प्रास्ताविक

नारायण सुर्वे यांनी 'डोंगरी शेत' हे पहिलं गाणं लिहिलं -

*'डोंगरी शेत माझं गं मी बेनु किती*
*आलं वरीस राबून मी मरावं किती'*

त्यातील अंगीभूत गेयतेमुळे तो लोकांच्या तोंडी बसले आणि ते लोकांचेच होऊन बसले.

इथून नारायण सुर्वे यांच्या साहित्य प्रवासाची सुरुवात झाली.

लहानपणापासून गरिबीचे चटके सहन करत करत आयुष्य पुढे नेणाऱ्या ह्या नारायण सुर्वे ह्यांनी कधीही निराशेचा, हताशेचा सूर आपल्या काव्यातून काढला नाही हे विशेष. विद्रोहाची, लढ्याची भाषा जरी त्यांच्या साहित्यांतून दिसत असली तरी ती भाषा सवंगपणे, उद्धटपणे, कांगावा करत, स्वतःच्या गरिबीचे भांडवल करणारी नव्हती आणि म्हणून नारायण सुर्वे यांचे काव्य श्रेष्ठ साहित्यमूल्याचे तर आहेच, त्याचबरोबरीने सर्वसामान्य मनुष्याला प्रेरणादायीदेखील आहे. त्यांचा प्रवास हा काहीसा 'नाहीरे' वर्गातून 'आहेरे' वर्गाकडे झालेला दिसत असला तरीदेखील त्यांच्या कवितेतील आर्तता आणि ओजस्विता तिळमात्र कमी झाली नाही. लौकिकार्थाने 'अशिक्षित' असणाऱ्या सुर्वेंच्या कवितांचे अध्ययन विद्यापीठ स्तरावर होणे यातच त्यांचे श्रेष्ठत्व कळून येते. त्यांच्या कविता 'अभ्यासविषय' होणे हा त्यांच्या कवितेचा सन्मान आहे.

साधी पण थेट भिडणारी भाषा आणि लय हे त्यांच्या काव्याचे महत्त्वाचे लक्षण आहे.

त्यांच्या सुरुवातीच्या हलाखीच्या जगण्याचे, कष्टकऱ्यांचे जगण्याचे प्रतिबिंब त्यांच्या कवितेत दिसते आणि ते स्वाभाविकही आहे.

*'थोडे साहिलेले, पाहिलेले, जोखिलेले आहे*
*माझ्या जगाची एक गंधवेणाही त्यांत आहे*

*केव्हा चुकलो, मुकलो, नवे शिकलोहि आहे*
*जसा जगत आहे मी तसाच शब्दांत आहे'*

त्यावेळच्या मर्ढेकर, विंदा करंदीकर ह्यांनी कष्टकऱ्यांचे जगणे, त्यांचे दर्शन आपल्या कवितांतून घडवले. परंतु त्यांच्या कवितेच्या शेवटी त्यांची 'देवशरणता' व्यक्त होते ती सुर्वे यांना मान्य नाही. आणि म्हणून केशवसुत, मर्ढेकर, करंदीकर यांच्या कुळातील आपण नाही असे ते स्पष्टपणे म्हणतात. या कवींच्या कवितेतील बरेचसे भाव पांढरपेशातून आलेले होते. परंतु 'त्यांच्या' काव्यातील सगळे विषय सुर्वे प्रत्यक्ष जगलेले होते. त्यामुळे वरवरची भाषा ह्या कविंच्या भाषेसारखी दिसत असली तरी ते बाहेरून आलेले, वरवरचेच वाटते. 'पाणी घे' ही कविता वाचल्यावर आणि तिचे आकलन झाल्यावर हा मुद्दा एकदम स्पष्टपणे जाणवतो.

दलित चळवळही त्यावेळी समाजात आपले स्थान मिळवती झाली होती आणि कम्युनिस्ट चळवळही जोरात, प्रभावी होती. ह्या दोन्ही विचारधारांची पकड सुर्वे यांच्यावर असली तरी ते वर्गवादी नव्हते किंवा दलित कविंसारख्या कवितांचा सारखेपणा त्यांच्या कवितेत नव्हता.

'माझे विद्यापीठ' या कवितेच्या पहिल्या ओळीत ते लिहितात -

*'ना घर होते, ना गणगोत, चालेन तेवढी पायाखालची जमीन होती*
*दुकानांचे आडोसे होते; मोफत नगरपालिकेची फुटपाथ खुलीच होती.'*

१९५६ साली सुर्वेंची पहिली कविता प्रसिद्ध झाली.

*'शेकडोवेळा चंद्र आला, तारे फुलले, रात्र धुंद झाली*
*भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली'*

१९४० सालीच सुर्वे बालकामगार म्हणून काम करू लागले होते. गिरणगावातीलच जन्म, लहानपण, नोकरी वगैरे. सगळा परिसर, त्यावेळची कामगार चळवळ आणि दलित साहित्यही उदयास येत होते या सगळ्याचा एकत्रित परिणाम त्यांच्या जीवनावर तसेच साहित्यावरही झालेला आहे. परंतु ते केवळ वर्गवादी किंवा विद्रोही कविता करणारे झाले नाहीत. त्यांचा जीवनविषयक आशावाद, समाजाविषयी असलेली आस्था आपल्याला दिसते. सतत कामात असणाऱ्या आणि काबाडकष्ट करणाऱ्या बायकोकडे पाहून नवरा हेलावतो. आता बस कर, हे काम थांबव आणि थोडी शांत बस, असे म्हणून समजावणारा नवरा 'पुरे

कर...' या कवितेत आहे. उष्टी खरकटी, साचलेला केर, घासायला पडलेली भांडी, धुणी, घरातल्यांनी काढलेली उणीदुणी सर्व बाजूला ठेवण्यास तो तिला सांगतो.

*'थोडी शांत हो,*
*बाहेरही वाढलाय गारवा*
*तूही घे विसावा;*
*डहुळलेले पाणी स्थिरावू दे,*
*आपल्यासाठी...*
*आता पुरे कर...*
*तुझा भिंगरीसारखा वावर.'*

प्रेमातील हे सामंजस्य सुर्वे यांच्या प्रेमकवितेचा कणा आहे.

त्यांच्या प्रेमकविताही अशाच सुंदर परंतु उत्कट आहेत. या कवितेकडे सर्वसाधारण त्यावेळच्या लोकांचे लक्ष गेले नाही हे स्वाभाविकच होते. कामगारवर्गातील प्रियकर प्रेयसी सगळ्यांच्या बरोबर एकेका खोलीत दहा-बारा माणसे राहणाऱ्या समाजातील आहेत. सुर्वेही त्यातलेच आहेत त्यामुळे पारंपरिक प्रेमगीते त्यांच्याकडून अपेक्षिणे हेच चुकीचे आहे. कवितेतील या चार ओळींवरून त्यांच्या कवितेतील प्रेमभाव समजून येतो.

*'माझी गा दमून निजली खुराड्यात चंद्रावळ*
*मीही शब्द जुळवित जागा आहे उशाजवळ*
*मलाही ऐकू येते आहे वाऱ्याची सळसळ*
*वेळेवर येण्याचा नियम आज सांगू नको'*

कॉ. डांगे आणि कम्युनिस्ट पक्षातील, चळवळीतील कार्यकर्ते यांच्याशी सततच्या संपर्कामुळे त्यांच्यावर डाव्या विचारसरणीचा प्रभाव न पडता तर नवलच. त्यांना वाचनाची आणि कवितेची विशेष आवड होती.

इ.स. १९६२ साली नारायण सुर्व्यांचा पहिला काव्यसंग्रह 'ऐसा गा मी ब्रह्म' अभिनव प्रकाशनातर्फे प्रसिद्ध झाला.

*'कामगार आहे मी तळपती तलवार आहे*
*सारस्वतांनो! थोडासा गुन्हा करणार आहे.'*

असे म्हणत, साठोत्तरी मराठी कवितेची मुहूर्तमेढ रोवत, सुर्व्यांनी तत्कालीन मराठी काव्यविश्वाला चांगलाच धक्का दिला. इ.स. १९६३ साली

महाराष्ट्र राज्य शासनाचा एक हजार रुपयांचा पुरस्कार या काव्यसंग्रहास मिळाला.

एकूण पाच कविता संग्रह आणि एकूण रचनांची संख्या २०२० ह्या कवितांच्या निर्मितीचा काळ तब्बल चाळीसऐक वर्षांचा; तसा दीर्घ कालावधी. तथापि त्यांच्या कवितांनी मराठी सारस्वतांचे जग हादरले. ह्याचे कारण म्हणजे कुसुमाग्रजांनी म्हटल्याप्रमाणे त्यांचे साहित्यिक ‘कूळ’ तुकाराम महाराजांच्या कुळातीलच आहे.

❖❖❖

# परिचय



'जेव्हा माणूस जन्मास येतो तेव्हा काही गोष्टी त्याला निसर्गतःच प्राप्त होतात. त्याचे शरीर, त्याचे पालक, त्याचा भवताल हे सारे निसर्गदत्त असते. तसेच त्याला मिळणारे नावही! माणसाचे नाव त्याचे पालक कोण आहेत इतकेच दर्शवीत नाही, तर त्या माणसाची सामाजिक-सांस्कृतिक मुळेही दर्शवते. माणसाचे नाव त्याची आयुष्यभराची ओळख बनते. पण एखादी व्यक्ती कुठल्याही नावाशिवाय जन्मते तेव्हा? अशा वेळी मी कोण? हा प्रश्न स्वतःला आयुष्यभर विचारीत, 'नशिबाला' दोष देत, सतत कडवटपणा बाळगत ही व्यक्ती जीवन कसे तरी ढकलेल, ही स्वाभाविक व सर्वसाधारण प्रतिक्रिया असू शकते. परंतु असा 'निनावी' भूतकाळ बाजूला सारत, वर्तमानाला सरळ भिडत, स्वकेन्द्री होण्याचे नाकारत, समष्टीला स्वतःमध्ये सामावून घेत, प्रचंड आत्मविश्वास बाळगत आयुष्य सत्कारणी लावणे, हे खचितच आव्हानात्मक आहे. हेच आव्हान स्वीकारीत, प्रचंड कष्ट आणि वेदना सहन करीत, दुर्दम्य आशावाद बाळगत, निसर्गदत्त 'अनोळखी' भूतकाळाला स्वतःची

ओळख देत एक कवी मराठी काव्यप्रांतात अर्धशतक वावरला आणि साठोत्तरी मराठी कवितेच्या अस्मितेचा एक बिनीचा शिलेदार बनला. हे कवी म्हणजे पद्मश्री नारायण गंगाराम सुर्वे.

● ● ●

त्यावेळी बहुतांश गिरण्या मुंबईच्या ताडदेव, भायखळा, नायगाव, माझगाव, रे रोड, कॉटन ग्रीन, शिवडी, परळ, चिंचपोकळी, करी रोड, वरळी, माहीम, प्रभादेवी या भागांत होत्या. यातील बराचसा भाग 'गिरणगाव' म्हणून ओळखला जायचा. ब्रिटिशांनी कापड गिरण्यांच्या या जमिनी गिरणी मालकांना दीर्घकालीन भाडेतत्त्वावर दिल्या होत्या, त्यामुळे यात सरकारचा मोठाच फायदा होता. या कापड गिरण्यांची मालकी सरकारकडे तसेच टाटा, वाडिया, डावर, ससून, करीमभॉय, ठाकरसी, खटाव, नाईक, गोकुळदास, शेख आदम, अशा पारशी, जैन, मुस्लीम, हिंदू समाजातील धनाढ्य परिवारांकडे होती. या कापड गिरण्यांमुळे निर्माण झालेल्या नोकरीच्या संधींमुळे कोकणातून तसेच देशावरून अनेक माणसे व कुटुंबे स्थलांतरित झाली, आणि यातूनच मुंबईतील औद्योगिक 'कामगार' वर्ग उदयास आला.

मुंबई शहरातील नव्याने उदयाला आलेल्या या कामगारवर्गाची स्थिती बिकट होती. बहुतांश कामगार स्थलांतरित असल्याने त्यांच्याकडे स्वमालकीची जागा अथवा जमीन नव्हती. त्यांच्या राहण्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी, तसेच भरपूर कामगार उपलब्ध व्हावेत यासाठी गिरणी मालकांनी कापड गिरण्यांच्या आसपासच या कामगारांना राहण्यासाठी चाळी बांधल्या. मात्र सरकार आणि गिरणी मालकांनी या चाळींच्या देखरेखीची कुठलीही जबाबदारी स्वीकारली नाही. या चाळींमधील खोल्या खूप लहान, वायुवीजन नसलेल्या आणि कोंदट होत्या. एकेका खोलीत दहा-बारा माणसे राहत असत. वीज नसल्याने अनेक चाळी अंधाऱ्या असत. पाणीपुरवठा, शौचालये सार्वजनिक स्वरूपाची होती. मलनिःसारण, गटारे, पाणी-पुरवठा याबाबत कुठलीही स्वच्छता आणि सुव्यवस्था नव्हती. मैला, गटारांचे पाणी रस्त्यावर वाहत असे. त्याची दुर्गंधी येऊ नये व पावसात गटाराचे पाणी घरात शिरू नये यासाठी दारे-खिडक्या बंदच असत. बरेच कामगार, विशेषतः पुरुष, नोकरी

*निसर्गदत्त 'अनोळखी' भूतकाळाला स्वतःची ओळख देत एक कवी मराठी काव्यप्रांतात अर्धशतक वावरला, आणि साठोत्तरी मराठी कवितेच्या अस्मितेचा एक बिनीचा शिलेदार बनला. हे कवी म्हणजे पद्मश्री नारायण गंगाराम सुर्वे.*

व्यतिरिक्त मिळणारा वेळ रस्त्यावरच व्यतीत करीत असत. या सर्व पार्श्वभूमीवर स्त्रियांची परिस्थिती अगदीच बिकट होत असे. पालक आपल्याच कामाच्या विवंचनेत आणि घरखर्चाची तोंडमिळवणी करण्यात व्यग्र असत. स्वतःच्या मुलांकडे पुरेसे लक्ष द्यायला वेळ मिळत नसे. एकूणच आयुष्यात 'खाजगीपणा'ची वानवाच होती.

कापडगिरण्यांत पुरुष तसेच महिला काम करीत असत. कामाचे तास निश्चित नव्हते. कधी १२, तर कधी १६ तास काम करावे लागे. हे कामाचे तास कधी कधी १८, तर कधी २३ इतकेही वाढत. गिरणी सुरू आणि बंद होण्याची देखील निश्चित वेळ नसे. रविवार आणि इतर सुट्ट्या नसत. सतत कापसाच्या तंतूंनी भरलेल्या हवेत काम केल्याने बहुतेक कामगार श्वसनविकाराने पीडित असत. अनेकांचा त्यामुळे मृत्यूदेखील ओढवत असे. कामगारवर्गाच्या प्रश्नांची तड लावण्याची, त्यास वाचा फोडण्याची गरज निर्माण होत होती. या गरजेपोटी समाजवादी आणि साम्यवादी विचारांची बैठक असणारी कामगारचळवळ मुंबई शहरात जोर धरू लागली.

इ.स. १८९० साली नारायण मेघाजी लोखंडे यांच्या नेतृत्वाखाली 'बॉम्बे मिल-हँडस असोसिएशन'ची स्थापना झाली. त्या अनुषंगाने, मोर्चे, प्रचार-सभा, बैठका, यांनादेखील सुरुवात झाली. इ.स. १९०५ साली वाढलेल्या कामाच्या दबावाविरुद्ध मुंबईतील गिरणीकामगारांनी संप पुकारला. कामगारांच्या विविध प्रश्नांसाठी संपाचे हत्यार नियमितपणे वापरले जाऊ लागले. इ.स. १९०८ साली लोकमान्य टिळक यांना अटक झाली आणि त्या विरोधात मुंबईतील कामगारवर्गाने खूप मोठा संघर्ष केला. कामगारचळवळ देशाच्या स्वातंत्र्यलढ्याशी जोडली गेली आणि व्यापक बनली. देशाच्या इतर भागांतही कामगार युनियन स्थापन होऊ

लागल्या. ऑक्टोबर १९१७ मधील रशियन राज्यक्रांतीने जगभरातील कामगारचळवळींना आत्मविश्वास दिला. 'कामगारांनो, एक व्हा!' या हाकेला प्रतिसाद देत, इ.स. १९२० मध्ये 'ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस'ची स्थापना झाली...

● ● ●

१९२६ सालच्या साधारण डिसेंबर महिन्यातील एके दिवशी इंडिया वूलन मिलच्या स्पिनिंग विभागात काम करणारे एक कामगार गंगाराम कुशाजी सुर्वे सकाळी सातच्या पाळीसाठी कामावर जायला निघाले होते. तेव्हा रस्त्याच्या एका वळणावर कुणा तरी बाळाच्या रडण्याचा आवाज कानी पडला. त्या आवाजाचा वेध घेता त्यांच्या लक्षात आले की, रस्त्याकडेच्या कचराकुंडीत कुणा महिलेने सोडून दिलेले ३-४ महिन्यांचे मूल रडत आहे. ते त्या बाळाच्या जवळ गेले, आजूबाजूचा कचरा दूर केला, आणि त्यास उचलले. या लहानग्याचे पोट ताडीच्या पिंपासारखे होते. तो अगदी शेंबडा, किरटा होता आणि त्यास जंतांनी खाल्ला होता. जुन्या मराठी म्हणीप्रमाणे, 'हात पाय काड्या आणि पोट ढेरवाढ्या' असा या मुलाचा अवतार होता. गंगाराम सुर्वेनी या मुलास घरी आणले. त्यांनी त्या दिवशी 'खाडा' केला, ही त्या काळच्या परिस्थितीत मोठी गोष्ट होती; आर्थिक नुकसान करणारी होती. त्यांनी घरी आल्यावर या मुलाला आपल्या पत्नीकडे-काशीबाईंकडे सोपवला. त्या कमला मिलमध्ये बाइंडिंग खात्यात काम करीत होत्या. गंगाराम सुर्वेनी या मुलास स्वतःचे नाव दिले – नारायण गंगाराम सुर्वे. १५ ऑक्टोबर १९२६ ही नारायण सुर्वेंची अंदाजे जन्मतारीख. सुर्वेनीच म्हटले आहे की, 'गंगाराम सुर्वेनी जे नाव दिले तेच माझे नाव, त्यांनी जी जन्मतारीख सांगितली तीच माझी जन्मतारीख, त्यांनी जो पत्ता दिला तोच माझा पत्ता'. गिरणगावात करी रोड जवळच्या मंगलदास चाळीतील गंगाराम सुर्वेंच्या खोलीत हा लहान नारायण एक 'बाळगलेला' मुलगा म्हणून वाढू लागला. इथपासूनच नारायण सुर्वेंची नाळ कामगारजीवनाशी जोडली गेली. स्वतःच्या आईने त्यांना वाऱ्यावर सोडून दिले तरी तिच्याबद्दल सुर्वेनी राग बाळगला नाही...

एका भाषणात ते म्हणाले होते की, ६०० वर्षांपूर्वी कबीरालादेखील

◆ *एकोणिसाव्या शतकात ब्रिटिश वसाहतवादाचे आणि वसाहतवादी शहराचे प्रतीक असणारे मुंबई एक व्यापारी शहर म्हणून नावारूपाला आले होते.* ◆

त्याच्या आईने असेच नदीकिनारी सोडून दिले होते. रस्त्यावरून जाणाऱ्या 'जुलाहा'ने, म्हणजे विणकर दाम्पत्याने त्याला घरी नेले आणि आपले मूल म्हणून वाढवले. कबीर हा फार मोठा माणूस होता, त्याची आणि आपली तुलना होऊ शकत नाही, हे सांगताना सुर्वे म्हणतात की, जन्माबाबतचे हे साम्य अचंबित करणारे आहे. अनाथ कबीराला तेव्हाच्या विणकराने बाळगला, तर ६०० वर्षांनंतर नारायण सुर्वेनादेखील एका आधुनिक जगातील विणकरानेच आपलेसे केले, हा इतिहास फार काव्यात्म वाटावा असाच आहे. फरक इतकाच की, कबीराला त्याचे आई-वडील शिकवू शकले नाहीत, पण गंगाराम सुर्वेंनी मात्र सुर्वेंना नव्याने सुरू झालेल्या माहीमच्या म्युनिसिपल शाळेत दाखल केले, आणि त्यांना परवडेल इतपत, म्हणजे चौथी इयत्तेपर्यंत शिकवले...

नारायण सुर्वेंचे आई-वडील युनियन सभासद होते, त्यामुळे सुर्वेंना युनियनच्या कामांची तोंडओळख लहानपणीच झाली. मृदू स्वभाव, मोजके बोलणे आणि सर्वांना मदत करायचा स्वभाव यामुळे इतरांना त्यांच्याबद्दल आपुलकी वाटे. मंगलदास चाळीत वरच्या मजल्यावर राहणारे तळेकर हे गृहस्थ कामगार चळवळीची कामे करीत असत. तळेकरांची पुतणी कृष्णा आणि सुर्वेंची बहीण सखू या मैत्रिणी होत्या. सुर्वे तळेकरांसोबत चळवळीच्या कामांना जाऊ लागले आणि साम्यवादी पक्षाशी जोडले गेले. थाळीप्रचाराला व खडूप्रचाराला जाणे, पार्टीची पत्रके वाटणे, मोर्च्यामध्ये सहभागी होऊन घोषणा देणे, चाळींमधील प्रचारसभेत छानपैकी भाषणे देणे, मतदान कसे करायचे ते चाळकऱ्यांना शिकवणे, प्रौढ साक्षरता प्रसाराचे वर्ग घेणे अशी कामे ते अहोरात्र करू लागले. सुर्वे रस्त्यावर लाल बावटा हातात घेऊन अनवाणी पायाने हिंडत घोषणा देत. कामगारांच्या मीटिंग्सचे वेळापत्रक खडूने भिंतीवर लिहीत. चाळीतल्या मोकळ्या जागेत कामगारांना गोळा करून संपाची कारणे, मागण्या त्यांना समजावून सांगत. गोष्टी समजावून सांगण्याच्या त्यांच्या

हातोटीमुळे सर्व जण त्यांना 'मास्तर' म्हणून संबोधू लागले, त्यांना मदत करू लागले. कुणी त्यांना बोलावून खायला देई, कुणी शर्ट-पॅन्ट देई. जे मिळेल ते काम सुर्वे करीत असत. कुणाची खरकटी उचलून देत आणि थोडे अन्न मिळवीत. माहीमच्या खाडीला लागणाऱ्या गलबतांतून रेती, विटा, लाकूड, कांदे यांची पोती उचलून किनाऱ्यावरील वखारीत आणून देत. माहीमच्या समुद्रात डुंबत त्यात गलबतातून सांडलेले कांदे गोळा करून वाण्याला विकत. साधारण १९३९-४०च्या दरम्यान, म्हणजे दुसरे महायुद्ध सुरू असतानाच्या काळात, नारायण सुर्वे 'इंडिया युनायटेड मिल क्र. ३' मध्ये वाइंडिंग विभागात बालकामगार म्हणून कामाला लागले. संध्याकाळी सहा ते सकाळी चार अशी रात्रपाळी करू लागले. दिवसा ट्रेड युनियन्सची कामे करू लागले.

दरम्यानच्या काळात तळेकरांची पुतणी कृष्णा आणि सुर्वे यांच्यामध्ये प्रेमभाव निर्माण झाले. कृष्णाचे आईवडील तिच्या लहानपणीच वारले होते म्हणून ती तिच्या काकांसोबत म्हणजे तळेकर कुटुंबीयांसोबत राहत होती. आजीचे प्रेम सोडले तर तिला घरात फार चांगली वागणूक मिळत नसे. आजीच्या निधनानंतर कृष्णा अगदीच एकटी पडली. आई-वडील नसल्याने आणि नातेवाईकांनी टाकल्याने आलेले पोरकेपण हा कृष्णा आणि सुर्वे यांच्यामध्ये असलेला समान धागा. सुर्वेंची कामगारवर्गाप्रति असणारी तळमळ आणि धडपड कृष्णा पाहत होती. पोरकेपणामुळे त्यांच्या जिवाची होणारी तगमग ती पाहत होती. त्यांचा साधेपणा, स्वभावातील निष्पापपणा, सर्वांना मदत करण्याची वृत्ती आणि कामगारांसाठीची धडपड तिला भावली. तर सुर्वेंना कृष्णाचा बेधडकपणा भावला. त्यांच्या प्रेमात शारीर भाव कमी, पण समदुःखी असण्याचा साम्यभाव अधिक होता. त्या दोघांमध्ये काही तरी सुरू असल्याची कुणकुण घरच्यांना लागली आणि मग मात्र सुर्वेंचे 'जात-धर्म नसणे' आडवे आले. आडनाव मराठा जातीचे म्हणून 'दलित' त्यांची हेटाळणी करीत, तर दुसरीकडे; 'बौद्ध लोकांत वावरतो, महार लोकांत बसून जेवतो', म्हणून मराठा लोकही त्यास आपले मानीत नसत. सुर्वे आणि तळेकर यांच्यामधील हा वाद फारच विकोपास गेला आणि या भांडणांमुळे धास्तावून गंगाराम सुर्वे यांनी सिंधुदुर्गातील वैभववाडी येथील हेतगाव या त्यांच्या गावी निघून

*कामगार युनियन्सवर बारीक लक्ष ठेवण्यासाठी इ.स. १९२६ साली ब्रिटिशांनी 'ट्रेड युनियन्स ॲक्ट' पारित केला. यामुळे कामगारचळवळ अधिकच तीव्र झाली. याच १९२६ सालातील एके दिवशी कवी नारायण गंगाराम सुर्वे यांचा जन्म झाला.*

जाण्याचा निर्णय घेतला. त्यांनी त्यांची खोली तळेकरांकडे सोपवली. सखूचे लग्न झाले असल्याने ती परळच्या दामोदर हॉलजवळील तिच्या घरी निघून गेली. 'आता तुझे तू बघ' असे सांगून गंगाराम सुर्वे गावी निघून गेले. नारायण सुर्वे पुन्हा एकदा रस्त्यावर आले...

● ● ●

त्याकाळी बेकारी प्रचंड होती. कापडगिरण्यांच्या बाहेर रोजंदारी अथवा नोकरी मिळावी म्हणून कामगारांचे तांडेच्या तांडे गोळा होत असत. अशाच एका तांड्यात सामील होत, सुर्वे कधी सेन्चुरी मिल, तर कधी स्प्रिंग किंवा मोरबाग मिल अशा गिरण्यांमध्ये बदली-कामगार म्हणून काम करू लागले. 'स्पिंडल' भरीत 'डारफबॉय' म्हणून काम करू लागले. कधी गोदरेजच्या पत्र्याच्या कारखान्यात हमाल म्हणून काम केले, तर कधी 'टाटा ऑईल मिल' मध्ये तेलाचे पट्टे साफ करण्याचे काम केले. एकदा पारशी माणसाने सुरू केलेल्या 'पीपल्स व्हॉलेंटियर्स ब्रिगेड' मध्ये सामील होऊन, इ.स. १९४२च्या भारत छोडो आंदोलनात ब्रिटिश-लाठीचा मारही खाल्ला. देशातील गुलामगिरी, शोषण, तसेच कामगारांचे प्रश्न याचे अधिक स्पष्ट भान त्यांना लाभले. सुर्वेंची ही सर्व धडपड कृष्णा पाहत होती. साधारण १९४४-४५ साल असावे, वर्तमान आयुष्यातील अस्थिरता आणि भविष्यातील अंधार स्वीकारीत दोघांनी अखेर लग्न करायचे ठरवले. एके दिवशी कृष्णाने घर सोडले आणि दोघांनी नायगाव कोर्टात जाऊन लग्न केले.

सुर्वेंना पक्की अशी नोकरी नव्हतीच, त्यामुळे सर्वच अधांतरी आणि बेभरवशाचे आयुष्य होते. घरी त्यांचे फार लक्ष नसे. कृष्णाबाईंनी मात्र अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत कोंड्याचा मांडा करीत संसार केला. काही दिवसांनी सांताक्रूझच्या कालिना भागात एक झोपडे

त्यांना राहावयास मिळाले. कशातरी दोऱ्या बांधून, जमिनीवरील माती खणून मोरी तयार करून, दगडांच्या चुली बांधून त्यांचा संसार सुरू झाला. हे झोपडे पावसात वाहून गेल्यावर खारमधील धोबीघाटाजवळ बिबिबाय नावाच्या मुसलमान महिलेच्या झोपड्या होत्या, तिथे त्यांना एक झोपडे मिळाले. पुढे साधारण १९५०च्या आसपास सांताक्रूझच्या खेरवाडीत एक बरे घर मिळाले. साम्यवादी पक्षाशी जवळीक असणाऱ्या तेव्हाच्या शिक्षण अधिकारी कपिला खांडवाला यांच्या मदतीने सुर्वेंना शिक्षण अधिकारी कार्यालयात शिपायाची नोकरी मिळाली. पगार पासष्ट रुपये. खांडवालाबाईंच्या मदतीमुळे कृष्णाबाईंनादेखील पार्ल्याच्या म्युनिसिपल शाळेत शिपाईण म्हणून नोकरी मिळाली. पगार साठ रुपये. संसारगाड्याच्या दोन्ही चाकांना जरा वेग मिळाला; संसारात काहीसे स्थैर्य येऊ लागले होते. सुर्वे आणि कृष्णाबाई यांच्यात एक अलिखित करार झाला होता. घराबाहेरचे सर्व आर्थिक व्यवहार सुर्वेंनी पाहायचे आणि घरातील सर्व व्यवहार कृष्णाबाईंनी. दोघेही नोकरीला घराबाहेर जात. कृष्णाबाई छोट्या रवींद्रलाही त्यांच्यासोबत पार्ल्याच्या शाळेत घेऊन जात; तेथेच एक झोळी बांधून त्याला ठेवीत. 'काम तेथे पाळणाघर' ही संकल्पना त्यांनी त्याच काळात राबवली होती!

• • •

सांताक्रूझच्या खेरवाडीतील घरात जे स्थैर्य मिळाले, त्याचा सुर्वेंना उपयोग झाला. पूर्वी वाचनास फार वेळ मिळायचा नाही, आता मात्र त्यांच्या वाचनास अफाट वेग मिळाला. घरात वीज नसल्याने घासलेटची चिमणी लावून सुर्वे वाचत बसत असत. मॅक्सिम गॉर्कीची 'आई' ही कादंबरी त्यांच्या वाचनात आली. त्यातील पावलोव्ह या नायकाचा त्यांच्यावर प्रचंड प्रभाव पडला. ते साम्यवादी चळवळीतील काम अधिक जोमाने करू लागले. लालबाग-परळ हे चळवळीचे केंद्र. जीवनात काहीसे स्थैर्य आले असले तरी चळवळीप्रति असलेली निष्ठा आणि कामगारांना माणूस म्हणून जगता यावे यासाठीची तळमळ जराही कमी झाली नव्हती. सुर्वे रोज सांताक्रूझवरून लालबागला जात. रात्री-अपरात्री परत येत. पुन्हा एकदा शिक्षण अधिकारी खांडवालाबाई मदतीस आल्या. त्या सुर्वेंचे कष्ट पाहत होत्या. परळ येथील टाटा हॉस्पिटलसमोर असलेल्या

◆ *गिरणगावात करी रोड जवळच्या मंगलदास चाळीतील गंगाराम सुर्वेंच्या खोलीत हा लहान नारायण एक 'बाळगलेला' मुलगा म्हणून वाढू लागला. इथपासूनच नारायण सुर्वेंची नाळ कामगार जीवनाशी जोडली गेली.* ◆

'बोगदा चाळी'त एका झाडूवाल्याची खोली रिकामी होती. ती खोली खांडवालाबाईंनी सुर्वेंना मिळवून दिली. 'बोगदा चाळ' हे नाव सार्थ ठरेल अशीच ती जागा होती. साधारण इ.स. १९५२ साली सुर्वे दाम्पत्य बोगद्याच्या चाळीत राहावयास गेले.

ज्या गिरणगावातील कष्टकरी वर्गाने सुर्वेंना प्रेम आणि आपुलकी दिली, अडल्या-नडल्या काळात मदत केली, जेथून परिस्थितीमुळे बाहेर पडावे लागले आणि आयुष्याची वणवण झाली, त्याच गिरणगावात सुर्वे परत राहायला गेले. आता मात्र सुर्वेंनी स्वतःला पार्टीच्या कामात पूर्णतः झोकून दिले. शिपाई म्हणून दिवसा नोकरी आणि उरलेला वेळ अफाट वाचन आणि चळवळीचे काम, असा दिनक्रम सुरू झाला. चाळीतदेखील 'मास्तर' म्हणून ते ओळखले जात होते. साम्यवादी पक्षाशी असलेल्या संबंधांमुळे सरकारच्या पोलिटिकल ब्रांचची माणसे सुर्वेंच्या मागावर असायची. घरावर पाळतदेखील ठेवली जायची.

सुर्वे गिरणगावातील व्यापक अशा कामगार चळवळीशी अगदी घट्टपणे जोडले गेले होते. कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे, अण्णा भाऊ साठे, शाहीर अमर शेख या साम्यवादी चळवळीतील बिनीच्या शिलेदारांशी त्यांचा संबंध आला. कॉम्रेड डांगे यांना सुर्वे गुरुस्थानी मानीत. त्यांच्या सोप्या पण स्पष्ट विचारांचा सुर्वेंवर फार खोलवर परिणाम झाला. डॉ. आंबेडकर, कॉम्रेड डांगे, एस. एम. जोशी यांची भाषणे ऐकायला मिळाली. शाहीर गवाणकर, अण्णा भाऊ साठे, शाहीर अमर शेख यांच्यासोबत सुर्वेदेखील चळवळीची गाणी गाऊ लागले. 'काही तरी लिहायला हवं!' अशी लेखनाची ऊर्मी वरचेवर खुणावू लागली. नारायण सुर्वेंची पहिली कविता 'शहीद हो' ही 'नवयुग' या अंकामध्ये याच काळात, म्हणजे १९५६ मध्ये प्रसिद्ध झाली. त्यानंतर 'नवयुग'च्या दिवाळी अंकात 'दोन

दिवस' ही कविता प्रसिद्ध झाली.

*'शेकडोवेळा चंद्र आला, तारे फुलले, रात्र धुंद झाली*
*भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली'*

या ओळींची दखल विंदा करंदीकर यांसारख्या ज्येष्ठ कवीने आणि श्री. पु. भागवत यांसारख्या साक्षेपी संपादकाने घेतली. त्याच वर्षी नारायण सुर्वेनी 'डोंगरी शेत' हे पहिलं गाणं लिहिलं –

*'डोंगरी शेत माझं गं मी बेनु किती*
*आलं वरीस राबून मी मरावं किती'*

हे गाणं चळवळीने चांगलेच उचलून धरले. चळवळीतील कार्यकर्त्यांनी विविध सभा, बैठका, मोर्चे येथे ते गायले. ते गाणे एकूणच कष्टकरी समाजाच्या दुःखाचा उद्गाता ठरले. 'डोंगरी शेत' हे गाणे लोकांचे झाले आणि नारायण सुर्वे 'लोककवी' झाले. पुढे एच. एम. व्ही. कंपनीने या गाण्याची रेकॉर्ड काढली. त्याचे सुर्वेंना पंधरा रुपये मानधन मिळाले. सुर्वे मास्तर 'कवी' झाले. शाहीर अमर शेख, अण्णा भाऊ साठे बोगद्याच्या चाळीत येऊ लागले. अमर शेख कधी हातात काठी, कधी कुऱ्हाड अशा गोष्टी हातात घेऊन आवेशात चळवळीची गाणी म्हणतच बोगद्याच्या चाळीत सुर्वेंना भेटायला येत. अशा वेळी वातावरणात एक झिंग चढत असे. या चळवळीच्या आवेशात स्वतःच लिहिलेली 'गिरणीची लावणी', 'महाराष्ट्राच्या नावानं' ही गीते म्हणत सुर्वेदेखील सामील होत. मोर्चे, संप, भाषणे, वाचन आणि कविता-लेखन यातच सुर्वे व्यग्र झाले. 'युगांतर', 'नवयुग', 'मराठा', इत्यादी मासिकांतून त्यांच्या कविता छापून येऊ लागल्या.

सुर्वेंच्या मित्र-मैत्रिणींचा गोतावळा प्रचंड वाढला; या मित्रांची कृष्णाबाईंच्या संसाराला मदतच झाली. जवळच्याच महर्षी दयानंद महाविद्यालयात शिकवणाऱ्या कवयित्री शांताबाई शेळके बोगद्याच्या चाळीतील घरात भेटायला येत. सुर्वेंच्या मुलींना फिरायला घेऊन जात. रिबिनी, बांगड्या, माळा असे काहीबाही घेऊन देत. त्याच महाविद्यालयात शिकवणाऱ्या कवी केशव मेश्राम यांच्याशीदेखील सुर्वेंचे मैत्र जुळले.

त्याकाळी कापड गिरण्या हाच मुंबईचा प्रमुख व्यवसाय होता. कामगार चळवळींनी भारलेले गिरणगाव आणि त्यातील कामगार हा मुंबईच्या

◆ ***नारायण सुर्वेंचे आई-वडील युनियन सभासद होते, त्यामुळे सुर्वेंना युनियनच्या कामांची तोंडओळख लहानपणीच झाली.*** ◆

केंद्रस्थानी होता. सतत मोर्चे आणि संपांमुळे ‘जागता’ असणारा हा भाग मराठी साहित्य आणि संस्कृतीचेही बलस्थान म्हणून उदयास येत होता. साम्यवादी पक्षाच्या कार्यालयात उर्दू साहित्यिक येत असत. यात कैफी आजादी, अली सरदार जाफरी, साहिर लुधियानवी, शकील बदायुनी या मातब्बरांचा समावेश होता. त्यांच्या बरोबरीने मुन्शी प्रेमचंद, भीष्म सहानी, बलराज सहानी असे अनेक वावरत होते. या दिग्गजांच्या सहवासामुळे सुर्वेंची उर्दू भाषेची समज, तसेच सामाजिक आणि साहित्यिक जाण समृद्ध होण्यास मदत झाली. तो काळ शाहीर अण्णा भाऊ साठे, अमर शेख, गवाणकर यांच्या शाहिरीने दुमदुमून गेला होता. त्याच जोडीला कामगार रंगभूमी आकाराला येत होती. त्यास लोकरंगभूमीचे परिमाण लाभत होते. वगनाट्य, पथनाट्य अशा माध्यमांतून कामगार कलावंत प्रयोगशील होऊ पाहत होते. कामगार मैदान, नरे पार्क मैदान, साने गुरुजी विद्यालयाचे मैदान अशा ठिकाणी पोवाडे, तमाशे, नाटके, जलसे आणि मेळे होत असत. या सर्व परिस्थितीचा प्रभाव सुर्वेंवर पडला...

● ● ●

सुर्वेंना वाचनाची आणि कवितेची विशेष आवड असल्याने ते कधीकधी थोरल्या मुलास कविता आणि इतिहास शिकवीत. त्यांचे शिकवणे पाहून कृष्णाबाईंनी सुर्वेंना सातवीची परीक्षा देण्यास प्रोत्साहन दिले. त्याप्रमाणे सुर्वे सातवी पास झाले. शिरोडकर हायस्कूलला प्राथमिक शिक्षक सनद या कोर्सचे (आताच्या डी. एड. कोर्ससारखे) पूर्णवेळ वर्ग चालत असत. परंतु नोकरी सोडून पूर्णवेळ हा कोर्स करणे सुर्वेंना परवडण्यासारखे नव्हते. मात्र तेथील साम्यवादी विचारांच्या प्राचार्य कुलकर्णी यांनी मदत केली आणि त्यांना कोर्सला प्रवेश दिला. सुर्वेंच्या मुळच्या धडपड्या स्वभावानुरूप त्यांनी फार मेहनत घेतली. ते एल्फिन्स्टन पुलाजवळील म्युनिसिपल शाळेत शिपाई होते. त्यांनी शाळेत सकाळची पाळी मागून घेतली. नोकरीतून दुपारी १ वाजता

सुटल्यावर ते शिरोडकर हायस्कूलला प्राथमिक शिक्षक सनद कोर्सच्या वर्गांना जात. संध्याकाळी सुटल्यावर तेथेच अभ्यास, वाचन करीत आणि उशिरा घरी परत येत. घरी आल्यावर दुसऱ्या दिवशीच्या पाठाची तयारी करीत. अखेरीस एकसष्ट टक्के गुण मिळवून सुर्वे यांना प्राथमिक शिक्षक सनद मिळाली. या काळात या कोर्सचा खर्च, मुलांच्या शिक्षणाचा खर्च, घरातील सर्व जबाबदाऱ्या सांभाळणे कृष्णाबाईंना अगदी जिकिरीचे झाले होते. त्यावेळी सुर्वेवर माया करणाऱ्या शिरीष पै - आचार्य अत्रे यांच्या कन्या– यांची फार मदत झाली. त्यांनी सुर्वेंच्या थोरल्या मुलाचा अगदी महाविद्यालयीन शिक्षणापर्यंतचा खर्च उचलला. सुर्वेंना प्राथमिक शिक्षक सनद मिळाल्यानंतर कपिला खांडवालाबाईंच्या मदतीने नारायण सुर्वे नायगावच्या म्युनिसिपल शाळेत 'शिक्षक' म्हणून रुजू झाले. पूर्वीपासूनच 'मास्तर' अशी ओळख असणारे सुर्वे खरोखरच मास्तर झाले...

या काळात सुर्वे सतत वाचन आणि लेखन यात मग्न असायचे. एखादी कविता अथवा कवितेची सुरुवातीची ओळ, एखादे प्रतीक अथवा रूपक सुचले की, सुर्वे समोर असेल त्या कागदावर, चिठ्ठी-चपाटीवर लिहून ठेवायचे, आणि तो कागद पॅन्टच्या खिशात कोंबून विसरून जायचे. सुर्वे एकपाठी होते; एकदा कविता लिहून झाली की, ती त्यांच्या स्मरणात राहत असे. तरीपण सुर्वेंच्या पॅन्टच्या खिशातील कागद आणि चिठ्ठ्या-चपाट्या कृष्णाबाई व्यवस्थित जपून ठेवीत. आपल्या कवितांचा संग्रह काढावा असे सुर्वेंच्या मनात येत असे, पण पैशाअभावी अडून राहत असे. हे लक्षात आल्यावर कृष्णाबाईंनी त्यांचे मंगळसूत्र सुर्वेंच्या हातात ठेवले. मंगळसूत्र विकून पाचशे रुपये आले आणि त्या पैशांतून इ.स. १९६२ साली नारायण सुर्वेंचा पहिला काव्यसंग्रह 'ऐसा गा मी ब्रह्म' अभिनव प्रकाशनातर्फे प्रसिद्ध झाला.

*'कामगार आहे मी तळपती तलवार आहे*
*सारस्वतांनो! थोडासा गुन्हा करणार आहे.'*

असे म्हणत, साठोत्तरी मराठी कवितेची मुहूर्तमेढ रोवत, सुर्वेंनी तत्कालीन मराठी काव्यविश्वाला चांगलाच धक्का दिला. इ.स. १९६३ साली महाराष्ट्र राज्य शासनाचा एक हजार रुपयांचा पुरस्कार या काव्यसंग्रहास मिळाला. त्याच पैशांतून सुर्वेंनी कृष्णाबाईंसाठी चौदा कॅरेट सोन्याचे

◆ ***आई-वडील नसल्याने आणि नातेवाईकांनी टाकल्याने आलेले पोरकेपण हा कृष्णा आणि सुर्वे यांच्यामध्ये असलेला समान धागा.*** ◆

मंगळसूत्र आणि कुडी आणली. या पहिल्याच काव्यसंग्रहाने नारायण सुर्वे कवी म्हणून जनसामान्यांत चांगलेच परिचित झाले. या पुस्तकाची प्रस्तावना कुसुमाग्रज ऊर्फ वि. वा. शिरवाडकरांनी लिहिली होती. सुर्वे साहित्य संमेलने, परिषदा, बैठका यासाठी नाशिकला जात असत. त्यावेळी त्यांचा आणि कुसुमाग्रजांचा स्नेह जुळला. थोर साहित्यिक नरहर कुरुंदकर यांच्याशीदेखील सुर्वेंचा असाच स्नेह जुळला.

● ● ●

इ.स. १९६४च्या आसपास, बोगद्याची चाळ सोडून सुर्वे कुटुंब चिंचपोकळी स्टेशनला लागून असणाऱ्या म्युनिसिपल कॉर्पोरेशनच्या इमारतीतील वन बी.एच.के. घरात राहायला गेले. विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर आणि वसंत बापट ही त्रयीदेखील महाराष्ट्राच्या घराघरात कविता पोहचवीत होते. नारायण सुर्वेंनी काव्यवाचनाचे कार्यक्रम सुरू केले. कवी ना. धों. महानोरही त्यांच्या काव्यवाचन कार्यक्रमांत सहभागी होत. सुर्वेंच्या काव्यवाचन कार्यक्रमांचे राज्यभर दौरे सुरू झाले. मुलाखती, साहित्यिक समारंभ, काव्यमैफिली यात त्यांचा बराच वेळ जाऊ लागला. शाळेची नोकरी, साम्यवादी पक्ष आणि चळवळीची कामे, आणि काव्यवाचनाचे कार्यक्रम यात ते खूपच व्यस्त झाले...

इ. स. १९६६ साली नारायण सुर्वेंचा दुसरा काव्यसंग्रह 'माझे विद्यापीठ' पॉप्युलर प्रकाशनाने प्रसिद्ध केला.

*'ना घर होते, ना गणगोत, चालेन तेवढी*
*पायाखालची जमीन होती*
*दुकानांचे आडोसे होते; मोफत नगरपालिकेची*
*फुटपाथ खुलीच होती.'*

असे म्हणत समस्त कामगारवर्गाच्या विद्यापीठाचे वर्णन करीत, मराठी काव्यप्रांतात दुर्लक्षित राहिलेल्या कष्टकरी, कामगारवर्गाचे चित्रण सुर्वेंनी अधिक सुस्पष्टपणे मांडले. या काव्यसंग्रहाने सुर्वेंचा काव्यप्रांतातील मान

अधिकच वाढला, प्रसिद्धीही भरपूर मिळाली. या संग्रहाच्या पन्नास प्रती मा. शरद पवार यांनी विकत घेऊन अनेकांना भेट म्हणून दिल्या. अनेक मोठमोठी मंडळी घरी येऊ लागली. 'माझे विद्यापीठ' या काव्यसंग्रहास एकूण ११ पुरस्कार मिळाले. विविध महाविद्यालयांतून व्याख्यानासाठी आमंत्रणे येऊ लागली, आणि सुर्वे कामगारबाह्य जगाशी, तरुणाईशी स्वतःला जोडून घेऊ लागले. या काव्यसंग्रहातील कविता महाविद्यालये आणि विद्यापीठांच्या अभ्यासक्रमांमध्ये लावल्या गेल्या. अनेकांनी त्यावर पुस्तके लिहिली, संशोधन करून पदव्यादेखील मिळवल्या. सुर्वेंची विविध समित्यांवर, विद्यापीठांच्या अभ्यास मंडळांवर नियुक्ती झाली. इ. स. १९७२ पासून नारायण सुर्वे प्रभादेवी इथल्या 'लोकवाङ्मय गृह' या मासिकाचे संपादक झाले. सुर्वेंनी अनेकांची पुस्तके 'लोकवाङ्मय गृह'तर्फे प्रसिद्ध केली. साहित्य अकादमीच्या समितीवरही सुर्वेंची नेमणूक झाली, आणि त्या कामांसाठी दिल्ली, भोपाळ, कलकत्ता अशा ठिकाणी दौरे सुरू झाले. सुर्वेंचे नाव देश पातळीवरही गाजू लागले.

इ. स. १९७३ मध्ये नारायण सुर्वे यांना सोव्हिएट रशियाचा 'सोव्हिएट लँड नेहरू पुरस्कार' मिळाला. हा एक आंतरराष्ट्रीय स्वरूपाचा पुरस्कार होता. साम्यवादी पक्षाचे काम करणाऱ्या माणसाला, साम्यवादी विचारसरणी कवितेतून मांडणाऱ्या माणसाला, साम्यवाद्यांच्या देशात पुरस्कार मिळणे ही सुर्वेंसाठी फार मानाची गोष्ट होती. सुर्वे रशियात जाऊन आले आणि त्यांच्या दृष्टिकोनाला वैश्विकता प्राप्त झाली.

*'पणतीच्या मिणमिणत्या प्रकाशात आपणच आपली ज्याने कापली होती नाळ*

*दोस्तहो! त्या, ह्या शतकाची आता सुरू होत आहे संध्याकाळ.'*

असा दुर्दम्य आशावाद घेऊन, कामगार जीवनात १९७० नंतर होत असलेल्या बदलांची दखल घेत, इ. स. १९७५ साली, नारायण सुर्वे यांचा तिसरा काव्यसंग्रह 'जाहीरनामा' पॉप्युलर प्रकाशनातर्फे प्रसिद्ध झाला. याच दरम्यान कुसुमाग्रजांच्या मध्यस्थीने सुर्वेंच्या थोरल्या मुलाचे, रवींद्रचे लग्न झाले. त्याच्या लग्नाच्या वेळी सुर्वेंच्या 'नसलेल्या' जातीचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला. मुलीच्या घरच्यांनी जात माहीत नसलेल्या मुलाशी लग्न केले तर मराठा समाजात नाचक्की होईल, असा

◆ *आडनाव मराठा जातीचे म्हणून 'दलित' त्यांची हेटाळणी करीत, तर दुसरीकडे; 'बौद्ध लोकांत वावरतो, महार लोकांत बसून जेवतो', म्हणून मराठा लोकही त्यास आपले मानीत नसत.* ◆

सूर लावला. त्यावर कुसुमाग्रजांनीही ठणकावून सांगितले, 'तुम्हांला जातच हवीय ना! मग तुमच्या मराठा समाजाला सांगा, नारायण सुर्वे हा तात्यासाहेबांचा मानसपुत्र आहे. हे लग्न तात्यांनीच जमवलंय.' अखेरीस हे लग्न पार पडले आणि रवींद्र नाशिकलाच स्थिरावला. इ. स. १९७६ साली सुर्वेंना पुन्हा एकदा रशियाला जायचा योग आला. मॉस्को शहरात 'वर्ल्ड रायटर्स कॉन्फरन्स' भरत होती, त्याचे निमंत्रण त्यांनी स्वीकारले. परत आले ते आणखी एका कामाची जबाबदारी घेऊन. त्या काळी मुंबईहून 'सोव्हिएट देश' या नावाचे पाक्षिक निघत असे, या पाक्षिकाच्या संपादनाची जबाबदारी सुर्वेंवर आली.

१९८० च्या दशकापासून नारायण सुर्वेंच्या कवितांचे नाट्याविष्कार सादर होऊ लागले. मराठी काव्यप्रांतात ही अनोखी गोष्ट होती. प्रदीप राणे यांनी 'मनीऑर्डर' आणि 'पोर्टरची स्वगते' या दोन कवितांवर 'स्वगत-स्वगते' हा नाट्याविष्कार सादर केला. पुढे कमलाकर सोनटक्के, प्रदीप राणे, अजित भुरे, भालचंद्र झा अशा रंगकर्मींनी पहिल्या तीन काव्यसंग्रहांतील कवितांवर आधारित 'ऑन द पेव्हमेंट ऑफ लाईफ' आणि 'क्षितिज रुंद होत आहे' हे नाट्याविष्कार सादर केले.

१९९०च्या दशकाच्या सुरुवातीला सुर्वेंनी काही छोटेखानी पण महत्त्वाच्या संग्रहांचे 'लोकवाङ्मय गृह' तर्फे प्रकाशन केले. यात 'गाणी चळवळीची' (१९९१), 'दलित काव्यदर्शन' (१९९२), आणि 'कविता श्रमाची' (१९९३) या संग्रहांचा समावेश होतो. हे तीनही संग्रह सुर्वेंची कामगार चळवळीशी असलेली बांधिलकी दाखवून देतात. याच कालावधीत नारायण सुर्वेंचे आणखी एक महत्त्वाचे काम प्रकाशित झाले. वेगवेगळ्या निमित्ताने सुर्वेंनी लिहिलेले लेखही बरेच होते. त्यात साहित्य, कला, कविता, तत्कालीन राजकीय घडामोडी, यावरील लेख; तसेच कुसुमाग्रज, कुरुंदकर, शाहीर अण्णा भाऊ साठे, अमर शेख यांची

वैयक्तिक अनुभवांतून चितारलेली व्यक्तीचित्रणे, तसेच प्रसंगोपात दिलेल्या मुलाखती यांचा समावेश होता. इ. स. १९९२ साली पॉप्युलर प्रकाशनाने 'माणूस, कलावंत आणि समाज' नावाने या लेखांचे संकलन प्रसिद्ध केले. बराच काळ सुर्वेंचा नवीन काव्यसंग्रह प्रकाशित झाला नव्हता. त्याची जागा काही प्रमाणात त्याच वर्षी (१९९२) प्रकाशित झालेल्या 'सनद' या त्यांच्या निवडक कवितांच्या संकलनाने भरून काढली. यातील कवितांनी पुनःप्रत्ययाचा आनंद दिला. इ. स. १९९४ साली 'लोकवाङ्मय गृह'ने 'निवडक नारायण सुर्वे' हा संग्रह प्रकाशित केला. मुख्य म्हणजे या संग्रहाचे संपादन कुसुमाग्रजांनी प्रकृती अस्वास्थ्याच्या काळातही करून दिले. 'सुर्वेंची कविता ही तुकारामांच्या कुळातील कविता' असल्याचे सांगत 'या कवितेने दिलेला विश्वास हा कोणत्याही शस्त्रापेक्षा प्रभावी आहे', या शब्दात त्यांनी सुर्वेंच्या कवितेचे कौतुक केले.

कामाच्या व्यापामुळे व तब्येतीच्या कुरबुरींमुळे सुर्वेंची लेखन गती मंदावली, हे त्यांच्याही लक्षात आले होते, पण ही संथ गती आपल्या कवितेला अधिक प्रभावी करते, असे त्यांचे मत होते. तब्बल वीस वर्षांनंतर, म्हणजे इ. स. १९९५ मध्ये प्रकाशित झालेल्या 'नव्या माणसाचे आगमन' या पॉप्युलर प्रकाशनाने प्रसिद्ध केलेल्या चौथ्या काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेत त्यांनी तसे नमूद केले आहे.

*'विचार करावा आणि उदास व्हावे; असा हा कालखंड*
*म्हणून दोस्तहो! एखादा गजरा हाताला बांधाल की नाही?'*

असे म्हणत जागतिकीकरणात झपाट्याने बदल घडवून आणणाऱ्या कालखंडातही या नव्या माणसाचे आगमन त्यांना आशादायीच वाटले. नारायण सुर्वेंनी इ. स. १९९५ साली परभणी येथे भरलेल्या ६७व्या 'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे' अध्यक्ष म्हणून निवडणूक लढवली आणि ते भरघोस मतांनी निवडून आले. कामगार चळवळीतील तसेच साम्यवादी पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. या निमित्ताने सुर्वेंना पाठविलेल्या पत्रात कुसुमाग्रजांनी या घटनेचा उल्लेख 'क्रांतिकारी घटना' असा केला आहे. इ. स. १९९५ सालीच विजय तापस यांनी संपादित केलेला 'नारायण सुर्वे यांच्या गवसलेल्या कविता' हा संग्रह संदर्भ प्रकाशनाने प्रसिद्ध केला. यात सुर्वेंच्या

◆ *इ.स. १९४२च्या भारत छोडो आंदोलनात ब्रिटिश-लाठीचा मारही खाल्ला. देशातील गुलामगिरी, शोषण, तसेच कामगारांचे प्रश्न याचे अधिक स्पष्ट भान त्यांना लाभले.* ◆

कुठल्याही संग्रहात नसलेल्या आणि हिंदीतून मराठीत अनुवादित केलेल्या कवितांचा समावेश आहे. काही वर्षांत सुर्वेंच्या मुलीचे, कल्पनाचे, लग्न झाले. सुर्वेंच्या कामाचा व्याप इतका वाढत होता की, आता म्युनिसिपल शाळेत शिक्षकाची नोकरी करताना फारच ओढाताण होऊ लागली. मग त्यांनी स्वेच्छानिवृत्तीचा निर्णय घेतला आणि त्यामुळे चिंचपोकळीतील म्युनिसिपालिटीच्या इमारतीतील हे घर सुर्वेंना सोडावे लागले.

● ● ●

नारायण सुर्वेंचे म्युनिसिपालिटीतले मित्र स्वतःच्या घरासाठी अंधेरीतील मध्यवर्ती ठिकाणी सोसायटी उभारण्याच्या प्रयत्नात होते. सुर्वेंनीही त्यात सहभाग घेतला आणि चिंचपोकळीतील घर सोडून सुर्वे अंधेरीतील घरी राहायला आले. पहिल्या नातीच्या जन्मामुळे काही आनंदाचे क्षण त्यांच्या वाट्यास आले. या घरात सुर्वे दाम्पत्याबरोबरच त्यांचा मुलगा श्रीरंग आणि मुलगी कविता हेदेखील राहात होते. सुर्वेंचे वडील गंगाराम सुर्वेही हेतगाववरून अधूनमधून राहायला येत असत. एकदा सुर्वे पाठ्यपुस्तक मंडळाच्या मीटिंगसाठी पुण्याला गेले असता, अंधेरीस राहायला आलेल्या त्यांच्या वडिलांना कफाचा त्रास सुरू झाला आणि त्यातच त्यांचे निधन झाले. सुर्वेंना पुण्याहून आल्यावर थेट स्मशानातच जावे लागले. ज्यांनी आपल्यासारख्या अनाथ मुलाला जगवले आणि स्वतःचे नाव देऊन ओळख दिली अशा वडिलांच्या निधनाने सुर्वेंना अतीव दुःख झाले. त्यांची आठवण म्हणून सुर्वेंनी गावच्या शाळेला देणगी दिली आणि त्या शाळेचे नामाभिधान 'गंगाराम सुर्वे विद्यालय' असे झाले.

कालगतीनुसार घरातील नातवंडांच्या संख्येत भर पडत होती. सुर्वेंनाही नातीचा ओढा होता. काही कार्यक्रमांना ते नातींनाही सोबत घेऊन जात. सुर्वे चळवळीच्या आणि पक्षाच्या कामात व्यग्र होतेच. मुलगी कविताही त्यांच्यासोबत चळवळीचे काम करायला लागली. याच कालावधीत तिचे

लग्न झाले. श्रीरंग 'सोव्हिएट देश' मधेच नोकरी करीत होता. त्याचेही लग्न पाठोपाठच झाले. त्या दरम्यान कृष्णाबाईंना हृदयविकाराचा सौम्य झटका येऊन गेला. सुर्वे तेव्हाही दौऱ्यासाठी बाहेरच होते. झालेल्या प्रकाराने ते हबकले आणि जरा जास्त वेळ घरी राहू लागले. संकटे मात्र या वयातदेखील साथ सोडत नव्हती. मोठ्या मुलाचा, रवींद्रचा मुलगा मॅनेन्जायटिसच्या विकारामुळे लुळापांगळा झाला. त्या आघातामुळे रवींद्र अधिकच व्यसनाच्या आहारी गेला. मुलगा श्रीरंग देखील व्यसनाधीन झाला होता. अखेरीस इ.स. १९९८ मध्ये काविळीचे निमित्त होऊन श्रीरंगचे निधन झाले. श्रीरंग जाऊन अकरा दिवसच झाले असताना नारायण सुर्वेंना भारत सरकारचा अत्यंत प्रतिष्ठित 'पद्मश्री' पुरस्कार मिळाल्याचे पत्र मिळाले. एकीकडे मुलाच्या निधनाचे दुःख तर दुसरीकडे 'पद्मश्री' सारखा पुरस्कार मिळाल्याचा आनंद अशी विचित्र अवस्था झाली. दिल्लीला १२ एप्रिल १९९८ रोजी सुर्वेंना 'पद्मश्री' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नंतर अवघ्या वर्षभरातच श्रीरंगच्या पत्नीचेही निधन झाले. त्यांच्या नातवंडांची जबाबदारी सुर्वे आणि कृष्णाबाईंवरच आली. या एकापाठोपाठ एक झालेल्या आघातांनी दोघेही खचून गेले.

सुर्वे 'लोकवाङ्मय गृह'च्या आणि 'साहित्य अकादमी'च्या कामात पुन्हा लक्ष घालू लागले. इ.स. १९९९ साली मध्य प्रदेश सरकारने 'कबीर सन्मान' देऊन सुर्वेंना गौरविले. कबीरासारख्या व्यवसायाने विणकर असलेल्या महान व्यक्तीच्या नावे मिळालेला हा पुरस्कार सुर्वेंना सुखावह वाटला. तेही आधुनिक काळातील विणकरच होते!

सुर्वेंवर साधारण चार लघुपट निर्माण केले गेले. इ.स. २००२ साली त्यातील 'नारायण गंगाराम सुर्वे' या लघुपटाचे शूटिंग अंधेरीतील घरातच झाले. प्रसिद्ध दिग्दर्शक अरुण खोपकर यांनी या लघुपटाचे दिग्दर्शन तर शांता गोखले यांनी लेखन केले होते. अभिनेता किशोर कदम यांनी सुर्वेंची भूमिका केली. या लघुपटास २००३ सालचा राष्ट्रपती पुरस्कार मिळाला. सुर्वे कामात व्यग्र होतेच, पण घराबाहेरील कामात व्यग्र होण्याचा पर्याय कृष्णाबाईंकडे नव्हता. सततचे कष्ट आणि मानसिक तणाव यामुळे त्यांची तब्येत ढासळत होती. सुर्वेंनादेखील वयोमानानुसार मधुमेहाने ग्रासले. रक्तदाबही मागे लागला. तपासण्या केल्यानंतर हृदयात

◆ ***साधारण १९५०च्या आसपास सांताक्रूझच्या खेरवाडीत एक बरे घर मिळाले. साम्यवादी पक्षाशी जवळीक असणाऱ्या तेव्हाच्या शिक्षण अधिकारी कपिला खांडवाला यांच्या मदतीने सुर्वेंना शिक्षण अधिकारी कार्यालयात शिपायाची नोकरी मिळाली.*** ◆

'ब्लॉकेज' असल्याचेही कळले. काही दिवसांतच त्यांना हृदयविकाराचा झटका आला. त्यातून बरे झाल्यावर त्यांनी नातींची लग्ने लावून दिली. हळूहळू सुर्वेंनी 'लोकवाङ्मय गृह', 'साहित्य अकादमी', अभ्यास मंडळे अशा जबाबदाऱ्या कमी केल्या आणि ते तब्येतीकडे लक्ष देऊ लागले. मुलगा आणि सुनेचा मृत्यू, दुसऱ्या मुलाची व्यसनाधीनता यांमुळे सुर्वेंना टीकेला तोंड द्यावे लागले. त्यांच्या भिडस्त स्वभावामुळे ते अशा टीकेला उत्तरे देत नसत. पण आतून त्याचा त्यांना खूप त्रास होत असे.

● ● ●

इ. स. २०००च्या आसपास नाशिकहून चळवळीतील काही मंडळी नारायण सुर्वेंना भेटायला आली होती. नाशिकमध्ये सुर्वेंशी संबंधित एक प्रकल्प सुरू होता त्याची माहिती त्यांनी दिली. सुर्वेंच्या नावे एक मोठे सांस्कृतिक भवन व्हावे, अशी त्यांची मनापासून इच्छा होती. कामगारांच्या वर्गणीतून एक वाचनालय उभेही राहिले होते. सांस्कृतिक भवनासाठी सिडकोने त्यांना जागाही दिली होती. सुर्वे या कामामुळे भारावून गेले. सुर्वेंना आयुष्यातील वेगवेगळ्या टप्प्यांवर अनेक पदके, पारितोषिके, मानचिन्हे, प्रशस्तिपत्रके, प्रमाणपत्रे, पुस्तके, तसेच अनेक भेटी मिळाल्या होत्या. अनेक शाली, चषके, पेन्स, चांदीच्या मूर्ती, जहाजे, तांब्या पितळेच्या मोठ्या समया, मूर्ती असे किती तरी वैभव होते. सुर्वेंनी या सर्व गोष्टी नाशिकमधील प्रस्तावित सांस्कृतिक भवनास देऊन टाकल्या. 'आपण येताना काही घेऊन आलो नव्हतो. जे आपल्याला लोकांमुळे मिळाले आहे, समाजाने दिले आहे, ते सर्व समाजालाच परत करणे योग्य आहे, त्यामुळे हा सर्व इतिहास जतनही होईल,' अशी सुर्वेंची त्यामागील भावना होती.

एकदा कार्यक्रमासाठी माथेरानच्या पायथ्याशी असलेल्या नेरळ येथे

गेले असता, सुर्वेंना नेरळचा परिसर फार आवडला. इ. स. २००५ साली अंधेरीतील शहरी गजबजाटातील घर सोडून सुर्वे निसर्गरम्य आणि शांत अशा नेरळ येथे राहायला गेले. काही दिवसांनंतर मात्र तीच शांतता नकोशी वाटू लागली. नातवंडांची लग्ने पार पडत होती. अशा वेळी मुंबईस जाणे होत असे. नाशिकच्याही काही फेऱ्या होत असत. इतर वेळी नेरळमधला एकटेपणा नकोसा वाटे. कृष्णाबाईंना सांध्याचे, पाठदुखीचे दुखणे जडले होते. सुर्वेंना श्वसनविकार झाला होता. हृदयाची, डोळ्यांची शस्त्रक्रिया झाली होती. अधूनमधून हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होणे सुरू होते. सुर्वेंना ऐकायलाही कमी येऊ लागले होते; बऱ्याचशा गोष्टी विसरायलाही लागले होते. यामुळे एक प्रकारचे परावलंबित्व येत गेले. सांस्कृतिक दालनाच्या कामास गती मिळेल आणि माणसांमध्येही राहता येईल या उद्देशाने, नाशिककर मंडळींच्या आग्रहास्तव सुर्वे दाम्पत्य नाशिकला राहायला गेले. एका ऐसपैस बंगल्यात त्यांच्या राहण्याची व्यवस्था करण्यात आली.

काही महिन्यांच्या अंतरात सुर्वे आणि कृष्णाबाई घरात पडल्याचे निमित्त झाले आणि त्यांच्या तब्येती खालावल्या. जरा बरे वाटले की, लोक सुर्वेंना काव्यवाचनासाठी एखाद्या शाळेत, एखाद्या बँकेच्या समारंभात घेऊन जायचे. सुर्वेंनाही तेवढेच बरे वाटायचे. या दरम्यान कृष्णाबाईंनी त्यांचे आणि मास्तरांचे आयुष्य शब्दबद्ध करायचा प्रयत्न केला होता. नेहा सावंत यांनी यासाठी खूप मदत केली आणि या नव्या पुस्तकासाठी अपार मेहनतही घेतली. अखेर सप्टेंबर २००९ मध्ये मुंबईत कृष्णाबाई नारायण सुर्वे यांनी लिहिलेले ‘मास्तरांची सावली’ हे पुस्तक डिम्पल प्रकाशनाने प्रसिद्ध केले. या पुस्तकाला माहीम सार्वजनिक वाचनालयाचा ‘कै. उषा दातार स्मृती पुरस्कार’ मिळाला. तसेच गुजराथी भाषेत अनुवादही झाला. असे काही मोजके क्षण सोडल्यास सुर्वे दाम्पत्य नाशिकला आनंदी नव्हते. एकाकी आणि दुर्लक्षित झाल्याच्या भावनेने त्यांना ग्रासले होते. नाशिकच्या प्रकल्पासंबंधातही अपेक्षाभंगाची भावना होती. घरच्याच जवळच्या व्यक्तीने सुर्वेंच्या बँक खात्यात आणि मिळालेल्या पैशात गैरव्यवहार केला असल्याची कुणकुण लागली होती. सुर्वेंना याचे अतीव दुःख झाले. घरच्या लोकांमध्येदेखील कुरबुरी आणि वाद सुरू

◆ *सांताक्रूझच्या खेरवाडीतील घरात जे स्थैर्य मिळाले, त्याचा सुर्वेंना उपयोग झाला. पूर्वी वाचनास फार वेळ मिळायचा नाही, आता मात्र त्यांच्या वाचनास अफाट वेग मिळाला.* ◆

झाले. या सर्वाला कंटाळून सुर्वे दाम्पत्य पुन्हा नेरळला राहायला आले.

● ● ●

नेरळला सुर्वेंचे अखेरचे दिवस फारसे बरे गेले नाहीत. मोठ्या घरात राहायला गेले तेव्हा, 'सुर्वे आता मिडल-क्लास झाले, नाशिकला राहायला गेले तेव्हा सुर्वे नाशिककर झाले, आणि नेरळला परत आले तेव्हा सुर्वे रातोरात मुंबईला गेले', अशा बातम्या आणि वक्तव्यांनी सुर्वे आतून दुखावले गेले होते. एकदा बाजारात गेले असताना चक्कर येऊन पडले आणि त्यांच्या आजारपणाच्या सत्राला सुरुवात झाली. मदतीला म्हणून त्यांनी धाकट्या मुलीला बोलावून घेतले. कधी दुसरी मुलगी, जावई, नातवंडे भेटायला येत, कधी त्यांच्याकडे घेऊन जात. कधी त्यांचे चाहते बदलापूरचे विद्युत सावे, कवयित्री रूपाली चिंचोलीकर त्यांच्याकडे काही दिवस घेऊन जात. पण आजारपण सुटत नव्हते. सतत काही ना काही निमित्ताने हॉस्पिटलच्या वाऱ्या सुरू होत्या. मोठा मुलगा काही दिवस राहायला आला व सोडून गेला. त्याने सुर्वे फारच हतबल झाले. आत दाबून ठेवलेली ही सर्व दुःखे सुर्वेंनी कधी बोलून दाखवली नाहीत. 'आपली पडती बाजू आहे, सबुरीने घे' असाच सल्ला ते कृष्णाबाईंना देत राहिले आणि आतल्याआत कुढत राहिले.

सुर्वेंच्या आत्मविश्वासाला उभारी मिळावी म्हणून कृष्णाबाईंनी सुर्वेंचे एक नवे पुस्तक करायचा चंग बांधला. सुर्वेंचे अप्रकाशित लेख, तसेच 'सकाळ'मध्ये पूर्वी छापून आलेले लेख नेहा सावंत यांना देऊन ते संकलित करून घेतले. त्यानिमित्ताने घरात कविता आणि साहित्य संबंधाने चर्चा होत, आणि सुर्वे आनंदी होऊन दोन घास नीट जेवत. त्या अखेरच्या काळातही कविता हीच त्यांची भरवशाची सोबतीण होती. १३ जुलै २०१० रोजी डिम्पल प्रकाशनातर्फे सुर्वेंच्या लेखांचा हा संग्रह 'कहाणी कवितेची' या नावाने प्रसिद्ध झाला. त्या दिवशी नारायण सुर्वे

कार्यक्रमाला आले आणि कवी मंगेश पाडगावकर, मधु मंगेश कर्णिक अशा जुन्या मित्रांना भेटून त्यांना बरे वाटले. 'मर्ढेकरांशी बातचीत' ही प्रसिद्ध कविता त्यांनी म्हटली. नेहमीचा काव्यवाचनाचा जोश आणि जोम मात्र त्यामध्ये नव्हता.

नेरळला घरी परत आल्यावर पुन्हा दुःखच वाट्याला. त्यांच्या पैशाबाबत होणारे गैरव्यवहार त्यांच्या कानावर येतच होते. 'कवी सुर्वेंना आर्थिक मदतीची गरज आहे' असे सांगून कुणी तरी सरकार-दरबारी जाऊन पैसे गोळा करीत होते. या बातम्यांनी कृष्णाबाई क्रोधीत व्हायच्या. अनेक कारणांनी घरात वाद आणि कुरबुरी सुरू होत्या. जुलै २०१०च्या अखेरीस सुर्वे घरात पाय घसरून पडल्याचे निमित्त झाले, कंबरेचे हाड मोडले आणि हॉस्पिटलमध्ये आय.सी.यू.त ॲडमिट करावे लागले. सततच्या हॉस्पिटलच्या फेऱ्यांनी तेही शिणले होते. मागे एकदा हॉस्पिटलमध्ये असताना डोळ्यांत पाणी आणून सुर्वेंनी कृष्णाबाईंना 'माउली' अशी हाक मारीत विचारले, 'आज सोनियाचा दिनु की पाणियाचा दिनु?' अखेरीस, तो 'पाणियाचा दिनु' उजाडला, आणि १६ ऑगस्ट २०१० रोजी नारायण सुर्वे यांचे निधन झाले. 'मी जन्मलो तेव्हा काही नाम धारण करून जन्मलो नाही. मात्र मी नसेन तेव्हा ह्या पृथ्वीच्या पाटीवर एक नाव ठेवून जाईन' हे स्वतःचे वाक्य त्यांनी सार्थ ठरवले...

❖❖❖

# नारायण सुर्वे यांची कविता

*‘थोडे साहिलेले, पाहिलेले, जोखिलेले आहे*
*माझ्या जगाची एक गंधवेणाही त्यांत आहे*
*केव्हा चुकलो, मुकलो, नवे शिकलोहि आहे*
*जसा जगत आहे मी तसाच शब्दांत आहे’*


## सुर्वे यांच्या कष्टकऱ्याचे चारित्र्य

नारायण सुर्वे यांचे पाच काव्यसंग्रह प्रकाशित झाले. त्यात ‘ऐसा गा मी ब्रह्म’ (१९६२), ‘माझे विद्यापीठ’ (१९६६), ‘जाहीरनामा’ (१९७५), ‘नव्या माणसाचे आगमन’ (१९९५) आणि ‘नारायण सुर्वे यांच्या गवसलेल्या कविता’ (१९९५, संपादन - विजय तापस) यांचा समावेश होतो. या सर्व संग्रहांतील रचनांची एकूण संख्या २०२ इतकी आहे. सुर्वे यांच्या ‘डोंगरी शेत’ सारख्या आधीच लोकांपर्यंत पोहचलेल्या कविता विचारात घेतल्या, तर सुर्वे यांचा कवितालेखनाचा काळ साधारण ४०-४१ वर्षांचा आहे. इतक्या प्रदीर्घ कालावधीत २०२ रचना ही संख्या फारच कमी आहे. परंतु या २०२ रचनांद्वारे त्यांनी मिळविलेला लौकिक पाहिला तर या कवितांचे गुणात्मक मूल्य लक्षात येईल; आणि मग २०२ या संख्येला विशेष अर्थ उरणार नाही.

नारायण सुर्वे यांची कविता ही मूलतः कष्टाची, कष्टकऱ्यांची आणि कष्टकरी परिसराची कविता आहे. कष्टाला जात, धर्म नसल्याने, सुर्वेंच्या कवितेतील कष्टकरीदेखील कुठल्या विशिष्ट जातीचा, धर्माचा नाही. तो स्त्री आणि पुरुष दोन्ही आहे. तो अगदी हमालापासून ते वेश्येपर्यंत आणि गिरणीत काम करणाऱ्यांपासून ते कारकुनापर्यंत सर्व काही आहे. म्हणजेच तो कुठल्या विशिष्ट कामाशी जोडला गेलेला नाही. या कष्टकऱ्याला त्याच्या कष्ट करण्याबद्दल कुठलाही न्यूनगंड नाही, त्याबद्दल कमीपणाची भावना नाही. त्याला स्वतःच्या ‘नाहीरे’पणाची पूर्ण जाणीव असली तरी ‘आहेरे’

*जीवनात काहीसे स्थैर्य आले असले तरी चळवळीप्रति असलेली निष्ठा आणि कामगारांना माणूस म्हणून जगता यावे यासाठीची तळमळ जराही कमी झाली नव्हती.*

वर्गाबद्दल मनात आकस नाही. सुर्वेंच्या कष्टकऱ्याचे पसायदान काही लांबलचक नाही. ‘मला माणसासारखे जगू द्या’ हे इतकेच त्याचे मागणे आहे. तो अशिक्षित असेलही, पण त्याला त्याच्या जगण्याचे सुनिश्चित भान आहे. त्याला त्याच्या मनगटातील बळाने जो स्वाभिमान देऊ केलाय, तो त्याच्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. म्हणूनच त्याला माणूस म्हणून




स्वाभिमानाने जगण्याची आस आहे. त्याला उसने पैसे किंवा संपत्ती नको आहे, पण कष्टाची भाकरी खाण्याचा आणि माणूस म्हणून वागवले जाण्याचा मूलभूत मानवी हक्क हवा आहे. त्याच जोडीने, आपल्याला माणूस म्हणून वागवले जात नाहीये; या मोठ्या जगात त्याच्या इवल्याशा पण ‘जिवंत’ जगाला स्थानच नाहीये, याची त्याला पुरेपूर जाण आहे. त्यामुळे तो अस्वस्थ झाला आहे; त्याचा स्वाभिमान ठेचकाळला आहे. स्वतःचे संदर्भहीन आयुष्य मुळापासून बदलवत, कष्टकऱ्याच्या स्वाभिमानी माणूसपणाची त्याला या जगात प्रतिष्ठापना करायची आहे. सुर्वेंच्या कवितेतील कष्टकरी त्याच्याच जगण्याचा संदर्भ शोधतो आहे. अर्थात त्याला माणूसपणाने न वागवणारे जग अधिक बलशाली आहे, आणि दिवसेंदिवस अधिकाधिक बलशाली होते आहे; आधुनिक काळात पूर्वीपेक्षाही तो अधिक नागवला जात आहे, हे त्याला माहिती आहे.

◆ *दिल्लीला १२ एप्रिल १९९८ रोजी सुर्वेंना ‘पद्मश्री’ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.* ◆

पण हा लौकिकार्थाने अडाणी कष्टकरी त्यासाठी अलौकिकाला दोष देत नाही; देव आणि नशीब यांच्यावर विसंबून राहत नाही. जीवनातील नैराश्य आणि औदासीन्य त्याला नको आहे, आणि म्हणूनच तो संघर्षाला तयार आहे. त्याचा संघर्ष कुणा विशिष्ट व्यक्तीशी नसून, तो एकूणच समाजव्यवस्थेशी आहे. ही विषम आणि अन्यायकारक समाजव्यवस्था त्याला मोडून टाकायची आहे, आणि माणसाला माणूसपणाने वागवणारी नवीन आणि न्याय्य समाजव्यवस्था प्रस्थापित करायची आहे. यासाठी तो घरातून बाहेर पडला आहे, रस्त्यावर येऊन संघर्ष करतो आहे, बहिऱ्या समाजाला ऐकू जावे म्हणून उच्चरवाने आपले म्हणणे मांडू पाहत आहे. हे वास्तव मांडताना त्याचा स्वाभाविक राग उफाळून येत असेल; तो कधी-कधी उद्धटपणे बोलत असेल, प्रसंगी एखादी शिवीदेखील हासडत असेल. पण तो त्याचा मूळ स्वभाव नव्हे. तो इतरांचे जिणे नाकारीत नाही, तेव्हा इतरांनी त्याचे जिणे स्वीकारावे, ही त्याची रास्त मागणी आहे. सुर्वे यांच्या कवितेतील कष्टकऱ्याचे हे चारित्र्य आहे आणि यातच त्याचे वेगळेपणही दडलेले आहे. हे चारित्र्य मांडणारी आणि त्याचे संदर्भ देणारी कविता सुर्वेंनी लिहिली. या कवितेचे बीज त्यांच्या जीवनानुभवाच्या सुपीक मृदेतूनच अंकुरले.

## सुर्वे यांच्या कवितेला लाभलेली परंपरा

सुर्वेंच्या प्रकटीकरणातून व्यक्त होणारे जीवनानुभव आणि त्यांची कविता यांतील बांधिलकी अत्यंत महत्त्वाची आहे. या बांधिलकीची परंपरा थेट तुकारामांपाशी जाऊन पोहचते. ‘निवडक नारायण सुर्वे’ या पुस्तकाच्या प्रस्तावनेत कुसुमाग्रज लिहितात–

‘‘तुकारामांचे अभंग वाचताना पंथाचे आवरण वितळून जाते व आपण कवीच्या निखळ आध्यात्मिक बांधिलकीचा अनुभव घेतो. ही बांधिलकी खरं म्हणजे कवीची त्या अनुभवातील सामीलकी असते. सुर्वे यांची कविता या कुळातील आहे. या बांधिलकीसोबत सुर्वेंनी कवितेत

आणलेले कष्टकऱ्यांचे जग यांसही मराठी कवितेत मोठी परंपरा आहे.'' समीक्षकांनी 'केशवसुत - मर्ढेकर - सुर्वे' असा या परंपरेचा प्रवाह सांगितला आहे. त्यांबरोबरच इतरही महत्त्वाची नावे या परंपरेत सामील आहेत. अगदी आधुनिक काळातदेखील,

*'जगाच्या कल्याणा देह कष्टवावा ।। कारणीं लावावा ।। सत्यासाठी।।*
*अशा वर्तनाने जन्माचे सार्थक।। संतोषी निर्मीक।। जोती म्हणे।।'*

असे सांगणारे महात्मा जोतिबा फुले जीवनातील कष्टाचे महत्त्व मांडू पाहत होते. अर्वाचीन मराठी कवितेचे जनकत्व लाभलेल्या केशवसुतांनी 'मजुरावर उपासमारीची पाळी' (१८८९) या कवितेत कष्टकरी मजुराचे चित्रण रेखाटले आहे.

*'हीं मंदिरें हो खुलतात चांगली;*
*माझ्या वडिलींच न काय बांधिली?*
*मी मात्र हो मरें आज भुकेमुळे;*
*श्रीमंत हे नाचति मंदिरीं भले ।*
*हेवा तयांचा मजला मुळीं नसे;*
*जाडी भाकर ती मला पुरे असे;*
*कष्टांत देवा! मरण्यास तत्पर*
*कां मारिसी हाय! भुकेमुळे तत्पर?'*




या ओळींमध्ये केशवसुत समाज-व्यवस्थेतील विषमतेला वाचा फोडतात. श्रीमंतांचा मला हेवा वाटत नाही, फक्त माझी भाकरी मला मिळू द्या, असे म्हणणारा केशवसुतांचा 'मजूर' थेट 'भाकरीचा चंद्र शोधण्यात जिंदगी बरबाद झाली', असे म्हणणाऱ्या नारायण सुर्वेंच्या मजुराशी नाते सांगतो. पण जेव्हा हाच मजूर देवापुढे दाद मागायला लागतो, तेव्हा मात्र तो सुर्वेंच्या मजुरापासून विलग होतो. असे असले तरी केशवसुतांनी

*नारायण सुर्वे यांची कविता ही मूलतः कष्टाची, कष्टकऱ्यांची आणि कष्टकरी परिसराची कविता आहे. कष्टाला जात, धर्म नसल्याने, सुर्वेंच्या कवितेतील कष्टकरीदेखील कुठल्या विशिष्ट जातीचा, धर्माचा नाही.*

आधुनिक जगाशी जोडून घेतलेला सांधा, तसेच कवितेतील उदारमतवादी विचारसरणीतील व्यक्तिस्वातंत्र्य आणि समता यांसारखी मूल्ये महत्त्वाचीच आहेत.

*'नाहीं भाकर पोटाला*
*पाणीही नसे प्यायाला*
*व्याकुळ जीव हा झाला*
*पोटाला पडला ताण - डोळ्यांत सांचले प्राण!'*

असे म्हणणारा ग. ल. ठोकळ यांचा 'मजूर' (१९२८) हादेखील केशवसुत-सुर्वे यांच्या परंपरेशी साधर्म्य दाखविणाराच आहे. पण तो देखील अखेरीस 'पण हाय, कोपला देव-आडवे पडे दुर्दैव!' असे म्हणत देवाला दोष देत राहतो. साने गुरुजी यांचा 'मजूर'ही (१९३२)

*'आम्ही देवाचे मजूर*
*आम्ही देशाचे मजूर*
*कष्ट करूं भरपूर।।'*

असे म्हणत त्याचे नाते देवाशी-देशाशी सांगतो. खूप कष्ट करून 'दिव्यानंदाची' प्राप्ती करून घेण्यात त्याला रस आहे. त्याचे लेखी दुःख असे काही अस्तित्वातच नाही. साने गुरुजींचा हा मजूर कष्टावर श्रद्धा ठेवून आहे, इतकेच त्याचे आणि सुर्वेंच्या मजुरात साम्य आहे. मात्र अनंत काणेकरांचे गिरणीत काम करणारे 'दोन देवभक्त' (१९३२) साने गुरुजींच्या मजुरापेक्षा भिन्न आहेत. त्यातील एक भक्त देवभोळा आहे. 'आता कांही तरी असे कर, जाये मालास या भाव यें' असे म्हणत तो भविष्य देवावर सोडून देत हतबल होऊन राहिला आहे. हा कष्टकरी केशवसुत आणि ठोकळ यांच्या मजुराच्या कुळातील आहे. परंतु दुसरा भक्त हा वास्तविक 'कष्टभक्त' आहे. त्याला या विषम आणि अन्याय्य

जगाचा संताप आहे.

*'वाहोनी तुजला फुले फुकटचा पैसा हरू गाठचा;*
*गाड्या दोन मजेत तो उडवितो आहे धनी आमुचा!*
*आकाशातील पोलिसा! छळिसि कां दीनांस आम्हां बरें*
*देतो टाकूनि मूर्ती ही गिरणीच्या काळ्या धुरांड्यात रे!'*

तुला फुले वाहण्यावर माझा गाठीचा पैसा फुकट चालला आहे, असे देवाला सुनावत, त्याला शिवी हासडण्याचा मोह आवरत ('आकाशातील पोलिसा!' या शब्दात तो आवर लक्षात येतो), त्याची मूर्ती सरळ धुरांड्यात टाकून देण्याची धमकी देईपर्यंत तो मजल मारतो. ही बंडखोरीची सुरुवात सुर्वेंच्या कवितेची अवतरणिकाच बनते जणू! परंतु केशवसुतांच्या मजुरापासून सुरू झालेली ही परंपरा क्षीण होत गेली. त्याकाळच्या मराठी कवितेत वास्तवाला जिवंत प्रतिसाद देण्याचे जे प्रयत्न झाले, ते सुटे आणि एकाकी राहिले, आणि त्यामुळे स्वतंत्र बदल घडवू शकले नाहीत. एका बाजूने भावभावनांचे वैविध्य आणि नवीन रचनाप्रकार निर्माण होत असताना दुसरीकडे मराठी कविता स्थिर होत गेली, संकेतांनी बांधली गेली. विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या दशकांत झपाट्याने बदल होत होते तरी त्यास प्रतिसाद देण्यास मराठी कविता निष्प्रभ ठरत होती.




विसाव्या शतकाच्या मध्याच्या काळात, या जडत्वातून आणि संकेतांतून मराठी कवितेला मुक्त करण्याचे काम कवी बा. सी. मर्ढेकर यांनी केले. नव्या युगाचे भान घेऊन येणाऱ्या त्यांच्या कवितेला 'आधुनिकतेच्या नकारात्मकतेचे भान होते' केशवसुतांची परंपरा बळकट करीत त्यास बदललेल्या वास्तवाची जोड देत मर्ढेकरांनी आधुनिक

◆ *सुर्वेंच्या कष्टकऱ्याचे पसायदान काही लांबलचक नाही. 'मला माणसासारखे जगू द्या' हे इतकेच त्याचे मागणे आहे.* ◆

काळातील औद्योगिक कामगाराला मराठी कवितेत पुनर्स्थापित केले.

*'यंत्रयुगांतिल नवनृत्याचा*
*स्थाणुभाव हा प्रगटे येथें*
*मनोज्ञ मुद्रा शिल्पित एक*
*संगमरवरी मांसामध्ये'*

असे म्हणत 'घनःश्याम सुंदरा श्रीधरा गिरिणोदय झाला, उठी लवकरी दिनपाळी' अशी नव्या युगाची भूपाळी त्यांनी गायली.

*'शुभं करोति कल्याणं दारिद्र्य ऋण-संपही*
*शुद्धबुद्धीविनाशाय भोंगाकुत्री नमोस्तुते.'*

अशी नव्या युगाची सायंप्रार्थना म्हणत तिरकस अभिव्यक्तीचे दर्शनही घडवले. या परंपरेस साम्यवादी विचारांची जोड देत हा प्रवाह कवी विंदा करंदीकर यांनी आणखी पुढे नेला. कष्टकऱ्यांच्या घामाला 'स्वेदगंगा' म्हणत नवी प्रतिमासृष्टी निर्माण केली. 'ये यंत्रा ये!' (१९४९) म्हणत यंत्रांच्या शक्तीला त्यांनी केंद्रस्थानी प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. सृष्टीला आलिंगून समाजपुरुषाने जे मैथुन केले आणि ज्या विज्ञानरूपी वीर्यापासून ही यंत्रे उपजली, त्यांना नव्या युगधर्माचे संवर्धन करण्याची जबाबदारी विंदांनी सोपविली. 'साम्यवेद हा पंचमवेद म्हणा रे!' असे म्हणत कवितेला राजकीय स्वरूप दिले. यंत्रांना आवाहन करताना करंदीकर म्हणतात,

*'जाळीत ये, क्षाळीत ये,*
*भक्षित ये, रक्षित ये,*
*तोडित ये, जोडित ये,*
*कापित ये , पेरित ये,*
*रडवित ये, हसवित ये,*
*कुळवित ये, फळवित ये,*
*हाकारीत लाल शिडे*

*लाल लाल दर्यावर*
*लाल लाल क्षितिजांतुन*
*ये यंत्रा ये ! ये यंत्रा ये !'*

ही कविता सुर्वेंच्या कवितेच्या जवळ जाणारी होती. परंतु प्रतिमांचा सढळ वापर, दुर्बोध रचना आणि तिरकस अभिव्यक्ती म्हणजेच कविता असा समज झाल्याने आणि या वैशिष्ट्यांच्या त्याच-त्याच वापराने मराठी कवितेत साचलेपण येऊ लागले. प्रतिमांच्या अति वापरात वास्तव अनुभव दबले जाऊ लागले, आणि दुर्बोधतेमुळे कविता सामान्य वाचकांपासून फारकत घेऊ लागली. सुर्वेंच्याच शब्दांत सांगायचे तर पुरोगामी विचारांची कलावाद्यांनी साहित्यातून हकालपट्टी केली होती. आणि एकूणच साहित्याचा मुखडा हा व्यक्तिकेंद्रित व आत्मनिष्ठावादाचा पुरस्कार करणारा होता. १९४५ ते १९६५ याकाळात समीक्षक रा. श्री. जोग, वा. ल. कुलकर्णी, सरिता पदकी यांनी या साचलेपणाची आणि त्यामुळे होणाऱ्या नुकसानाची दखल घेतली. कविता म्हणजे समजण्यास कठीण, कविता समजणे म्हणजे काही तरी खास बाब अशा चुकीच्या समजुती स्थिरावत गेल्या. तसेच त्याकाळचे कवी जे प्रयोग करीत होते त्यावर पाश्चात्त्य कवितेचा प्रभाव होता. त्यामुळेदेखील ही कविता सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर राहिली असावी. कविता बहुजन-वर्गापासून तुटून अभिजन वर्गाच्या निकट गेली. केशवसुत आणि मर्ढेकरांची परंपरा यामुळे दुर्बल झाली.




समीक्षक नारायण सुर्वेंना केशवसुत आणि मर्ढेकर यांच्या परंपरेशी जोडतात. काही जण तर त्यांचा उल्लेख 'दुसरे केशवसुत' असा देखील करतात. परंतु सुर्वेंना तसे काही वाटत नाही. केशवसुत आणि मर्ढेकर या दोघांच्याही कविता सुर्वेंना आवडतात. त्याचे एकमेव कारण

***सुर्वे यांच्या कवितेतील कष्टकऱ्याचे हे चारित्र्य आहे आणि यातच त्याचे वेगळेपणही दडलेले आहे. हे चारित्र्य मांडणारी आणि त्याचे संदर्भ देणारी कविता सुर्वेंनी लिहिली. या कवितेचे बीज त्यांच्या जीवनानुभवाच्या सुपीक मृदेतूनच अंकुरले.***


म्हणजे या दोघांनी मानवता आणि माणूस या दोहोंवर दिलेला भर. अर्थात अभ्यासकांनी त्याकडे फार लक्ष दिले नाही, असे सुर्वेंना वाटत असे. 'कृष्णाजी केशव दामले' या कवितेत सुर्वे लिहितात –

*'आणि एक करा :*
*कधी आलातच तर*
*ट्रंक-वळकटी विसरलात तरी चालेल;*
*मात्र तेवढे तुमचे ते*
*उललेले, फाटलेले हृदय,*
*अशांत कल्लोळ,*
*अन् ते 'दिडदा, दिडदा'चे स्वर*
*न चुकता घेऊन या.*
*एकविसाव्या शतकातील माणसांना त्याचीही गरज आहे,*
*कृष्णाजी केशव!'*

या कवितेतून व्यक्त झालेल्या सुर्वेंच्या आणि केशवसुतांच्या काव्यभूमिका तसेच केशवसुत आजच्या जगात अवतरले तर या बदललेल्या जगाचा अनुभव घेताना त्यांची उडालेली तारांबळ यांतून नाट्यमयता दिसून येते. मर्ढेकरांच्या सौंदर्यशास्त्रावर जेवढे लिहिले गेले, तितके त्यांच्या माणसाविषयी कुणी बोलले नाही, याबद्दल सुर्वे खंत व्यक्त करतात. 'मर्ढेकरांशी एक बातचीत' या कवितेत सुर्वे लिहितात -

*'तसे मर्ढेकर, विद्यापीठवालेही चलाख निघाले*
*तुमचे शब्द बासनात बांधून तुमचे दुभंगलेपण कातून कातून सांगत*
*त्यावर एक सुंदरसे आध्यात्मिक कलम केले*
*तुमच्या माणसांची मुळें तर जमिनीत खोलवर रुजलेली*
*ते मात्र पानाफुलांवरच बोलत राहिले'*

या कवितेत मर्ढेकरांचे सुर्वेंना जाणवणारे महत्त्व आणि टीकाकारांचे त्यांच्याविषयीचे मत यामधील अंतर दिसते. हे अंतर दर्शवण्यासाठी वापरण्यात आलेल्या उपरोधिक स्वरामुळे ही कविता नाट्यात्म बनते. सुरुवातीच्या काही कवितांवर केशवसुत आणि मर्ढेकरांचा अस्पष्ट प्रभाव पडल्याचे सुर्वे मान्य करतात, पण त्यांच्या परंपरेतला असणे त्यांना मान्य नाही. मर्ढेकरांचे अंतिमतः परमेश्वराला शरण जाणे सुर्वेंना पसंत नाही. मर्ढेकरांचे अनुभवविश्व वेगळे असल्याने, असेल कदाचित, पण मर्ढेकर ठाकूरद्धारला टांग मारून कांदेवाडीचं बाहेरून चित्रण करतात. 'मी कांदेवाडीच्या आत घुसून तिचं चित्रण केले आहे.' असे सुर्वे एका मुलाखतीदरम्यान म्हणाले होते. कवितेला वास्तवाशी पुरेपूर न जोडण्यामुळे नंतरच्या कालखंडातील मराठी कवितेला जडत्व प्राप्त झाले असावे.




खरे तर याच काळात, मुंबई शहरातील वातावरण संघर्षमय झाले होते. मुंबईतील कापड गिरण्यांचे प्रश्न ऐरणीवर आले होते. समाजवादी आणि साम्यवादी विचारांची बैठक असणारी कामगार चळवळ जोमाने सुरू होती. संप, मोर्चे, घोषणा यांनी शहर दुमदुमून गेले होते. इ.स. १८९० साली नारायण मेघाजी लोखंडे यांनी स्थापन केलेली युनियन, इ.स. १९०५चा कामाच्या दबावाविरुद्ध गिरणी कामगारांनी पुकारलेला संप, इ.स. १९०८ साली लोकमान्य टिळक यांच्या अटकेच्या निषेधार्थ झालेला संघर्ष, इ.स. १९२० मधील 'ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस'ची स्थापना, १९४२चे भारत छोडो आंदोलन, इ.स. १९४६ सालचे खलाशांनी पुकारलेले बंड, १९५०च्या दशकातील संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन या व अशा अनेक घडामोडींनी मुंबईमधील वातावरण ढवळून निघाले होते. असे असताना कवितेत

***कुसुमाग्रज लिहितात, तुकारामांचे अभंग वाचताना ते पंथाचे आवरण वितळून जाते व आपण कवीच्या निखळ आध्यात्मिक बांधिलकीचा अनुभव घेतो. ही बांधिलकी खरं म्हणजे कवीची त्या अनुभवातील सामीलकी असते. सुर्वे यांची कविता या कुळातील आहे.***

मात्र जडत्व कसे आले? आजूबाजूचा काळ सतत काही तरी घडण्याचा होता, पण मराठी कविता या घटनांना प्रतिसाद देत नव्हती; कवितेला या बाह्यजगाशी काही घेणे-देणेच नव्हते जणू! मुंबईतील खलाशांच्या बंडावर कविता किती आहेत? त्याकाळच्या पिचलेल्या कामगार जीवनाचे विविध पैलू उलगडणाऱ्या कविता किती आहेत? अनुभवविश्वातील हा अभाव कवितेच्या जडत्वास कारणीभूत ठरलेल्या कारणांपैकी एक महत्त्वाचे कारण होते. बरेचसे कवी हे पांढरपेशा समाजातून आल्याने त्यांना कामगार-कष्टकऱ्यांचे हे जग केवळ बाहेरून परिचित होते. पण त्या जगाचे पक्के आणि वास्तव स्वरूप त्यांना माहीत नव्हते. म्हणूनच असे 'बाहेरून' केलेले चित्रण कमी-अस्सल प्रतीचे राहिले.

परंतु १९५०च्या आसपास ग्रामीण आणि कष्टकरी जग आतून पाहिलेले आणि या जीवनाशी घनिष्ठ संबंध असलेले कवी लिखाण करू लागले होते. आधुनिक कष्टकऱ्यांच्या वेदनेचे प्रतिबिंब कवितेत पडू लागले होते.

*'ओढा रे ओढा जोखड बळें*
*खांद्याला पडले डाग हे काळे*
*- डाग हे काळे*

......

*खोदा रे खोदा सोन्याची खाण*
*रक्ताच्या सड्यांत झळके सुवर्ण*
*- हें दुष्ट सुवर्ण'*

असे म्हणत शरच्चन्द्र मुक्तिबोध 'कष्टांचे गीत' गात होते. याच पार्श्वभूमीवर, 'रुद्ररूपी ज्याची शक्ती। मानवाची करितो भक्ती।।', असे 'कामगार-स्तवन' अण्णा भाऊ साठे गात होते. 'जग बदल घालुनी घाव।

सांगून गेले मला भीमराव।।' असे म्हणत बंडाचा झेंडा ते फडकवीत होते.

*'काम करून गिरणीत थकली रं,*
*माझी मालन कामानं सुकली।।'*

अशा लावण्या गात, आणि कामगारांच्या भावविश्वात अलगद शिरत, शाहीर अमर शेख कवितेचा पोत बदलवू पाहत होते.

## सुर्वे यांची चळवळीची गाणी आणि देशप्रेमाची कविता

नारायण सुर्वे यांनी एका विशिष्ट मनोवस्थेत कविता लेखनास प्रारंभ केला असावा. त्यांचे शिक्षण जेमतेम चौथीपर्यंत झालेले. लग्नानंतर सातवीची परीक्षेत उत्तीर्ण झाले. त्यांनी साहित्याचे किंवा लिखाणाचे कुठलेही विशिष्ट शिक्षण घेतले नव्हते. त्यामुळे कविता लिखाणाचे तंत्र ते कुठल्या महाविद्यालयात अथवा विद्यापीठात शिकले नव्हते. सौंदर्यशास्त्र, छंदोबद्ध रचना, यमके वगैरे प्रकारांशी त्यांची ओळख झालेली नव्हती. एका मुलाखतीत त्यांनी सांगितलेय की, ते जे लिहीत होते त्यास कविता




म्हणतात हेदेखील त्यांना माहीत नव्हते. मग ते लिहिते कसे झाले? त्याचा संबंध त्यांच्या चळवळीतील सहभागाशी आहे. शाहीर अण्णा भाऊ साठे, शाहीर अमर शेख तसेच शाहीर गवाणकर हे सभा आणि मोर्च्यांमध्ये प्रबोधनपर गाणी गाऊन लोकांना जागृत करीत असत. नारायण सुर्वेही कार्यकर्ते म्हणून सोबत असत. ही शाहीर मंडळी मंचावर गातायत आणि सुर्वे मागे टाळ घेऊन समूहामध्ये गात आहेत, असे चित्र असे. पक्षात बुद्धिवादी कार्यकर्तेही होते, त्यांच्याशी चर्चांमधून नवीन विषय समोर येत होते, पुस्तक वाचन

◆ ***समीक्षक नारायण सुर्वेंना केशवसुत आणि मर्ढेकर यांच्या परंपरेशी जोडतात. काही जण तर त्यांचा उल्लेख 'दुसरे केशवसुत' असादेखील करतात.*** ◆

जोमाने सुरू झाले होते. तसेच मुन्शी प्रेमचंद, साहिर लुधियानवी, कैफी आजादी यांसारख्या डाव्या विचाराच्या हिंदी, उर्दू साहित्यिकांशी त्यांचा संबंध आला. सुर्वेंच्या भाषेच्या समृद्धीला यामुळे नक्कीच हातभार लागला असणार. सतत बेभान होऊन चळवळीची गाणी त्वेषाने गाणारे, सतत नवनवीन चर्चा आणि साहित्य घडवणाऱ्यांबरोबर राहून आपणही काही तरी लिहावे, ही भावना घर करू लागली. चळवळीने दिलेले भान, थोरा-मोठ्यांच्या सहवासाने लाभलेले पोषक वातावरण, आणि लिहिण्याची प्रबळ ऊर्मी यांमुळे सुर्वे लिहिते झाले. कुठल्याही तंत्राचा, शास्त्राचा आधार न घेता ते लिहू लागले. इतरांना वाचून दाखवू लागले. इतरांनी केलेल्या कौतुकामुळे अधिक लिहू लागले.

सुरुवातीच्या काळातील त्यांनी लिहिलेल्या कविता गेय होत्या. त्या कवितांची गाणी झाली आणि चळवळीमध्ये नेहमी गायली जाऊ लागली. 'डोंगरी शेत', 'गाडी आणा बुरख्याची', 'लावणी गिरणीची' ही काही महत्त्वाची चळवळीतील गीते. यातील सर्वात महत्त्वाचे गीत म्हणजे 'डोंगरी शेत'. या गाण्याला शाहीर अमर शेख यांनी चाल लावली आणि ते गाणे लोकप्रिय केले.

*'डोंगरी शेत माझं गं मी बेनू किती*
*आलं वरीस राबून मी मरावं किती'*

शेतीचे प्रचंड कष्ट उपसणाऱ्या स्त्रीचे हे गाणे आहे. अत्यंत शारीरिक कष्ट घेऊन आपल्या तान्ह्याला घरात एकटे ठेवून ती डोंगरावरचे शेत कसत आहे. वर्षभरानंतर शेतात पीक डोलतंय तरीदेखील दारात सुख नाही, कारण सावकारी पाश!

*'आलं आलं वरीस जमीन नांगरून*
*उभं पीक नाचे सोन्यानं फुलून*
*पर एक मेला सावकार ठोला*
*हिसकून घेतो बाई सोन्याचा गोळा*

*असं उपाशी राहून गं आम्ही मरावं किती'*

शेतकऱ्याची गरिबी, बेभरवशाचा पाऊस, सावकारांकडून होणारी लुबाडणूक, महागाई, यामुळे कष्ट घेऊनही हातात काही येत नाही, अंगावर पुरेसे कपडे नाहीत. ही शेतकरी स्त्री फक्त कष्टाच्या फळाची अपेक्षा करते आहे. पण जर ते मिळत नसेल तर एकत्र येऊन हा जुलूम संपवला पाहिजे, अशी साद ही शेतकरी स्त्री घालीत आहे.

*'अक्षय ऱ्हाया कुंकू कपाळा*
*संसार वेलीच्या फुलवाया फुला*
*रूप नवं आणू माय धरतीला*
*तोडू जुलुमाचे काच, हे रावणी फास*
*एकीचं निशाण हाती.'*

'गिरणीची लावणी' हे असंच गीत. हे गीत कापड गिरणीतील कामगारांच्या कष्टाचे वर्णन करते. 'आमच्या घामातून आम्ही वसुंधरेला नटवतो' असे म्हणत हा कामगारसुद्धा 'डोंगरी शेत'मधील शेतकरी स्त्रीप्रमाणे आपल्या कष्टाच्या फळाची अपेक्षा करतो. तो म्हणतो –

*'निर्मून धन आम्ही सारं। मालक असून झालो चोर।*
*धनिकांचा वाढे जोर। ऐट दावून।*
*पैका नाही इंधनाला। काय शिजवावं बोला।*
*का शिवावं पोटाला। टाके घालून।।'*

सुरुवातीच्या कालखंडांत, विशेषतः 'ऐसा गा मी ब्रह्म' या पहिल्या काव्यसंग्रहात, या प्रकारची गेय कविता सुर्वेंनी मोठ्या संख्येने लिहिली. नंतर मात्र अशा रचना त्यांनी विशेष केल्या नाहीत. याचे कारण विशद करताना सुर्वे म्हणतात, 'माझ्यापाशी शीघ्र कवित्व नाही. चटकन प्रतिक्रिया व्यक्त करून मोकळा होण्याची किमया साधत नाही... शिवाय वृत्त वगैरेचे माझे ज्ञान नगण्यच आहे आणि चालींचा साठा असला तरी चटकन समरसून जाण्याची वृत्ती नाही. स्वाभाविकच मी गीतरचना करण्यापासून हळूहळू बाजूला सरकत गेलो.'


चळवळीच्या गाण्यांसोबत सुर्वेंनी देशभक्तीपर कवितादेखील केली. 'भारतीय जवानाचे पत्र', 'शहीद हो' अशा कविता त्यांच्या सुरुवातीच्या कालखंडातील आहेत. 'शहीद हो!' या कवितेत सुर्वे शहिदांच्या शौर्याचे

***कविता लिखाणाचे तंत्र ते कुठल्या महाविद्यालयात अथवा विद्यापीठात शिकले नव्हते. सौंदर्यशास्त्र, छंदोबद्ध रचना, यमके वगैरे प्रकारांशी त्यांची ओळख झालेली नव्हती.***

गीत गातात. तसेच शहिदांचे सर्वसामान्य जनतेशी नाते व्यक्त करतात. शहीद 'सूर्य' आहेत तर आम्ही 'पहाट' आहोत. त्यांनी सांडलेल्या रक्तामुळे स्वातंत्र्य अबाधित आहे. सुर्वे पुढे वर्णन करतात –

*'धैर्यमेरू हो तुम्ही, आम्ही उन्नत कडे*
*अन्यायी वादळाशी झुंजण्या ताठ खडे*
*श्वसन आणि सृजन तुम्ही, तुम्ही नवजीवन*
*अरुण तुम्ही, वरुण तुम्ही, तुम्ही चिरतरुण'*

पण सुर्वेंची सर्व देशभक्तीपर कविता स्तुतीपर नाही. 'आपला तो बाळ्या आणि दुसऱ्याचं ते कार्ट' या न्यायाने निव्वळ देशस्तुती करणाऱ्या नाहीत. खरे प्रेम असलेला बाप आपल्या मुलाचं सतत कौतुक न करता तो सुधारावा म्हणून त्याच्या चुका सांगतो, आणि गरज पडल्यास थोडा दम पण देतो, त्या थाटाची ही देशभक्ती आहे. अशा कवितांतून व्यक्त होणारी सामाजिक जाणीव महत्त्वाची आहे. 'माझ्या देशाच्या नोंद-बुकात माझा अभिप्राय' या कवितेत आपला देश सूर्यकुलाचा सभासद आहे असे कौतुक करताना कवी देशाच्या ठळक समस्या आपणापुढे मांडतो. स्वातंत्र्योत्तर काळात देशात झालेल्या शहरी विकासाचे 'तुझ्या बोटात हिऱ्याच्या अंगठीसारखे हे शहर झिळमिळते' या शब्दांत कवी कौतुक करतो. पण त्याच



वेळेला 'अरबी काठावरून तू स्वतःला कधी न्याहाळलेस काय?' असे सांगत सावधही करतो. शहरांचा विकास होत असताना डोंगरकुशीतील खेडी, शेती, गावकुसाबाहेरील वस्ती मात्र विकासापासून दूर राहिली, याची आठवण कवी देशाला करून देतो. स्त्रीकडे एक 'मादक आणि उत्तेजक पदार्थ' म्हणून पाहण्याचा दृष्टिकोन बळावल्याने तिच्यावरील अत्याचार वाढलेत, आणि त्यामुळे शरमेने दबून जायला होते आहे अशी नोंद कवी देशाच्या नोंदबुकात करतो. अखेरीस मात्र कवी या देशाला सुनावतोय. देशाचे हे प्रश्न सुटले नाहीत आणि आम्हाला क्रांती करणे भाग पडले तर मात्र आम्हांला दोष देऊ नकोस, असा अभिप्राय कवी नोंदवतो.

*'जर कधीकाळी,*
*अस्वस्थसे आम्ही -*
*देहाच्या वाती वळून, प्रज्वलित करून*
*तुझ्या निरांजनात पालवून*
*एका नव्या क्रांतीकडे, नव्या प्रकाशाकडे*
*आमचे घोडे उधळले; तर हे देशा --*
*कृतघ्नतेचे आरोप आमच्यावर करू नकोस*
*तुझ्या आकाशातील आम्हीही तारे आहोत*
*हे विसरू नकोस.'*

'जाहीरनामा' या कवितेतदेखील कवी देशाच्या पंचाहत्तर वर्षांच्या इतिहासाचा आलेख मांडतो. त्यातून कवी सांगत आहे, 'देशातील बदललेल्या परिस्थितीनुसार, आता जो नवा प्रक्षुब्ध नवागत येतो आहे त्याला आता जागा करून दिली पाहिजे. जे जुने पुतळे आहेत, ते आता हटवले पाहिजेत.'

*'आणि दोस्तहो!*
*मी पहातो आहे*
*एक क्षुब्ध नवागत गतीचे टोक धरून*
*लिहितो आहे;*
*हे शब्द हटवा... हे पुतळे...स्थितिस्थापक.*
*हवा आहे मनासारखा नवा जाहीरनामा म्हणून.*

◆ ***चळवळीने दिलेले भान, थोरामोठ्यांच्या सहवासाने लाभलेले पोषक वातावरण, आणि लिहिण्याची प्रबळ ऊर्मी यांमुळे सुर्वे लिहिते झाले.*** ◆

*नवा जाहीरनामा म्हणून.'*

'रायटर्स पार्क' सारख्या कवितेत कवी म्हणतो –

*'मीही या गंगेच्या काठावरील एका शहरातून आलो होतो.*
*यंत्रस्वामीच्या हृदयातील अभंग घेऊन'*

या ओळींमधील 'या गंगेच्या काठावरील' हा शब्दप्रयोग देशाबद्दल आस्थाच दर्शवतो. 'धरती महाराष्ट्राची' ही महाराष्ट्र राज्याची स्तुती करणारी कविता आहे. महाराष्ट्राची धरती आणि आकाश पाण्यात पडलेल्या रविचंद्राच्या प्रतिबिंबासारखी आहे, असे कौतुक करतानाच सुर्वे म्हणतात –

*'नवी संहिता रचते गिरणी*
*फेर धरूनिया डोले धरणी*
*श्रमणाऱ्या भुजेत गुंफते*
*हात आपुले वीजमोरणी.*
*महारथ दौडतो दिगंती उडवीत ध्वज यशाचे.'*

कापडगिरण्यांचे विकासातील केंद्रीय स्थान विशद करताना, कामगारांच्या श्रमामुळेच या महाराष्ट्राच्या विकासाचा महारथ यशाचे ध्वज रोवणार असल्याचे ते नमूद करतात.

❖❖❖

# सुर्वे यांच्या कवितेचे सूत्र : व्यक्ती आणि समष्टीचे एकत्व

जसजसे नारायण सुर्वे अधिक लिहीत गेले तसतसे चळवळीतील गेय कवितांचे तसेच देशप्रेमावर आधारलेल्या कवितांचे प्रमाणही तुलनेने कमी होत गेले. सुर्वे गीतरचना सोडून काव्यलेखनाकडे वळले. त्यांच्याच भाषेत



सांगायचे तर ते ‘अधिकात अधिक सूक्ष्माकडे वळले’. सुर्वे म्हणतात, ‘काव्यरचना ही गोष्ट स्वतःला मुरवत-मुरवत सांगण्यासारखी आणि अधिक मनःपूर्वकतेने परंतु कष्टसाध्य व हे कष्ट घेताना येणारा त्यातील निर्मितीचा अपूर्व आनंद अनुभवाने मला आवडू लागला.’ नारायण सुर्वे यांची कविता ‘जसा जगत आहे मी तसाच शब्दांत आहे’ या एका सूत्रावर उभी आहे. याच सूत्राच्या आधारे त्यांची कविता समजावून घ्यावी लागेल. म्हणजे सुर्वेंच्या कवितेत पांढरपेशा समाजाचे चित्र का नाही? ही कविता फक्त कष्टकऱ्यांच्या जीवनाभोवती का फिरत राहते? कवितेत वापरली गेलेली भाषा अशी का? वगैरे प्रश्न आणि त्यावरील टीका गैरलागू ठरेल. आता कविता समजावून घेताना कवीच्या जीवनाला किती महत्त्व द्यायचे हा वादाचा मुद्दा असू शकेल. काही समीक्षकांनी कवीचे जगणे गौण असल्याचे मत व्यक्त केले आहे. परंतु सुर्वेंची कविता अभ्यासताना त्यांचे जीवन बाजूला सारता येत नाही, इतकी ही कविता त्यांच्या जीवनाशी

◆ *सुरुवातीच्या कालखंडांत, विशेषतः ‘ऐसा गा मी ब्रह्म’ या पहिल्या काव्यसंग्रहात, या प्रकारची गेय कविता सुर्वेंनी मोठ्या संख्येने लिहिली. नंतर मात्र अशा रचना त्यांनी विशेष केल्या नाहीत.* ◆

समरस झालेली आहे. आणि म्हणूनच ही कविता अस्सल अनुभव देते आणि सुर्वेंच्या पूर्वसुरींपेक्षा स्वतंत्र उठून दिसते.

सुर्वे स्वतः कामगार असल्याने आणि गिरणगावात त्यांच्या आयुष्याची ३०-३५ वर्षे गेल्याने, त्यांच्या कवितेतून व्यक्त झालेले अनुभव अस्सल आहेत. सुर्वे घर ते काम आणि काम ते घर असे परीटघडीचे आयुष्य जगणारे नव्हते. कामगार भागातल्या चळवळींमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असायचा. त्यामुळे अनेक माणसे त्यांना भेटली. आयुष्यात माणसे वाचायला शिका. मग त्यांची परिस्थिती अभ्यासा, म्हणजे वास्तवाशी तुमचा परिचय होईल, मग सवड मिळाली तर ग्रंथ वाचा. कारण ग्रंथ चुकीचे बोलू शकतील, पण वास्तव कधी खोटे बोलणार नाही. असा सुर्वेंचा त्यांच्यापुरता सिद्धान्त होता. सुर्वेंच्या अफाट निरीक्षण शक्तीमुळे त्यांनी कामगार जीवनाचे विविध पदर उलगडले. त्यांच्या दुःखाचा पोत, त्याचे विविध स्तर, त्यांच्या भावनिक विश्वाचे नाजूक क्षण त्यांनी बेमालूमपणे टिपले. या माणसांकडे पाहताना सुर्वेंना प्रश्न पडत, अशा नरकावस्थेतही ही माणसे सौंदर्य निर्माण करीत नाहीत काय? हा प्रचंड मानवी समुद्र केवळ ‘झुंडच’ आहे काय? या झुंडीला इतिहास नाही काय? तिला एक गती, एक चेतना, एक सजीवता नाही काय? या आणि अशा अनेक संबंधित प्रश्नांची उत्तरे सुर्वे शोधीत राहिले. या शोधातच सुर्वेंच्या काव्यनिर्मितीची बीजे दडलेली आहेत. आपली कविता कशी निर्माण होते ते सांगताना सुर्वे म्हणतात, मी आधी माणसे वाचतो. परिस्थिती वाचतो. त्यामध्ये मी कुठे आहे हे स्वतः आधी आजमावून घेतो आणि मग समोरची माणसे, समोरची परिस्थिती आणि मी यांचे कुठेतरी एकत्व तयार होते आणि त्या एकत्वातून माझ्यातला जो कवी आहे तो त्याला शब्दरूप देण्याचा प्रयत्न करतो. त्याची कविता होते. हे वाचले म्हणजे ध्यानात येते की, सुर्वेंनी व्यक्ती हा समाजाला फटकून असणारा घटक

मानला नाही. व्यक्ती आणि समाज यांच्यातील एकत्व त्यांना महत्त्वाचे वाटले. तसे एकत्व त्यांना गिरणगावच्या कामगारभागात प्रत्ययाला आले. व्यक्ती आणि समष्टीचे हे एकत्व सुर्वेंच्या कवितेचे व्यवच्छेदक लक्षण आहे, किंबहुना ती त्यांच्या कवितेची ओळख आहे. अनेक मुलाखती आणि गद्य लेखनातून सुर्वेंनी ते स्पष्ट केले आहे. 'ऐसा गा मी ब्रह्म' या पहिल्या संग्रहातील 'चार शब्द' ही कविता त्यांच्या आगामी कवितेची दिशा स्पष्ट करते.

*'रोजीचा रोटीचा सवाल रोजचाच आहे*
*कधी फाटका बाहेर कधी फाटका आत आहे*
*कामगार आहे मी तळपती तलवार आहे*
*सारस्वतांनो! थोडासा गुन्हा करणार आहे.'*

रोजच्या जगण्याच्या प्रश्नांची आणि ते सोडविताना कराव्या लागणाऱ्या संघर्षाची ही कविता आहे. हा संघर्ष सर्व ठिकाणी आहे. कामाच्या ठिकाणी आहे, घरात आहे, रस्त्यावर आहे. पहिल्याच कडव्यातील शेवटची ओळ सुर्वेंच्या टीकाकारांना उद्धटपणाचा प्रत्यय देणारी वाटली. 'नाही रे' वर्गाचे अस्तित्वच मान्य न करणारे, या वर्गातील माणसांना खिजगणतीतही न धरणारे, त्यांना 'उपरे' मानणारे, त्या अंधाऱ्या, अडाणी, गलिच्छ जगात कसले आलेय सौंदर्य?, या राबराब राबणाऱ्यांना कसल्या आहेत भावना? असे मानणाऱ्या 'पांढरपेशा सारस्वत' वर्गाला सुर्वेंची ही प्रामाणिक समज आहे. त्यांचे असे लिहिणे हा या वर्गाला गुन्हा वाटणार आहे, हे आधीच जाणून त्यांनी तसे लिहिले आहे, आणि ते खरेही झाले आहे. ही कविता 'अप्रस्तुत' मानल्या गेलेल्या कामगार विश्वाचे दर्शन सारस्वतांना घडवणार असल्याने 'हा गुन्हा असला तरी मी तो करणार आहे', असा कवीचा सूर आहे. बरेचदा वंचितांच्या आणि दुर्लक्षिलेल्यांच्या मनात, आपण गरीब आहोत, आजूबाजूच्या प्रगत समाजापेक्षा कुठेतरी मागे पडलो आहोत, इतरांकडे असणाऱ्या गोष्टी आपल्याकडे नाहीत, याचा एक न्यूनगंड, कमीपणाची भावना मनात घर करते. पण कष्ट करण्यात कुठला कमीपणा? वास्तविक, 'आहे रे' वर्गाकडे जे आहे ते 'नाही रे' वर्गाच्या श्रमाची निर्मिती आहे. त्यामुळे अशी कमीपणाची भावना बाळगणे व्यर्थ आहे. अशी भावना त्यांच्या संघर्षाला दुर्बल करणारी

◆ *सुर्वेंची कविता अभ्यासताना त्यांचे जीवनरू बाजूला सारता येत नाही, इतकी ही कविता त्यांच्या जीवनाशी समरस झालेली आहे.* ◆

आहे. सुर्वेंना 'कामगार आहे मी तळपती तलवार आहे' या ओळीतून कामगारांच्या स्वाभिमानाची जाणीव करून द्यायची आहे. 'तळपती तलवार' ही कुठल्या वर्गाची हिंसक हानी घडवणारे वास्तविक शस्त्र नसून ते कामगारांच्या स्वाभिमानाचे प्रतीक आहे. सुर्वेंच्या कवितेत त्यांच्या जगाची 'गंधवेणाही' आहे. कवितेतील 'मी' हा शब्द कुणा व्यक्तीला लागू होत नाही, तो साऱ्या कामगारवर्गाचे प्रतिनिधित्व करतो आणि त्याच्यामागे विषम समाजव्यवस्थेचा आणि त्याविरुद्ध दिल्या गेलेल्या लढ्याचा सारा इतिहास आहे. म्हणून सुर्वेंच्या कवितेला 'युगाचीही साथ आहे', आणि कामगारांचे हे जगच येणाऱ्या युगाचे नेतृत्व करणार आहे, त्यांच्या अस्तित्वाची आणि जगण्याची 'राजमुद्रा' घडवणार आहे, असा आत्मविश्वास त्यांना वाटतो. ही कविता आणि सुर्वेंच्या इतरही कविता कवी आणि कामगार यांच्या जीवनाच्या एकत्वाचे प्रतिनिधित्व करतात. व्यक्ती आणि समष्टीचे हे एकत्व चित्रित करताना त्यांची कविताही त्यात सामील होते. 'ऐसा गा मी ब्रह्म' या काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेत कुसुमाग्रज यांनी म्हटले आहे 'श्री. नारायण सुर्वे हे कामगार जीवनाशी केवळ समरस झालेले नव्हे, तर ते जीवन प्रत्यक्षात अनुभवणारे कवी आहेत... श्री. सुर्वे यांच्या काव्याचे वैशिष्ट्य असे की, त्यांनी पुस्तकांच्या कपाटात आपली स्फूर्तिस्थाने शोधलेली नाहीत. यामुळे कवीचे जीवन आणि त्याची कविता यांचे अद्वैत तयार होते. म्हणूनच सुर्वेंची कविता आत्मनिष्ठ असली तरी तिची वृत्ती बहिर्मुख आहे.'

या अद्वैताचा प्रत्यय त्यांच्या 'माझे विद्यापीठ' या नावाजलेल्या कवितेत येतो. जन्मल्यानंतर काही महिन्यांतच सुर्वे यांच्या आईने त्यांना रस्त्याच्या कडेला सोडून दिले होते. ते गंगाराम सुर्वे यांच्या घरी 'बाळगलेला' मुलगा म्हणून वाढले. त्यामुळे सुर्वे आणि रस्ता यांचा फार जवळचा संबंध आहे. पुढे सुर्वे थोडे मोठे झाल्यानंतर गंगाराम सुर्वे घर सोडून गावी राहायला गेले, तेव्हा सुर्वे पुन्हा रस्त्यावर आले. लग्न झाल्यानंतरदेखील त्यांनी आणि

कृष्णाबाईंनी काही रात्री दुकानाच्या आडोशाला काढल्या. सुरुवातीच्या काळात ज्या प्रकारच्या झोपडीवजा घरात ते राहिले, तेथेही सोबत रस्त्याचीच होती. आपले म्हणावे असे त्यांना कोणी नव्हतेच. म्हणूनच 'माझे विद्यापीठ' या कवितेच्या पहिल्या ओळीत ते लिहितात– '*ना घर होते, ना गणगोत, चालेन तेवढी पायाखालची जमीन होती*

*दुकानांचे आडोसे होते; मोफत नगरपालिकेची फुटपाथ खुलीच होती.'*

सांभाळायला, संरक्षण करायला, शिकवायला आई-वडीलच नसल्याने सुर्वे स्वतःच दररोजच्या आव्हानांना तोंड देत, त्या अनुभवांतून शिकत जगले. तिथेच त्यांना विविध माणसे भेटली. कुणी खायला दिले, पाणी दिले, आडोसा दिला. कुणी अपमान केले, शिव्याही दिल्या, तर कुणी पुस्तके दिली, भाषा शिकवली. कुणी शब्द दिले, कुणी स्वप्ने दिली. याच रस्त्याने हातात खड्ग दिले आणि फुलंही! आदी आणि अंत नसलेला आणि रोकड्या वास्तवाचे प्रतीक असलेला हा रस्ता, त्यावर नांदणारे कष्टकऱ्यांचे जीवन आणि हरेक रंगातील माणसे आणि तेथील अनुभव हेच तेव्हा चौथी शिकलेल्या सुर्वेंचे विद्यापीठ बनले.

*'आयुष्य दिसायला पुस्तकाच्या कव्हरासारखे गोंडस,*
*गुटगुटीत, बाळसेदार.*
*आत खाटकाने हारीने मांडावीत सोललेली धडे,*
*असे ओळीवर टांगलेले उच्चार'*

या वास्तवाचे दर्शन सुर्वेंना या विद्यापीठानेच घडवले. माणसातला नराधम पाहण्याऐवजी 'सृजनात्मे'च पाहण्याचे धडेदेखील याच विद्यापीठाने दिले.

*'तरी का कोण जाणे! माणसाइतका सृजनात्मा मला भेटलाच नाही*
*आयुष्य-पोथीची उलटली सदतीस पाने; वाटते,*
*अजून काही पाहिलेच नाही'*

या सर्व प्रवासात माणूस म्हणून आपण प्रगल्भ झालो का? हे सतत तपासून पाहणे गरजेचे असते. अनुभवांतून शिकलोच नाही तर काय हशील! मग माणसे नुसती वयाने वाढतात आणि राष्ट्रे नुसती नकाशावर पसरतात.

*'वाढले म्हणतात पृथ्वीचे वय, संस्कृतीचेही; फक्त वयेच वाढत*

◆ ***व्यक्ती आणि समाज यांच्यातील एकत्व त्यांना महत्त्वाचे वाटले. तसे एकत्व त्यांना गिरणगावच्या कामगार भागात प्रत्ययाला आले.*** ◆

*गेली सर्वांची*
*छान झाले; आम्हीही वाढतो आहोत नकाशावर.*
*गफलत खपवीत जुळाऱ्यांची.'*

अनुभवातून न शिकल्याने आणि माणसाचे सच्चे रूप न पाहिल्याने जाती-धर्माचे मुखवटे घालून माणसे वावरतात. त्यातून दंगे होतात. माणसे मरतात. शोषणाविरुद्ध माणसे आवाज उठवतात. मग काय –

*'धुसफुसे तो, पोटऱ्या ताठ होत, भराभरा भरी रेलच्या वाघिणी*
*एक दिवस काय झाले; त्याच्या डोळ्यांत पेटले विद्रोहाचे पाणी'*

मग संघर्ष अटळ आहे नि त्याचे परिणाम भोगणेही! प्रस्थापित विद्यापीठे देणार नाहीत असे कितीतरी धडे या विद्यापीठाने सुर्वेंना दिले.

*'आता आलोच आहे जगात, वावरतो आहे ह्या उघड्यानागड्या*
*वास्तवात*
*जगायलाच हवे; आपलेसे करायलाच हवे; कधी दोन घेत;*
*कधी दोन देत.'*

इतक्या कष्टात आणि हलाखीत दिवस व्यतीत करताना देखील त्यांचा माणसावरील विश्वास कधी ढळला नाही. इतके असूनही या जीवनाचा 'स्वीकार' ते करतात, त्यात कुठली हतबलता नाही, देवावर-ईश्वरावर विसंबून राहणे नाही. कुरबुर करत निराश होऊन बसण्यापेक्षा वास्तव जगणे आणि त्यास आपलेसे करणे याला तरणोपाय नाही हे त्यांना उमजले. सतत संघर्षशील राहणे आणि पाठ दाखवून पळून जाण्यापेक्षा, जीवनाला सरळ भिडणे हा मूलमंत्र या विद्यापीठाकडून सुर्वेंना मिळाला. या जगाशी माणसाला केंद्रस्थानी मानणे आणि माणसातील सृजनावर, माणुसकीवर श्रद्धा असणे ही जशी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची लक्षणे होती तशीच त्यांच्या कवितेचीही.

'मुंबई' ही सुर्वेंची आणखी एक महत्त्वाची कविता. त्यांचे जीवन आणि कवितेतील एकत्व यातील प्रत्यय घडवून देणारी. त्यांच्या वडिलांसारखेच

कितीतरी लोक कोकण आणि पठारावरून मुंबईत श्रम विकण्यासाठी आले आणि मुंबईकर झाले.

*'पटकूर खांद्यावर टाकून, सह्याद्री घाट उतरून*
*माझा बाप तुझ्या दारावर उभा राहिला श्रम घेऊन'*

हे त्यांच्या कामगारजीवनाचेच खरे चित्रण आहे. पगाराच्या दिवशी दारू प्यायलेला बाप आईला आणि मुलाला मारी, हे नित्याचेच. मुलाला बापासाठी जेवणाचा डबा घेऊन साच्यावर म्हणजेच कापडगिरणीत जावे लागत असे. रोज घर ते साचा अशी पायपीट करताना कामगारांच्या वस्तीचे आणि तेथील व्यवहारांचे दर्शन घडत असे. साच्यावर गेल्यावर गिरणीतील विश्वाचे आणि तेथे चड्डी-बनियनमध्ये यंत्रवत काम करणाऱ्या कामगारांचेही दर्शन घडत होते.

*'कळू आले तेव्हापासून डबा घेऊन साच्यावर गेलो*
*घडवतो लोहार हातोड्या तसाच घडवला गेलो*
*शिकलो तार कशी लावावी, बाबीण कशी भरावी धोट्यात*
*वेळ आलीच तर हक्कासाठी केव्हा करावी आऱ्या खात्यात'*

बापाने जेव्हा देह ठेवला तेव्हा त्याच्या जागेवर मुलाला नेमला. आणि मग आपल्या श्रमांतून आपण नक्की घडवतोय काय आणि ही मुंबई नगरी आपल्याला कशी वापरून घेतेय हे त्याच्या ध्यानात येते.

*'तोच मी, तेच आम्ही, ह्या तुझ्या वास्तुशिल्पाचे शिल्पकार*
*तुझ्या सौंदर्यात हे नगरी! दिसोंदीस घालीत असतो भार*
*नरकासम चाळीत राहूनच स्वच्छ करतो तुझे रस्ते*
*उठवले जातो कधी, दंडुकेवाले जसे उठवतात फिरस्ते*
*असे आम्ही लक्ष नारीनर दिवस असेतो वावरतो*
*राबता, खपता आयुष्य मेणबत्तीस विझवुन घेतो'*

या ओळींत कष्टकऱ्यांचे कठीण आणि दुर्लक्षित जीवन आणि त्यांच्याच श्रमांतून साकारलेले मुंबईचे सौंदर्य हा विरोधाभास छान टिपला गेला आहे. अशा तऱ्हेने या मुंबईवर स्वतःचे संस्कार करीत हा कष्टकरी मोठा होतो, संसार थाटतो, स्वतःच्या मुलांना मुंबई फिरवून आणतो.

*'सणासुदीत फिरवतो मुलांना खांद्यावर गर्दीच्या सोहळ्यात*
*ताटव्यांनी फुलतो राजपथ माझीही कृष्णफुले खिदळतात'*

◆ ***हा प्रचंड मानवी समुद्र केवळ 'झुंडच' आहे काय? या झुंडीला इतिहास नाही काय? तिला एक गती, एक चेतना, एक सजीवता नाही काय? या आणि अशा अनेक संबंधित प्रश्नांची उत्तरे सुर्वे शोधीत राहिले.*** ◆

पण एव्हाना मुंबई बदललेली असते. जातीय दंगे आणि बॉम्बस्फोट यांनी दुभंगलेली असते. मुंबई फिरताना मुलगा विचारतो,

*'बाबा - ह्या दगडाच्या भिंती. पोलिस इथे पहारे का हो देतात?'*

या प्रश्नाने बाप हादरतो. कुठले शहर देणार आहोत आपण आपल्या मुलाला? त्याच्या आयुष्यात काही बदल होणार की नाही? की आपल्याचसारखे झिजणे आणि उदास रात्री त्याच्याही वाट्याला येणार? अशा प्रश्नांनी त्याचा आत्मा चरफडतो.

*'झिजला चंदनासम बाप; मीही तसाच, अन् हे माझे कळे?*
*अशाच त्यांनाही उदास रात्री, सोबतीस काळोखाचे गार वेटोळे'*

मुंबई शहराविषयी इतकी भावनापूर्ण प्रतिक्रिया देणारी आणि 'स्फूर्तिशाली कविता' असा गौरवपूर्ण उल्लेख करणारी कविता अपवादात्मकच म्हणावी लागेल. '' 'माझे विद्यापीठ' आणि 'मुंबई' सारखी कविता मी पुन्हा लिहू शकणार नाही. या कवितांनी मला पुरते थकवलेय'' असे सुर्वे म्हणत असत.

चिं. त्र्यं. खानोलकरांनी 'हे कुणाचे विद्यापीठ?' या लेखामधून 'माझे विद्यापीठ' या कवितेवर घणाघाती टीका केली. 'कवितेतील अनुभव इथला नाही आणि कवीसुद्धा या देशाचा आहे किंवा नाही असा मला प्रश्न पडतो, सुर्वेंची कविता ही एक स्वप्नरंजनात्मक कविता आहे', असे त्यांनी म्हटले. कवीने प्रत्यक्ष जगलेल्या आणि अनुभवलेल्या जगाचे अस्तित्वच नाकारणारी, कवीच्या स्वदेशातील मुळांबद्दल शंका घेणारी आणि वास्तवाला स्वप्नाचा रंग देण्याचा प्रयत्न करणारी ही टीका विशिष्ट वर्गाचे प्रतिनिधित्व करणारी होतीच, पण तसेच कष्टकऱ्यांचे माणूसपण नाकारण्यात धन्यता मानणारी होती. सुर्वेंनी 'माझी कविता समोर आहे आणि ती स्वतःच उत्तर आहे.' इतकीच प्रतिक्रिया दिली. त्यावेळी नरहर कुरुंदकर, पु. ल. देशपांडे, श्री. पु. भागवत अशी जाणकार मंडळी सुर्वे

यांच्या बाजूने उभी राहिली. सुर्वेंच्या कवितेने केलेला गुन्हा सारस्वतांना पचायला अंमळ जास्त वेळ लागला हे खरेच! पण मराठी साहित्यात अभावानेच आढळणारे एक 'अप्रस्तुत' जग सुर्वेंच्या कवितेतून जगासमोर आले आणि या कवितेने त्या अंधाऱ्या जगाचा कानाकोपरा उजळून निघाला, हे सत्य नाकारता येणार नाही.

## सुर्वे यांच्या कवितेतील व्यक्तिचित्रे : व्यक्ती आणि समष्टीच्या मिलाफाचे रसायन

नारायण सुर्वे यांनी कवितेत बरीच व्यक्तिचित्रे उभी केली. चंद्रा नायकीण, याकूब नालबंदवाला, दाऊदचाचा शिगवाला, उस्मानचाचा, आफ्रिकीचाचा, सुंद्री, चंद्रा आणि इंदी या वेश्या, हणम्या आणि इसल्या ही पोस्टर डकवणारी मुले, अशी नावे असणारी आणि नसणारी किती तरी पात्रे त्यांनी प्रत्यक्ष जीवनातून कागदावर उतरवली. या व्यक्तींचे प्रत्यक्ष किंवा ओझरते दर्शन त्यांना आयुष्यात नक्की झाले असणार! ही सर्व माणसे कष्टकरी, कामगार आहेत. प्रत्येक जण आपल्या आयुष्यात लढतोय. कष्टाची भाकरी मिळवण्यासाठी धडपडतोय. ती मिळाली नाही तर संघर्ष करतोय आणि यामुळे उद्या नक्की भाकरी मिळेल याची आशा करतोय. पण कुणी कायमस्वरूपी निराश होत नाही, उदासवाणे, बापुडवाणे होत नाही. जीवनाचे चांगले, वाईट अनुभव घेता घेता ही माणसे शिकतायत. ही सर्व माणसे आजूबाजूच्या जगाशी समरसून गेली आहेत. त्या समरसतेमधून जीवनाविषयी निष्कर्ष काढतायत. स्वःचे तत्त्वज्ञान मांडतायत. यातील एकेका व्यक्तीने मांडलेले तत्त्वज्ञान हे वास्तविक त्यांच्या समष्टीचे तत्त्वज्ञान आहे. एका विराट कामगार जगाचे चित्रण करताना, नारायण सुर्वे अधून-मधून भिंगाद्वारे सूक्ष्म पातळीवर येतात आणि तिथे या सर्व व्यक्तिरेखा अगदी रेखीवपणे समोर येतात. कवितेत त्या व्यक्तींच्या जीवनातील काही मिनिटांचा तुकडा दिसतो आणि वाचकाला त्यात एक अफाट जीवनदर्शन घडते. जेव्हा या व्यक्तिरेखा त्यांच्या जीवनाबद्दल आणि पर्यायाने आजूबाजूच्या जगाबद्दल काही प्रतिक्रिया देतात, तेव्हा पुन्हा एकदा विराट कामगार जगाचे दर्शन घडवितात. सुर्वे कवितांमधून वाचकाला विराटातून सूक्ष्माकडे आणि पुन्हा

◆ *कवितेतील 'मी' हा शब्द कुणा व्यक्तीला लागू होत नाही, तो साऱ्या कामगारवर्गाचे प्रतिनिधित्व करतो आणि त्याच्यामागे विषम समाजव्यवस्थेचा आणि त्याविरुद्ध दिल्या गेलेल्या लढ्याचा सारा इतिहास आहे.* ◆

सूक्ष्मातून विराटाकडे असा विलक्षण प्रवास घडवून आणतात, आणि वाचकाला समृद्ध करतात. यामुळे अशा कवितांची रचनादेखील बदलते. या कविता संवादातून पुढे सरकतात, त्या-त्या पात्रांच्या भाषेत बोलतात, आणि भावभावनांचे आणि घटनांचे नाट्य उभे राहते.

'माझे विद्यापीठ' या कवितेत घोड्यांचे नाल ठोकणारा याकूब नालबंदवाला, कापडगिरणीत काम करणारी चंद्रा नायकीण (गिरणीत काम करणाऱ्या स्त्री-मुकादमास 'नायकीण' असे म्हणतात), आणि बोटीवर काम करणारा आफ्रिकीचाचा ही पात्रे ठळकपणे उभी रहातात. कष्ट करणारा याकूब दंगलींमध्ये मरतो. चंद्रा नायकिणीचा मुलगा महायुद्धात मारला जातो. आफ्रिकीचाचा बंड करतो म्हणून त्याला पकडून नेले जाते, पण पुन्हा तो दिसत नाही. या तिघांचेही प्रेम कवितेतील निवेदकाला मिळाले आहे. स्वतःच्या घासातला घास काढून देणारा याकूब, आपला मारला गेलेला मुलगा निवेदकात बघत त्याला मायेने कुशीत घेणारी चंद्रा, निवेदकाला 'बेटा' म्हणत त्याच्या पाठीवरून प्रेमाने हात फिरवणारा चाचा या साऱ्या व्यक्ती निवेदकाला शिकवून जातात. 'शिगवाला' कवितेतील दाऊदचाचा हा खाटीक एका हिंदू स्त्रीला दंगलीमधून वाचवताना पाय गमावून बसतो. त्यातून दाऊदचाचा बदललेल्या जमान्याचे तत्त्वज्ञान सांगतो –

*'तो बेटे --*
*आता आदमी झाला सस्ता ----- बकरा महाग झाला*
*जिंदगीमध्ये पोरा, पुरा अंधेर आला,*
*आनि सब्दाला;*
*जगवेल असा कोन हाये दिलवाला*
*सबको पैसेने खा डाला.'*

स्वातंत्र्यानंतर उद्‌भवलेल्या दंगलीचा दाऊदचाचा हा सच्चा साक्षीदार आहे. त्याला मिळालेले वास्तवाचे फलित तो दुःखी होऊन सांगत नाही, अत्यंत व्यथित होऊन सांगतो. आणि शेजारच्या पोराला शब्द जागवण्यातले महत्त्व सांगतो –

*‘एक ध्यानमदी ठेव बेटा!*
*सबद लिखना बडा सोपा है*
*सब्दासाठी जीना मुश्किल है।’*

‘मनीऑर्डर’ या कवितेतील, परिस्थितीमुळे वेश्या व्यवसायात आलेली आणि वेदना भोगलेली स्त्री म्हणते –

*‘बगा, मला हसू येतंय,*
*सांगू का नगं, असं व्हतंय....*
*मागं याक गिऱ्हाईक आलं,*
*‘हितं ऱ्हान्यापरीस*
*बाईल व्हशील का?’ म्हनलं..*
*‘आता हाय की मी शेजला तुमच्या’*
*म्या म्हनलं, तवा ते तरपाटलं.*
‘अख्ख्या पुरुस जातीचं मला हसू आलं.’

ही स्त्री प्रचंड दुःखाचा डोंगर छातीवर ठेवूनही आपल्या जगण्यातले सूत्र सांगते आहे. या वरकरणी साध्या वाटणाऱ्या ओळींत ही वेश्या तिच्या वर्गाचे चरित्रच कथन करतेय. दुःख देखणे करून दाखवण्याच्या पलीकडे गेलेली ही माणसे आहेत. ‘पोर्टरची स्वगते’ या कवितेत रेल्वे फलाटावरील हमाल त्यांच्या आयुष्यातील लेखाजोखा मांडीत आहेत. हातावर पोट असणारी ही माणसे. स्टेशन-मास्तरने काढून फेकायला सांगितलेले चिमणीचे घरटे बघून तो हमाल रुळाजवळ वाळलेले गवत आणून ठेवतो, म्हणतो –

*‘म्हनलं बांधा... बांधा घरटी*
*आपल्याला ऱ्हायाला ऱ्हाय तर ऱ्हाय*
*पर अनजान पराण्यांसाठी तर हवंच.’*

*गावातील शाळेला मजला चढवायचाय, तर ‘आपनबी धा रुपय घालाय पायजे’* असं त्या हमालाला वाटतं, आणि

***आदी आणि अंत नसलेला आणि रोकड्या वास्तवाचे प्रतीक असलेला हा रस्ता, त्यावर नांदणारे कष्टकऱ्यांचे जीवन आणि हरेक रंगातील माणसे आणि तेथील अनुभव हेच तेव्हा चौथी शिकलेल्या सुर्वेंचे विद्यापीठ बनले.***

*'निसतं पोटार्थी व्हन्यात मानूस कंडम व्हतो'*

असे तत्त्वज्ञान तो ऐकवतो. कुठल्याही शाळेत मूल्य-शिक्षणाचे धडे न घेतलेली ही माणसे, कुठे शिकत असतील हे तत्त्वज्ञान? रेल्वे अपघातात बेवारशी प्रेतांना खांदा द्यायला आपणहून पुढे येणारा हमाल म्हणतो, 'मानसाला इतकी घान असती?' या माणसाचे राजकीय भान पाहिले तर अचंबा वाटतो. नुकत्याच फलाटावर लागलेल्या ट्रेनचा सलीम ड्रायवर हमालांशी बोलताना म्हणतो,

*'अपने घोडेको पाणी पिलाव*
*और इंजिनको खोयला खिलाव*
*साला अपन लोगच पांडू है*
*इसलिये इंडियाका पॉलिटिक्स गांडू है।'*

'नेहरू गेले तेव्हाची गोष्ट' या कवितेतील सुंद्री वेश्या आणि हातगाडीवाला नेहरूंच्या निधनाच्या बातमीला प्रतिक्रिया देताना दिसतात.

*'क्या हुआ ए सुन्द्रे... !'*
*- 'आज लोबन मत जला!... नेहरू गये!!'*
*'सच; तो चालो आज छुट्टी !...'*
*शीण पेलणारे जग खाटेवर कलले.*

स्वतःचे सामाजिक भान जपणारी ही वेश्या नेहरू गेले म्हणून एक दिवस आपला व्यवसाय करीत नाही. त्यानंतर कागदी ओळीतून उजेड घेऊन जाणारा हातगाडीवाला येतो. 'हा प्रकाश आता कशाला घेऊन चालला आहेस?' या प्रश्नाचे उत्तर देताना तो म्हणतो, 'ओ राव, पुढे काळोख दात विचकीत असेल'. वेश्येच्या विधानातून उदासीनता आणि हातगाडी-वाल्याच्या विधानातून जिद्द आणि आशा या दोन्ही भावना कविता व्यक्त करते.

सुर्वे यांच्या कवितेतील ‘आई’ देखील केवळ गृहिणी नाही. ती तिच्या संसाराला हातभार लावण्यासाठी काम करीत आहे. सकाळी लवकर उठून घरांतील कामे उरकून, मुलांचे सर्व करून, ‘नका बसू कुणाशी भांडत’ असे ममतेने सांगत, तिचे पाय कामासाठी कारखान्याकडे वळतात. दसऱ्याच्या आदल्या दिवशी ती मुलांना कारखान्यात घेऊन जाते. फुले, तोरणांनी सजविलेली यंत्रे पाहून मुले खूश होतात. आई त्यांना भिंगऱ्या, फुगे, असे काहीबाही घेऊन देते, आणि मुलांचा आनंद गगनात मावत नाही. परंतु एके दिवशी कारखान्यात गेलेली आई परत येत नाही, येते ते तिचे प्रेत. तिचे उघडे डोळे आणि तोंडातून भळभळणारे रक्त पाहून मुले सर्द होतात. आधीच काही नसणाऱ्या घरात आता आईही नाही. पण दुःख करायला वेळ कुठे; त्यामुळे ती मुले अश्रू थांबवत वास्तवाला सामोरी जातात.

*‘त्याच रात्री आम्ही पाचांनी*
*एकमेकांस बिलगूनी*
*आईची मायाच समजून*
*घेतली चादर ओढून*
*आधीचे नव्हतेच काही*
*आता आई देखील नाही*
*अश्रूंना घालीत अडसर*
*जागत होतो रात्रभर*
*झालो पुरते कलंदर.’*


‘दुःख’ या कवितेत प्रौढा आहे, तिचे लग्न झालेलं नाही. वृद्ध आई-वडिलांचे करण्यात आणि त्यांच्यासाठी राबण्यात ती व्यस्त आहे. स्वतःकडे पाहायलाही तिला वेळ नाही. तिची अचानक आरशाकडे नजर जाते आणि तिच्या लक्षात येतं की, आपलं आता वय झालंय. ते लक्षात आल्यावर ती थरारते –

*‘डोळे भरून आले;*
*चाळिसावे संपले.*
*शांतपणे तिने माळलेले गजरे*
*खिडकीखाली सोडून दिले.’*

*इतक्या कष्टात आणि हलाखीत दिवस व्यतीत करताना देखील त्यांचा माणसावरील विश्वास कधी ढळला नाही. इतके असूनही या जीवनाचा 'स्वीकार' ते करतात, त्यात कुठली हतबलता नाही, देवावर-ईश्वरावर विसंबून राहणे नाही.*

या प्रौढेचा हा निषेध हेलावून टाकणारा आहे. सुर्वे म्हणतात, 'अशी शेकडो माणसे माझ्या मनाच्या मुशीत आहेत. ती मला दमवतात. त्यांच्याशी बोलण्यात, त्यांच्याशी भांडण्यात आणि त्यांच्या जगण्याच्या भट्टीसारख्या तापवलेल्या भडकत्या ज्वालांशेजारी बसून, त्यांच्या तोंडून त्यांची महान गाथा ऐकण्यात माझ्या रात्रीच्या रात्री गेलेल्या आहेत. ही चरित्रं शब्दबद्ध करताना त्यातील कुठलीही पात्रे भडक होत नाहीत. शक्यता असतानादेखील शब्द विनाकारण घसरत नाहीत. ही पात्रं जशी आहेत, तशीच कवितेत येतात आणि बरंच काही शिकवून जातात. अंतर्मुख करतात.'

**सुर्वे यांची प्रेमकविता :**



नारायण सुर्वे यांची प्रेमकविता ही आधुनिक मराठी कवितेतील सर्वोत्कृष्ट प्रेमकवितांपैकी एक आहे. या कवितेकडे सुरुवातीला कुणाचे लक्ष गेले नाही. कारण या प्रेमकवितेत नव्या नवलाईचा अल्लडपणा नाही की पहिल्यावहिल्या प्रेमाचा गोड शहारा नाही. काही लोकांना वाटते की सुर्वे ज्या थरातून आले त्या थरातले लोक प्रेमच करीत नाहीत. ते काय सकाळी उठतात, गिरणीत जातात, राबतात आणि एके दिवशी कुणाच्या तरी खांद्यावरून निघून जातात. पण हे काही बरोबर नाही. प्रेम भावना ही सर्वव्यापी, सर्व थरांमध्ये आढळणारीच भावना आहे,

कारण तो माणसाचा मूळ स्वभाव आहे. सुर्वे यांच्या कवितेतील प्रेम आणि प्रियकर-प्रेयसी प्रौढ आहेत, कौटुंबिक आहेत. त्याचे कारण सांगताना सुर्वे म्हणतात की, 'मीच मुळी पस्तीस वर्षे वयानंतर कविता लिहायला लागलो. त्यामुळे माझे एक मन तयार झाले होते, की जीवनातल्या सर्व प्रश्नांकडे पाहण्यासाठी जे बॅलन्सिंग लागते ते मला परिस्थितीने शिकवले होते.' हाच समतोलपणा या प्रेमकवितेत आढळतो. येथील प्रियकर-प्रेयसी कामगारवर्गातील आहेत. चाळींच्या एकेका खोलीत दहा-बारा माणसे राहणाऱ्या खुराड्यात राहणारी आहेत. 'खाजगी' क्षण वाट्याला येणं हेच दुर्मीळ आहे. दोघेही दिवसभर राबून, दमून घरी परतणारी माणसे आहेत. रोजचा रोजी-रोटीचा जो सवाल आहे, तो सतत मनात घर करून आहे. आपल्या लहान बाळाची, त्याच्या भविष्याची काळजी आहे. उशिरा संपणारा लांबलचक दिवस आहे, आणि तुकड्याएवढी रात्र आहे. आई-बाप म्हणून असणारे सर्व ताण, काळज्या आहेत. सुर्वे यांच्या कवितेतील प्रेम हे सारे भवताल आणि त्यातून येणारी समज सोबत घेऊन येते. म्हणून इथला प्रियकर ओरबाडून प्रेम मिळवणारा नाही, तर सामंजस्याचा वर्षाव करणारा आहे. प्रेयसीदेखील प्रेमाचा सुखद अनुभव देणारी वस्तू, कुणी उदात्त देवता किंवा अमूर्त शक्ती नाही, तर प्रचंड ऊर्जेचा आश्वासक स्रोत आहे. या कवितेतील प्रियकर त्याच क्षणी बापही आहे, आणि प्रेयसी आईही आहे. कवी या दोघांकडे माणूस म्हणूनच पाहतो आहे. म्हणून सुर्वे यांची प्रेम कविता शरीरांना छेदून अद्वैताकडे नेणारी कविता आहे.

या कामगाराला शारीर प्रेमाचे वावडे आहे असे मात्र नाही. तो त्या नाजूक, हळुवार क्षणांची स्वप्ने पहातोच. 'क्षण माघारी गेले' या कवितेतील प्रियकर-प्रेयसीचा हात धरून समुद्र किनाऱ्यावर न्यावे, बिलगून बसावे आणि दोघांनी दुःख विसरून प्रेमाने विहार करावा, अशी मनीषा बाळगून आहे. तो म्हणतो –

*'रात्र संपूच नये अधिकच देखणी व्हावी*
*झाडे असूनही नसल्यागत मला भासावी*
*तिची रेशीम कुरळबटा गाली झुळझुळावी*
*माझ्या बाहूंत पडून स्वप्ने तिने पहावी'*

◆ ***नारायण सुर्वे यांची प्रेमकविता ही आधुनिक मराठी कवितेतील सर्वोत्कृष्ट प्रेमकवितांपैकी एक आहे. या कवितेकडे सुरुवातीला कुणाचे लक्ष गेले नाही. कारण या प्रेमकवितेत नव्या नवलाईचा अल्लडपणा नाही की, पहिल्यावहिल्या प्रेमाचा गोड शहारा नाही.*** ◆

परंतु ही स्वप्ने पुरी होण्यासाठी लागणारा वेळ आणि क्षण मिळणेच कठीण.

*'असे कैकदा वाटूनही क्षण माघारी गेले*
*वाटेतच निरोप घेऊन 'लोकल' धरावी.'*

मग हे स्वप्न केवळ स्वप्नच राहते आणि प्रियकरासमोर त्याचे वर्तमान रोजच्या 'लोकल'सारखे उभे राहते.

*'गलबलून जातो तेव्हा तुझ्याच पवित्र कुशीत शिरतो*
*तुझ्या मखमली कवेत स्वतःस अश्रूंसह झाकून घेतो'*

'गलबलून जातो तेव्हा--' या कवितेतील या ओळी वाचल्या की, कुसुमाग्रजांच्या 'नटसम्राट'मधील 'बायको म्हणजे बंदर असतं नवरा नावाच्या गलबतासाठी' हे वाक्य आठवते. दिवसभर थकलेली ती 'चैत्रपालवी' होते. 'किती वाळलात तुम्ही' म्हणत त्याच्या केसांतून हात फिरवते, आणि या एका वाक्याने याच्या 'हृदयाचे पोलाद होते'.

*'भुऱ्या जावळाआड आपुला सोनुला चंद्र स्वप्नधुंद असतो*
*एकदा त्याचेवरून; पुन्हा माझ्यावरून तुझा रेशमी हात फिरतो'*

स्त्रीचे एकाच वेळी आई आणि प्रेयसी असणे सुर्वे यात छान पकडतात. यामुळे ही प्रेमकविता उच्च पातळी गाठते. 'सत्य' ही प्रेमकविता अजून वरची पातळी गाठते. ही कविता कामगार जीवनातील प्रेमाचे तीन ठळक टप्पे दाखवते. पहिल्या टप्प्यावर, नुकतेच लग्न झालेल्या जोडप्याला एकांत मिळावा म्हणून कोनाड्याकडे सरकून झोपलेली आई आणि फुटपाथवर झोपायला गेलेला बाप दिसतो.

*'तुझे गरम ओठः खडीसाखर होत गेले तेव्हा*
*तेव्हाही रात्र अशीच होती ओढाळ.*
*खपत होतो घरासाठीच....*

*विसावत होतो शीण तुझ्या काठावर*
*तुझ्या खांद्यावर --'*

दुसऱ्या टप्प्यावर, श्रम आणि विसावा यांच्या जोडीने सुरू असलेला संसार मुलाबाळांनी भरून जातो. तिसऱ्या टप्प्यावर, वाढलेल्या संसारामुळे हातातोंडाची गाठ पडत नसल्याने ती त्याला 'नकार' देते. वास्तव लक्षात येताच 'उद्यापासून तिलाही काम बघ बाबा' असे स्वतःला म्हणत तो फुटपाथवर झोपायला बाहेर पडतो. त्याच्या हातातून सुटत चाललेला संसाराचा दोर तिच्या जबाबदारीपूर्ण 'नकाराने' सावरू पाहतो, आणि त्यामुळे त्याला तिचे ओठ अधिकच रसाळ वाटतात.

सतत कामात असणाऱ्या आणि काबाडकष्ट करणाऱ्या बायकोकडे पाहून नवरा हेलावतो. आता बस कर, हे काम थांबवं आणि थोडी शांत बस, असे म्हणून समजावणारा नवरा 'पुरे कर...' या कवितेत आहे. उष्टी खरकटी, साचलेला केर, घासायला पडलेली भांडी, धुणी, घरातल्यांनी काढलेली उणीदुणी सर्व बाजूला ठेवण्यास तो तिला सांगतो.

*'थोडी शांत हो,*
*बाहेरही वाढलाय गारवा*
*तूही घे विसावा;*
*डहुळलेले पाणी स्थिरावू दे,*
*आपल्यासाठी...*
*आता पुरे कर...*
*तुझा भिंगरीसारखा वावर.'*

प्रेमातील हे सामंजस्य सुर्वे यांच्या प्रेमकवितेचा कणा आहे. पुरुषाचे कुटुंबावरील प्रेम व्यक्त करणाऱ्या सुर्वे यांच्या कविताही निराळ्या धाटणीच्या आहेत. त्याच्यासाठी आणि संसारासाठी कष्ट उपसणाऱ्या बायकोची त्याला जाणीव आहे. तिला आणि मुलांना सुखात ठेवू शकत नाही ही त्याला खंतदेखील आहे. 'थोडी ठेव' या कवितेतील बाप 'नाही देता आले छानसे, सानुल्या खेळणे घेऊन' म्हणून अश्रू ढाळतो. हा नवरा आणि बाप भावनाप्रधान आहे. 'असा कसा दगड झालो...' या कवितेतील बाप एका क्षणी मुलांना मारहाण करतो, फोडून काढतो. 'असा कसा दगड झालो.... बाप असून काळ वाटलो त्यांना...' याची

◆ ***प्रेम भावना ही सर्वव्यापी, सर्व थरांमध्ये आढळणारीच भावना आहे, कारण तो माणसाचा मूळ स्वभाव आहे. सुर्वे यांच्या कवितेतील प्रेम आणि प्रियकर-प्रेयसी प्रौढ आहेत, कौटुंबिक आहेत.*** ◆

जाणीव झाल्यावर पश्चात्तापदग्ध होतो.

*‘असा कसा दगड झालो...*
*दगड झाले डोळे*
*व{सरलो पोटचे गोळे.*
*‘पोरं पोसता येत नाहीत तर बाप कशाला झालात?’*
*शब्द कोसळले.*
*माझ्याकडेच दया मागणारे माझेच चिमुकले हात*
*भाविक भोळे!*
*असा कसा दगड झालो;*
*दगडच झालो!’*

या ओळींमधील बापाची भावनाविवशता हेलावून टाकणारी आहे.

सुर्वे यांच्या कवितेतील प्रियकर हा एक पाय घरात तर दुसरा चळवळीत असा आहे. त्यामुळे त्यांच्या प्रेमकवितेला सामाजिक-राजकीय डूब आहे. ‘थांब!’ या कवितेतील प्रियकर म्हणतो –

*‘माझी गा दमून निजली खुराड्यात चंद्रावळ*
*मीही शब्द जुळवित जागा आहे उशाजवळ*
*मलाही ऐकू येते आहे वाऱ्याची सळसळ*
*वेळेवर येण्याचा नियम आज सांगू नको’*

आपल्या प्रेमाला जगण्याच्या संघर्षाचे भान हवे, असे प्रेयसीला समजावून सांगणारा हा प्रियकर आहे. आपल्याला हवे तसे जीवन प्राप्त होण्यास अजून वेळ आहे आणि तेथपर्यंत प्रयत्न करीत राहिले पाहिजे, हे सांगताना ‘तोवर तुला मला’ या कवितेत प्रियकर म्हणतो –

*‘याच वस्तीतून आपला सूर्य येईल*
*तोवर मला गातच राहिले पाहिजे*
*नगरवेशीत अडखळतील ऋतू*

***◆ प्रेमातील हे सामंजस्य सुर्वे यांच्या प्रेमकवितेचा कणा आहे. पुरुषाचे कुटुंबावरील प्रेम व्यक्त करणाऱ्या सुर्वे यांच्या कविताही निराळ्या धाटणीच्या आहेत. ◆***

*तोवर प्रिये जागत राहिले पाहिजे'*

'विश्वास ठेव' या कवितेतला प्रियकर आपल्या प्रेयसीला समजावून सांगतो आहे. आयुष्यात सामोरे आलेल्या निखाऱ्यांमुळे मी वाईट वागलो, दाहक वागलो असे तुला वाटले असेल, पण मुळात मी तसा नाही. जेव्हा जेव्हा मी या जीवन-संघर्षात दमून, हरून घरी परतेन, तेव्हा मला सावरणारी तूच असशील.

*'आयुष्य घृणेत सरणार नाही; हवीच तर घृणाही ठेव.*
*ज्या खडकावर घुसळलीस मान त्या माणसावर विश्वास ठेव'*

असे म्हणत हा नायक 'माणसावरील विश्वास' अधोरेखित करीत आहे. 'थरकू नको' या कवितेतील प्रियकर चळवळीतले काम करणारा, सभांमध्ये सहभागी होणारा आहे. त्यामुळे माझी वाट पाहत जाऊ नकोस, असे तो प्रेयसीला समजावून सांगत आहे -

*'आवडीने रांधलेला भात*
*खावयास मी नसेन घरात*
*उद्याचे नवे रचाया बेत*
*मी हजर असेन सभेत*
*उपाशीच वाट पाहू नको ---'*

हे सांगताना तो तिला सतत सावध असण्याची सूचना करतो आहे. आपल्या घरावर पाळत ठेवणारे लोक कधीही येतील, घराची झडती घेतील, कदाचित तुलाही नेतील. परंतु अशाही वेळी 'क्षणभरही थरकू नको --' असे सांगत आपल्या पत्नीला संघर्षासाठी सतत तयार राहण्याचे सुचवीत आहे. एकूणच सुर्वे यांच्या कवितेतील प्रियकर आणि प्रेयसी ही वर्गजागृत माणसे आहेत. ती सामाजिक आणि राजकीय गुंता सोडवण्यात प्रयत्नशील आहेत. संघर्षाच्या चौकटीत वाढणारे, नात्यांमधील सामंजस्य जपणारे, माणूस म्हणून खऱ्या अर्थाने सिद्ध करणारे हे प्रेम म्हणूनच वेगळे उठून दिसते.

## सुर्वे यांच्या कवितेतील साम्यवाद आणि संघर्ष

आपल्या कवितेची स्फूर्तिस्थाने सांगताना नारायण सुर्वेनी कामगार जगातील आपले जगणे, कामगार चळवळीशी व पर्यायाने कम्युनिस्ट पक्षाशी मार्क्स-लेनिन यांच्या विचारांशी आपला आलेला संबंध, १९४२चे विराट आंदोलन, १९४६चा खलाशांचा उठाव, १९४७ साली मिळालेले स्वातंत्र्य या बाबींचा उल्लेख केला आहे. यामुळेच, कुसुमाग्रज म्हणतात त्याप्रमाणे; सुर्वेंची बरीचशी कविता लढाऊ वृतीची, समाजक्रांतीची उपासना करणारी नव्या आनंदवनभुवनाचे मनोहर स्वप्न पाहणारी आहे. नारायण सुर्वेंना लहानपणापासून जो परिसर लाभला, तो कामगार चळवळींमध्ये सक्रिय होता. त्यांचे आई-वडील दोघेही युनियनचे सदस्य होते. सुर्वे वडिलांना डबा पोहचवण्यासाठी किंवा सणासुदीला आई-वडिलांबरोबर कापड गिरणीत जात असत. त्यामुळे गिरणीच्या आतील जग आणि तेथील समस्या यांची माहिती त्यांना होतीच. सुर्वे राहत होते त्या चाळीत आणि आजूबाजूच्या चाळींतदेखील सर्व कामगारवर्गच राहत होता. त्यांच्याच चाळीत राहत असलेल्या तळेकर यांच्याबरोबर ते साम्यवादी पक्षाचे काम करायला जात असत. त्यामुळे एकूणच कामगारांचे प्रश्न सुर्वेंना ज्ञात होते. पुढे वडील गावाला निघून गेल्यापासून ते शाळेत शिपायाची नोकरी मिळेपर्यंत त्यांनी अनेक गिरण्यांमध्ये विविध खात्यांत कामे केली होती. स्वतः कामगार म्हणून कार्यरत झाल्यावर ते प्रत्यक्ष युनियन आणि साम्यवादी पक्षाचा भाग बनले. पक्षाच्या आणि चळवळींच्या विविध कामांमध्ये ते सहभागी होऊ लागले. साहजिकच, या पार्श्वभूमीमुळे सुर्वे साम्यवादी विचारधारेशी आणि पक्ष कार्यक्रमांशी जोडले गेले. कामगारांची परिस्थितीदेखील फार बिकट होती. त्यांना आजूबाजूचा पांढरपेशा समाज नाकारत होता आणि सरकार व गिरणीमालक दुर्लक्ष करीत होते. त्यामुळे नेहमीच्या जगण्यासाठी संघर्ष करणे हा नित्याचा भाग होता. त्यासाठी साम्यवादी असलेच पाहिजे असे काही गरजेचे नव्हते. पण सुर्वे पुस्तकी साम्यवादी नव्हते. प्रत्यक्ष अनुभवांतून आणि सतत संघर्षाच्या रणधुमाळीत राहून त्यांना साम्यवादी विचारसरणीचे उपयोजित्व लक्षात आले होते.

मार्क्सवादी विचारांची बांधिलकी ही माणसाशी आहे. माणूस कुठल्या

नियतीच्या, देवाच्या हातचे बाहुले नाही. तो त्याच्या श्रमातून वास्तवाची निर्मिती करतो, हा या विचारांचा मूळ गाभा आहे. माणसाचे हे माणूसपण त्याच्या समाजाशी असलेल्या संबंधातून मिळत असल्याने व्यक्ती आणि समष्टी हे परस्परपूरक आहेत. माणूसपण प्रस्थापित करण्यासाठी माणसाला त्याचे आयुष्य संपूर्ण जगण्याचा अधिकार आहे. त्यासाठी समाजाचा भौतिक पाया मजबूत असणे अनिवार्य आहे. माणसाच्या श्रमावर, त्याने निर्माण केलेल्या वस्तूंवर आणि संपत्तीवर आणि एकूणच समाजव्यवस्थेवर माणसाचे नियंत्रण असायला हवे, असा हा विचार आहे. माणसाच्या स्वत्वाची जाणीव त्याला करून, माणूसपण प्रस्थापित करण्यासाठी संघर्ष करणे अटळ आहे.

नारायण सुर्वेंचे 'मार्क्सवादी' असणे, हा सुर्वेंच्या बहुतेक टीकाकारांचा आक्षेप आहे. त्यांची कविता 'मार्क्सवादी' विचारांचा प्रचार करणारी आहे आणि साम्यवादी पक्षाचा प्रसार करणारी आहे, असा टीकेचा सूर आहे. सुर्वेंना मात्र साम्यवादी असण्यात काही गैर वाटत नाही, किंबहुना ते त्यांना स्वाभाविक वाटते. या विचारसरणीचा सुर्वेंच्या विचारप्रक्रियेवर तसेच सभोवारच्या जगाकडे बघण्याच्या दृष्टिकोनावर परिणाम होणे हेही स्वाभाविकच आहे. कुठलीही कला ही समाजातूनच निर्माण होत असल्याने, आणि राजकीय विचारही समाजाचाच एक अपरिहार्य भाग असल्याने, कला आणि राजकीय विचार यांची सरमिसळ नक्कीच होऊ शकते. सुर्वेंच्या मते, 'चांगल्या कलाकृतीला राजकीय विचारांचे वावडे नसते. कारण तिचा संबंध जिवंत माणसांशी असतो आणि हा माणूस समोरच्या जगण्यातला एक भागीदारही असतो. जीवन हा एक संघर्ष आहे आणि संघर्षात भूमिका घेणे महत्त्वाचे असते. कुठलीच भूमिका न घेणे हे विरोधी भूमिका घेण्यापेक्षा अधिक घातक असते. मराठी साहित्यात आपण कोणत्याही विचाराचे नाही असे अभिमानास्पदपणे सांगणाऱ्यांमुळे मराठी साहित्याचेच अधिक नुकसान झाले आहे', असे सुर्वेंचे मत आहे. परंतु सुर्वेंची सगळी कविता प्रचारकी थाटाची आहे, हे मात्र त्यांना मान्य नाही. राजकीय विचारसरणी व्यक्तीच्या भावभावनांवर, दृष्टिकोनांवर प्रभाव पाडते, हे स्वाभाविक आहे. परंतु सुर्वेंच्या मतानुसार, राजकीय विचारधारा तुमच्या कवितेवर किती परिणाम करील याची

*कुसुमाग्रज म्हणतात त्याप्रमाणे; सुर्वेंची बरीचशी कविता लढाऊ वृतीची, समाजक्रांतीची उपासना करणारी नव्या आनंदवनभुवनाचे मनोहर स्वप्न पाहणारी आहे.*

मर्यादा ओळखणे हे महत्त्वाचे आहे, आणि हे कवीच्या बांधिलकीवर अवलंबून आहे. साम्यवादी पक्षाशी असलेली बांधिलकी कलेच्या प्रांतात अकारण घुसणे हे चुकीचे आहे, असे सुर्वेंचे मत होते.

सुर्वेंच्या विचारसरणीवर असणारा साम्यवादी प्रभाव दिसतो तो त्यांच्या 'कार्ल मार्क्स'या कवितेमध्ये. 'माझ्या पहिल्या संपातच मार्क्स मला असा भेटला' असे म्हणत सुर्वे एक निराळीच खेळी खेळतात. मार्क्स त्यांना प्रत्यक्ष भेटत नाही. संपात भाग घेणारी एक कामगार स्त्री जानकीआक्का त्यांची ओळख मार्क्सशी करून देते. ती मार्क्सचा उल्लेख 'ह्यो आमचा मार्क्सबाबा' असा करते. मार्क्सचे एकूणच कामगार जगतातले स्थान त्यामुळे अधोरेखित होते. सुर्वेंची आणि मार्क्सची ओळख झाली ती या कामगार जगतामार्फतच. सुर्वे मुलाखतींतून सांगत असत की, मार्क्सवादाचा भारतातील पराभव हा मार्क्सवाद्यांमुळेच झाला आहे. त्याचे कारण मार्क्सवाद्यांनी पुस्तकातला मार्क्स जसाच्या तसा अवलंबण्याचा यत्न केला. वास्तविक भारतीय जनतेची परंपरावादी, रूढीवादी मानसिकता लक्षात घेणे आवश्यक होते, नुसता 'वर्गा'चा अभ्यास न करता हा समाज ज्या अठरापगड जातींमध्ये विभागलेला आहे त्याचाही अभ्यास करायला हवा होता. पण तसे झाले नाही, त्यामुळे या देशातील मार्क्सवादी हा समाज ओळखायला आणि समजावून घ्यायलाच कमी पडले, असे सुर्वेंचे मत होते. वरील कवितेतील जानकीआक्काचे प्रयोजन हे सूचित करते की, मार्क्स समजून घ्यायचा असेल तर तो इथल्या समाजाच्या किंवा माणसांच्या नजरेतूनच समजावून घ्यायला हवा. तसे केल्यावर मात्र या कवितेमध्ये मार्क्स कवीच्या खांद्यावर हात ठेवतो, म्हणजे त्यांस सहजी आकलन होतो. या कवितेच्या अखेरच्या भागात, कवी जेव्हा एका गेटसभेत भाषण करत असतो, तेव्हा मार्क्स त्याचे भाषण ऐकत उभा असतो.

*'परवा एका गेटसभेत भाषण ऐकत उभा होता'*
मी म्हणालो –
*'आता इतिहासाचे नायक आपणच आहोत,*
*या पुढच्या सर्वच चरित्रांचेही.'*
*तेव्हा मोठ्याने टाळी त्यानेच वाजविली*
*खळखळून हसत, पुढे येत,*
*खांद्यावर हात ठेवीत म्हणाला,*
*अरे, कविता-बिविता लिहितोस की काय?*
*छान, छान,*
*मलासुद्धा गटे आवडायचा.'*

या कवितेतून चार कच्चीबच्ची असतानादेखील त्यातून विरक्त असणारा, बुद्धिवादी असूनही कष्टकऱ्यांशी नाते जपणारा आणि कलेविषयी आपुलकी असणारा अशी मार्क्सची विविध रूपे दर्शविली गेली आहेत.

*'अजून मी तुझ्यावर काही लिहिले नाही*
*ही खंत नाही;*
*एक कमालीची जबाबदारी वाटते*
*जेव्हा मी हात ठेवतो हृदयावर, लेनिन.'*

'लेनिन...' या कवितेतील वरील ओळींमध्ये अन्याय्य आणि गळचेपी करणारी व्यवस्था बदलून टाकण्याचा लेनिनला दिलेला शब्द आपण अजून पाळला नाही, हे कवी कबूल करतो. तसेच दिलेली जबाबदारी पूर्ण करावयास आपण बांधील असल्याचेही हृदयावर हात ठेवून सांगतो.

*'तेव्हा ते आम्हांला घेऊन गेले*
*'साले! लेनिनवाले दिसतात' म्हणाले,*
*कानशिले तापली; पण बरेही वाटले*
*राक्षसांनी आता तरी आम्हांला नीटसे ओळखले.*
*'हे आता जागे झालेत*
*रूपच बदलणार आहेत पृथ्वीचे' तू लिहिलेस.*
*अजून शब्द आम्ही पुरा करू शकलो नाही.*
*अजून तुझ्यावर मी काही लिहू धजलो नाही.'*

अखेरच्या ओळीत कवी म्हणतो की, नुसते लेनिनवर लिहिण्यात

*सुर्वे पुस्तकी साम्यवादी नव्हते. प्रत्यक्ष अनुभवांतून आणि सतत संघर्षाच्या रणधुमाळीत राहून त्यांना साम्यवादी विचारसरणीचे उपयोजित्व लक्षात आले होते.*

काहीच उपयोग नाही, आधी तो प्रत्यक्ष कृतीत आणायला हवा. आणि तसा तो अमलात आणल्याशिवाय कवी लेनिनवर लिहू 'धजत' नाही. मार्क्सवादी-लेनिनवादी विचारांशी असलेली बांधिलकीच सुर्वे यातून व्यक्त करतात.

नारायण सुर्वे यांच्या कवितेने देशातील आणि देशाबाहेरील शोषणविरोधी आणि स्वातंत्र्य चळवळींना पाठिंबा दर्शवला आहे. पेट्रिस लुमुम्बा हे आफ्रिकन स्वातंत्र्य चळवळीचे मोठे नेते होते. लुमुम्बा काँगो देशाच्या स्वातंत्र्यासाठी झटले, आणि पुढे काँगोचे पंतप्रधान बनले. पण त्यानंतर सात महिन्यांतच, इ.स. १९६१ साली त्यांची हत्या करण्यात आली. 'लुमुम्बास सलाम' या कवितेत, लुमुम्बांना आदरांजली वाहताना, सुर्वे म्हणतात–

*'माझ्या देशाची गंधवती हवा*
*माझ्या देशाचे जागणारे तारे*
*करीत राहतील रात्रभर*
*तुझ्या प्रिय कांगोवर पहारे'*

'सूर्य उतरतो तिबेटमध्ये' या कवितेतही सुर्वे तिबेटसाठी स्वतःला 'शांतिदूत' म्हणवून घेणाऱ्या अमेरिकेचा पर्दाफाश करतात.

*'एक एक दणक्याने आता*
*वॉलस्ट्रीटचा इमला झुकला*
*काही गिधाडे तिथून उडती*
*गळ्यात घालुनी शांती माळा.'*

शीतयुद्धाच्या सुरुवातीच्या काळात, इ. स. १९५७ साली, सोव्हिएट रशियाने 'स्पुटनिक' या पृथ्वीस प्रदक्षिणा घालणाऱ्या पहिल्या कृत्रिम उपग्रहाचे प्रक्षेपण केले. जगभरातील साम्यवादी चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या रशियाचे कौतुक सुर्वे यांची कविता करते.

*'चारी दिशांच्या खांबावरूनी*
*चक्कर काटी स्पुटनिक तारा,*
*दौडुन त्याच्या संगे दमला*
*धुसफुसणारा विराट वारा.'*

स्पुटनिकच्या प्रक्षेपणाने धक्का पोहोचलेल्या अमेरिकेचा उल्लेख करीत ही कविता 'अफाट निद्रिस्त ब्रह्मान्डाचा, हाच उद्याचा होईल वेद' असे म्हणत विज्ञानवादाची कास धरते. पण हे करताना सुर्वे खालील उल्लेख करायला विसरत नाहीत –

*'छत्र धरोनी डोईवरती*
*सेवा करिते मुके आभाळ;*
*सोविएतच्या श्रमवीराने*
*केले का हे पदक बहाल.'*

वरील कवितांप्रमाणेच 'डेकवर', 'असेल-नसेल' सारख्या कविता एकूणच सुर्वे यांच्या कवितेला आंतरराष्ट्रीय परिमाण देतात. देशाबाहेरील चळवळींना पाठिंबा देताना सुर्वे यांची कविता देशांतर्गत घडामोडींना प्रतिक्रिया देणारी, चळवळींनादेखील पाठिंबा देते. १८ फेब्रुवारी १९४६ रोजी मुंबईत झालेल्या खलाशांच्या बंडाला साम्यवादी पक्षाने पाठिंबा दिला आणि २२ फेब्रुवारी १९४६ रोजी देशव्यापी संप पुकारला. '२२ फेब्रुवारी' ही कविता या पार्श्वभूमीवरील आहे. बंड झाले तेव्हा ब्रिटिश सरकारची झालेली दाणादाण त्यांनी खालील ओळीत व्यक्त केली आहे.

*'घेतले होते नगर मुठीत, आकाशही आले होते खुशीत*
*सातही घोड्यांचे लगाम सैल करून सूर्य पळत होता पश्चिमेत'*

'रोटी हवी जिंदगी हवी' या एका मागणीसाठी प्राणपणाला लावणाऱ्या त्या बंडवाल्या खलाशांची स्तुती करत कवी म्हणतो –

*'असाही दिवस येईल तेव्हा मी तुमच्या हाताचा मुका घेईन*
*या हातांनी डागली तोफ त्या पवित्र हातांचे आशीष घेईन.'*

'खुलेल गोमंतक जनजीवन' या कवितेत सुर्वे गोवा स्वातंत्र्य संग्रामाचे वर्णन करतात.

*'भारतीय सेनेने कूच केले वादळगतीने*
*स्वातंत्र्यसूर्य घेऊन निघाले अंधाराच्या रोखाने*

◆ ***सुर्वेंच्या मते, ‘चांगल्या कलाकृतीला राजकीय विचारांचे वावडे नसते. कारण तिचा संबंध जिवंत माणसांशी असतो आणि हा माणूस समोरच्या जगण्यातला एक भागीदारही असतो.*** ◆

*पंखुट भुईस टेकून उडालीच जेट विमाने*
*पाणी कापत जहाजे सुटली गोव्याच्या दिशेने*
*हलली लिस्बनची दारे, तडकली तावदाने*
*मगरूर फिरंग्यांस आवळले पोलादी पंजाने*
*शेवटची बोट धरून पळाले लिस्बनच्या वाटेने*
*मुक्त केला गोवा त्वरेने!’*

‘केरळीय ज्योतीवर’ या कवितेत ज्योती बसू यांच्या नेतृत्वाखाली वाटचाल करू पाहणाऱ्या साम्यवादी केरळ राज्याचाही सुर्वे गौरव करतात.

मानवी श्रमाचा जयजयकार सुर्वेंच्या अनेक कवितांतून आढळतो. जो समाज या कष्टकऱ्यांचे जीवन नाकारीत आला, तोच समाज या कष्टकऱ्यांच्या श्रमातून निर्माण झालेल्या वस्तू वापरत समाजात मिरवतो. हे लोक अधिक मूल्यांच्या उंची वस्तू वापरून त्यात प्रतिष्ठा पाहातात. पण हे उंची मूल्य आणि अधिक किंमत कुठून येते? एखाद्या कष्टकर्त्याचा हात दगडावरून फिरतो, तेव्हाच त्याला शिल्पाचे कलात्मक मूल्य प्राप्त होते. एखाद्या विणकराचा हात कापसाला लागतो, आणि कमी मूल्याच्या कापसाला कापडाचे अधिक मूल्य आणि प्रतिष्ठा दोन्ही प्राप्त होते. ज्या गाड्या, बंगले, दागिने वापरीत लोक स्वतःला श्रीमंत म्हणवतात, त्या वस्तू कष्टकऱ्यांच्या श्रमांतून तर निर्माण झाल्या. कष्टकर्त्यांच्या श्रमामुळेच कच्चा माल पक्का बनतो आणि त्याला मूल्य प्राप्त होते. असे असताना वस्तूंना आणि माणसाच्या राहणीमानाला मूल्य प्राप्त करून देणारे श्रम मूल्यहीन कसे? तो श्रम करणारा हात दुर्लक्षित कसा? म्हणूनच या श्रमाचे आणि श्रमिकांचे महत्त्व सुर्वेंची कविता अधोरेखित करते.

*‘हे रिक्त हातांनो!*
*माझ्या देवतांनो!*

*तुम्ही बोटांच्या परिसने*
*शृंगारिली अनंत भुवने*
*तीक्ष्ण नखांच्या पिंजीणीने*
*पिंजली कापसाची बने'*

असे 'हे रिक्त हातांनो!' या कवितेत सुर्वे म्हणतात. ते कष्टकर्त्यांच्या हातालाच देव म्हणजेच श्रेष्ठ मानतात. पण ते हात 'रिक्त' आहेत असे म्हणत या समाजातील 'आहे रे' आणि 'नाही रे' यातील दरी स्पष्ट करतात. याच कवितेत ते कष्टकऱ्यांना आणि त्यांच्या हातांना 'हे थोर किमयागारांनो!', 'यंत्रावर जळणारांनो!', 'मुके दुःख गिळणारांनो!', 'नांगराच्या तप्त फाळांनो!', 'हे माझ्या युगपुरुषांनो!', 'जीवनाच्या शिल्पकारांनो!', 'नवे युग रचणारांनो!' असे संबोधतात.

*'बोंब मारून बोलवावा असा स्वर्ग आहेच कुठे?*
*ज्यासाठी आमचे आतडे तिळतिळ तुटत होते.*
*ऊठ! तेवढी ती कोपऱ्यातली तलवार शोधून ठेव*
*एकेकाळी तिच्यावर मी माझे नशीब घासले होते.'*

'ऊठ-' या कवितेतील वरील ओळींमध्ये स्वर्ग आणि नशीब असल्या कल्पनांवर विश्वास ठेवून हातात काहीच आले नसल्याचे सांगत, हा नायक स्वतःच्या श्रमशक्तीवरील विश्वास व्यक्त करतो; कारण या श्रमशक्तीमुळेच त्याचे 'नशीब' घडणार आहे.

जातिभेदाचे दर्शनही सुर्वेंच्या कवितेत उघडपणे येते. एका लहानग्याने शाळेवर दगड मारून काचा फोडल्या. त्याचा जाब त्याला विचारला जातो तेव्हा तो लहानगा 'का म्हून!' या कवितेत विचारतो –

*'ते मला मैल्या म्हनतात म्हून!*
*व्हय - म्हनले; तुझी आय मैला उचलते.*
*म्हनून मैल्या.*
*मल्हारी मैल्या का म्हून म्हनत्यात!*
*कोन जवळ बसवंना!*
*वर्गात गेल्या गेल्या फडकी लावतात नाकाला*
*येगळा बसवित्यात;*
*माझा पानउतारा करत्यात*

◆ ***साम्यवादी पक्षाशी असलेली बांधिलकी कलेच्या प्रांतात अकारण घुसणे हे चुकीचे आहे, असे सुर्वेंचे मत होते.*** ◆

*का म्हून!'*

'तुमी असं का वागलात वं?' या कवितेत मुलासाठी शाळेत प्रवेश घ्यायला गेलेला बाप असा सर्वांसमोर विचित्र का वागतो, हे त्या मुलाच्या ध्यानात येत नाही आणि तो बापाला प्रश्न विचारतो.

*'माज्या भरतीसाठी,*
*साळंच्या दारावर गेलो तवा,*
*बाबा तुमी, लोकापास्न लांबलांब हुभं का ऱ्हाइलात वं?'*
*......*
*'तरीबी समदी मानसं अशी टकाटका का बगत वं?'*
*'लोकं धाडधाड दार उघडून जा-ये करत व्हते*
*आन तुमी; किलकिलं करून बगत का व्हता वं?'*
*........*
*'आनि तुमच्या हसन्यात, सांगन्यात, वागन्यात*
*लाचारल्यागत का झाला व्हता वं?'*

या दोन कवितेतील लहानग्यांचे 'का म्हून!' आणि 'तुमी असं का वागलात वं?' हे दोन प्रश्न माणसाला माणूस म्हणून न वागवणाऱ्या समाजाचं प्रातिनिधिक दर्शन घडवतात, आणि संवेदनशील वाचकाचे काळीज विदीर्ण करतात.

पिळवणूक आणि शोषण यावर आधारलेल्या समाजात नेहमी दोन वर्ग असतात. एक वर्ग, ज्यांच्या हाती सत्ता एकवटलेली असते. ही सत्ता पैशाच्या तसेच जाती-धर्माच्या वर्चस्वातून आलेली असते. या सत्तेचा फायदा उठवत, दुसऱ्या वर्गाचे शोषण करीत, हा वर्ग अधिकाधिक वर्चस्ववादी बनत जातो. दुसरा वर्ग, ज्यांच्या हाती नावालाही सत्ता नसते. सत्ता नसण्यामागेही वंचना हेच कारण असते. पैसे नसणे आणि ज्या जाती-धर्माचे वर्चस्व आहे ती जात किंवा तो धर्म नसणे हे घटक कारणीभूत असतात. या गटाचे पहिल्या वर्गाकडून सतत

शोषण होत असते. विकासासाठी संधीच उपलब्ध करून द्यायची नाही आणि मूलभूत जगण्याचा अधिकारही मान्य करायचा नाही, किंबहुना त्यांचे जगणे दुर्लक्षित करायचे आणि नाकारायचे, त्यांचे संघर्षदेखील आर्थिक-सामाजिक बळ वापरून दाबून टाकायचे, ही पहिल्या वर्गाची रीत. जगण्यासाठी अपरिहार्य असल्याने सतत कष्ट करीत राहणे, आणि दुसऱ्या बाजूला पहिल्या वर्गाकडून होणाऱ्या अन्यायाचा विरोध करण्यासाठी संघर्षशील राहायचे, ही दुसऱ्या वर्गाची रीत. सुर्वेंच्या कवितेत या जातीय आणि वर्गीय भेदाचे सुस्पष्ट चित्र दिसते. हे चित्र रंगवताना सुर्वे वास्तवाचा आधार सोडीत नाहीत. तसेच ते तटस्थ भूमिका न घेता, शोषण आणि पिळवणुकीने नाडलेल्या दुसऱ्या वर्गाची बाजू अगदी उघडपणे घेतात. 'ऐसा गा मी ब्रह्म' या कवितेत कामगार हाच ब्रह्म आहे, ही भावना नायक व्यक्त करतो. श्रमातील सृजनात्मकता व्यक्त करीत त्याचा बुलंद आत्मविश्वास त्यांत दिसतो.

*'उभे करीन मी ख वाकल्या आभाळा।*
*शिक्षा केली त्याला ख दंडवित।।'*

पण त्याच वेळी वास्तव असे की, या साऱ्या विश्वाचा आधार बनून राहिलेला कामगार मात्र रस्त्यावर राहतोय. तो हक्काच्या निवाऱ्यालाही पारखा झालाय.

*'ऐसा गा मी ब्रह्म ख विश्वाचा आधार।*
*खोलीस लाचार ख हक्काचिया।।'*

'येता का सांगाती' या कवितेतदेखील कवी कामगाराची व्यथा मांडतो आहे. 'कर्पुरासम मी ख जाळतो आयुष्य ख निर्मितो भविष्य ख दुज्यासाठी खख' असे म्हणत तो सहकाऱ्यांना अस्तित्वाच्या या लढाईत त्याच्याबरोबरीने सामील होण्यास सुचवीत आहे.

*'चालली पुढेच ख येता का सांगाती।*
*तेजाची दिवटी ख धरोनिया।।'*

'बिगारी नाका' या कवितेत सकाळी शहरांमध्ये नाक्यानाक्यावर रोजंदारीच्या शोधार्थ गोळा होणाऱ्या आणि रस्त्याकडेला आपले पाले मांडणाऱ्या बिगारी कामगारांचे चित्रण आहे. हे चित्रण करतानाही –

*'वळचणीला राहूनही नगरवासी नसतात.*

◆ ***कष्टकर्त्यांच्या श्रमामुळेच कच्चा माल पक्का बनतो आणि त्याला मूल्य प्राप्त होते. असे असताना वस्तूंना आणि माणसाच्या राहणीमानाला मूल्य प्राप्त करून देणारे श्रम मूल्यहीन कसे? तो श्रम करणारा हात दुर्लक्षित कसा? म्हणूनच या श्रमाचे आणि श्रमिकांचे महत्त्व सुर्वेंची कविता अधोरेखित करते.*** ◆

*अस्पर्शितच राहतात,*
*इमानाने;*
*आणि महानगराच्या विकासासाठी*
*पहिल्यांदा पाले यांचीच मोडतात.'*

या विधानात सुर्वे आपली वर्गीय भूमिका स्पष्ट करतात. 'कळत नाही त्यांना शहरातील लोक परक्यासारखे का वागतात? इतके करूनही ते असे उद्धट का होतात?' असे शहरवासीयांसाठी गैरसोयीचे प्रश्न विचारतात. अशीच वर्गीय भूमिका 'बेअब्रू खूपच झाली' या कवितेत दिसून येईल –

*'बेअब्रू खूपच झाली अब्रुदारांच्या जगात*
*प्रत्येक पत-पेढीवर आमची चर्चा निघेल*
*तरी आम्ही जगता; असा लौकिक बाजारात*
*त्यांच्या नावांसोबतच आमचेही नाव निघेल'*

'कवितेऐवजी रद्दी विकली असती, तर बरे झाले असते', अशी तिखट प्रतिक्रिया देताना, पैशाच्या नादी लागलो असतो तर काय-काय करू शकलो असतो, हे सांगताना 'शब्दांचे ईश्वर' या कवितेत कवी म्हणतो–

*'लोकसेवकाच्या भूमिकेत सारे जीवन अदा केले असते*
*अडलेल्या हरेक याचकाने झुकून सलाम केले असते*
*'फियाट'च्या मऊ गादीत बसून वाऱ्यालाही गुलाम केले असते*
*जमलेच असते तर गावांत चार कारखाने बांधले असते'*

तरीही पैशाच्या नादी आपण लागलो नाही हे बरेच झाले, कारण त्याशिवाय कष्टकऱ्यांच्या व्यथेला शब्दरूप देता आले नसते, तसेच त्यांच्या संघर्षात साथही करता आली नसती. या संघर्षातूनच नवी

समाजव्यवस्था जन्माला येणार आहे, याची सुर्वेंना खात्री आहे. त्यासाठी आयुष्यभर जे जे केले त्याचा त्यांना अभिमान आहे. 'तेवढ्या दर्शनाचे' कवितेतील या ओळी हा प्रत्यय देतात.

*'येणाऱ्या नवरचनेस माझाही सलाम सांगा*
*ह्याच भव्य क्षणासाठी उभी हयात जाळली*
*काहीजण लोहघण हाती धरून उठलो*
*बंडाव्याची कोटी बीजे याच भूमीत पेरली'*

सुर्वे यांच्या कवितेतील नायक सुर्वेंच्या बऱ्याचशा कवितांचे नायक मार्क्सवादी परंपरेतूनच आलेले आहेत. आणि म्हणूनच ते स्वयंभू आणि संघर्षशील आहेत. 'स्वतःलाच रचित गेलो' कवितेतील नायक स्वतःच्या स्वयंभू असण्याची आणि ताठ कण्याची साक्ष देतो. उगीच कुणाला सलाम न करणारा, कुणापुढे हात न जोडणारा, कळपात राहणे पसंत नसलेला, आणि स्वतःच स्वतःला रचित गेलेला हा नायक नवीन युगाच्या नायकाचेच प्रतिनिधित्व करतो. 'बेतून दिलेले आयुष्य' नाकारणारा, तसेच बेतून दिलेल्या रस्त्याने गेलात तर स्वर्ग मिळेल अशा भाकड कल्पनांवर थुंकणारा असा हा नायक आहे. शोषण आणि पिळवणूक तसेच कामगारांच्या हक्काच्या पायमल्लीने सर्व मर्यादा ओलांडल्या असताना अजून स्वतःला धीर किती द्यायचा, हा प्रश्न 'कठीण होत आहे' या कवितेत उपस्थित होतो.

*'दररोज स्वतःला धीर देत जगणे; कठीण होत आहे*
*किती आवरावे आपणच आपणाला; कठीण होत आहे*

......

*तडजोडीत जगावे; जगतो : दररोज कठीण होत आहे*
*आपले अस्तित्व असूनही नाकारणे; कठीण होत आहे'*

आता सहनशक्तीच्या आणि तडजोडीच्या सर्व मर्यादा संपल्या आहेत हे नमूद करतानाच दबलेल्या असंतोषाचा उद्रेक होणार नाही याची खात्री देता येणार नाही, हे देखील तो स्पष्ट करीत आहे.

*'समजून समजावतो, समजावूनही नच मानलो*
*कोठारात काडी न पडेल, हमी देणे; कठीण होत आहे.'*

'युगस्वामी' या कवितेचा नायक संपूर्ण सृष्टीचा नियंत्रक आहे. वाऱ्याने

***सुर्वेंच्या कवितेत या जातीय आणि वर्गीय भेदाचे सुस्पष्ट चित्र दिसते. हे चित्र रंगवताना सुर्वे वास्तवाचा आधार सोडीत नाहीत. तसेच ते तटस्थ भूमिका न घेता, शोषण आणि पिळवणुकीने नाडलेल्या दुसऱ्या वर्गाची बाजू अगदी उघडपणे घेतात.***

पान हलवले नाही तर वाऱ्याचे खूर कापून आणण्यास तो सिद्ध आहे. त्याला त्याच्या मनगटातील ताकदीवर प्रचंड विश्वास आहे, आणि त्या बळावर तो जग बदलू पाहत आहे. स्वतःच्या मनगटात ताकद असली तरी या नायकाला कुणालाही दास करायचे नाही. म्हणून तो म्हणतो–

*'मज करावयाचे नाही कुणासही दास*
*धजू नये कराया मज भुरटा आदेश'*

हे जग मिथ्या आहे, सर्व अशाश्वत आहे, या इहवादी विचाराला स्पष्ट उत्तर देत, मीच या युगाचा स्वामी आहे असे तो ठणकावून सांगतो.

*'तुम्ही अशाश्वतेची उकरून काढा मढी*
*मी शाश्वताचीही रोवीन त्यावर गुढी*
*श्वासाश्वासांतून सुखाची मी पेरीन हमी*
*घडल्या जाणाऱ्या युगाचा मीच खरा स्वामी'*

'लालबाग' या कवितेचा नायक कुणी माणूस नाही तर कष्टकऱ्यांना आश्रय देणारा मुंबईतील लालबाग हा परिसरच नायक आहे. या परिसरातील संघर्षमय जीवन आणि या जीवनानेच ओळख करून दिलेला मार्क्सवादी विचार या कवितेत व्यक्त झाला आहे.

*'तुझ्याच कुशीचा आधार घेतघेत*
*कौलारी छपरांचा आडोसा घेत*
*ग्रंथ लेनिनचा पठण केला आम्ही*
*बंध तोडणारा हातोडा घेतघेत'*

हे सांगतानाच हा लालबाग म्हणजे अर्थात तेथील कष्टणारा कामगार हाच उद्याच्या युगाचा नेता असणार आहे, हेही सुर्वे त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण आशावादी मांडणीने व्यक्त करतात –

*'उद्याच्या नभाचा ताराच लालबाग*

*कैक ऋतूंचा ऋतुराज लालबाग*
*रस्त्यांना फुलांच्या माळा शृंगारून*
*मरणाला मारून धावणारा लालबाग'*

'क्षणात जिंकीन', 'आज मला उसंत नाही', 'सूर्यकुलातील लोक', 'जाहीरनामा', 'नायक' अशा किती तरी कवितांमध्ये मार्क्सवादी विचारांच्या मुशीतून घडलेल्या नायकाचे दर्शन घडते. सुर्वे म्हणतात, प्रारब्धावर माझा नायक विसंबून नाही. तो स्ट्रगलमध्ये उभा असलेला आहे. आपली करुणा घेऊन आहे. लढा घेऊन आहे. जीवनाचे ताणेबाणे घेऊन आहे. रंगसंगती घेऊन आहे. एकूण, या तऱ्हेची त्यांची कविता वाचताना ती भडक किंवा अतिरंजित होत नाही. सुर्वे यांचा नायक मार्क्सवादी मानवतावादाचे प्रतीक अधिक भासतो. हा विचार सुर्वे यांच्या कवितांच्या आशयामध्ये, वर्गीय भूमिकेमध्ये, त्यांनी रंगविलेल्या व्यक्तिचित्रांमध्ये, संघर्षशील आणि क्रान्तिकारी वृत्तीमध्ये, आणि आशावादी दृष्टिकोनामध्ये दिसून येतो. सुर्वे यांचा मार्क्सवाद त्यांच्या कवितेला प्रेरणादायी ठरला. पण कुणी मार्क्सवादी आहे म्हणून कविता करू शकणार नाही. त्यामुळे सुर्वे यांचं कवित्व आणि त्याची विचारसरणी यात काहीही संबंध नाही.

## सुर्वे यांची कविता : औदासीन्य नाकारणारी

जीवनाच्या रोजच्या लढाईत पराभव अधिक आणि विजय मात्र दुर्मीळ. म्हणून लढायचे थांबावे का? जर प्रतिस्पर्धी अधिक ताकदवान आणि पराभव जवळ-जवळ खात्रीलायक, तर मग मरण बनून राहिलेल्या या जीवनाला शरण जावे का? हे प्रश्न मनात येणे अगदी स्वाभाविकच आहे. त्याचा परिणाम म्हणून उदास आणि हताश वाटणेदेखील नैसर्गिक आहे. म्हणून आपण कशासाठी लढत आहोत हे दृष्टीआड होता कामा नये. सुर्वे यांनी 'चार शब्द' या कवितेत याचे उत्तर देऊन ठेवले आहे.

*'रोटी प्यारी खरी आणखी काही हवे आहे*
*याचसाठी माझे जग राजमुद्रा घडवीत आहे.'*

हे '---आणखी काही हवे आहे' हे अत्यंत महत्त्वाचे आहे. पोट गच्च भरलेले असणाऱ्या व्यक्तीला असे वाटणे निराळे! पण टीचभर पोट भरणेदेखील कठीण जात असलेल्या माणसाला हे आव्हान आहे. ही

◆ ***पैशाच्या नादी आपण लागलो नाही हे बरेच झाले, कारण त्याशिवाय कष्टकऱ्यांच्या व्यथेला शब्दरूप देता आले नसते, तसेच त्यांच्या संघर्षात साथही करता आली नसती.*** ◆

भूक आहे हक्क मिळवण्याची, मूलभूत मानवी मूल्य या समाज-व्यवस्थेत पेरण्याची, किमान मानवी सन्मानाची! मग जर सारी लढाईच अस्तित्वाची आहे, तर लढणे हे विजयापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे. यासाठी उदास आणि हताश होऊन चालणार नाही. मग या लढाईसाठी प्रभावी शस्त्रे कोणती? हे देखील सुर्वेंनी त्याच कवितेत नमूद करून ठेवले आहे.

*'इथूनच शब्दांच्या हाती फुलं ठेवीत आहे*
*इथूनच शब्दांच्या हाती खड्गे मी देत आहे.'*

'फुलं' आणि 'खड्ग' याचा सामान आणि समतोल वापर शिकवणारी, मनाला उभारी देणारी, वर्तमानकाळ आपला नसला तरी भविष्यकाळ आपला असणार आहे, हा संदेश देणारी सुर्वे यांची आश्वासक कविता अत्यंत महत्त्वाची आहे. 'काय करावे' या कवितेत कितीही औदासीन्य आले तरी माणसाने स्वतःचे गाणे गात राहिले पाहिजे, असे कवी सांगतो.

*'आपल्या उदास रात्रीत माणसाने गाऊ नये, तर काय करावे?*
*स्वतःला हजारदा चाचपून घेऊ नये तर काय करावे?'*

आणि प्रलोभनाच्या काळात, मानवी मूल्ये चोर बाजारात विकणे शक्य असलेल्या काळात, उदास वाटणे सोपे झाल्याच्या काळात, सतत आपली 'भूमिका' तपासत राहणे, आणि फिरून फिरून भानावर येत राहणे, याचे महत्त्व कवी विशद करतो आहे.

*'म्हणालोच, ही पृथ्वी : हिला केवळ जन्माला घालणेच*
*ठाऊक आहे*
*आपणच आपणाला सदैव साद घालू नये, तर काय करावे?'*

लढाई कितीही जिकिरीची असली, तरी 'आता सगळे संपले' असे म्हणण्यात काय हशील! आपलाच गमावलेला आत्मविश्वास बाहेरून कुणी तरी देईल, याची वाट पाहणे, यात काय हशील! आपणच स्वतःला गोळा करीत उठायला हवे, आणि त्यासाठी आवश्यक ती ऊर्जा आपल्या

आतच असल्याने ते शक्य आहे. ‘दगड’ या कवितेत कवी हेच समजावून सांगतोय –

*‘उरावर दगड ठेवून बोलू नको; बोलवणार नाही*
*सूर तुझे, लय तुझी, तारा तू पिळल्यास, मी नाही*
*......*
*खूप दूरवर नांगरून पडला आहे उजेड*
*खुशीत आहे मी : तुझे फूलपण तुला विसरले नाही’*

‘एखादा गजरा हाताला’ या कवितेत सुर्वे सांगतात –
*‘हे मानले; सारे आदर्शच आता विकाऊ वस्तूंचे बाजार झालेत*
*अजून आपण एकमेकांचा हात, विश्वास तर सोडलेला नाही.*
*विचार करावा आणि उदास व्हावे; असा हा कालखंड*
*म्हणून दोस्तहो! एखादा गजरा हाताला बांधाल की नाही?’*

‘माफ करा’ या कवितेचा नायक असाच आशावादी आहे. जगणे कितीही कठीण झालेले असले आणि सहन करायचे अजून कितीही बाकी असले, तरी मला सारी आयुधे टाकण्यास सांगू नका, असे त्याचे म्हणणे आहे. या नायकाला त्याचे ध्येय पक्के माहीत आहे, आणि म्हणूनच लढाई थांबवायला तो ठामपणे नकार देत आहे.

*‘ताऱ्यांच्याही पुढची दुनिया माझ्या नजरेत आहे*
*एक फुल, एक हृदय, एक ग्रंथ नजरेत आहे*
*नजर रोखून बसलो तो क्षणही समीप आहे*
*काळोखाचे कैदी तुम्ही उगा धाक दावूच नका!*
*माफ करा एवढे काम मला सांगूच नका!’*

‘आमंत्रण’ या कवितेतील नायक औदासीन्यालाच आव्हान मानतो, आणि जेव्हा जेव्हा उदास वाटते, तेव्हा तेव्हा पुन्हा लढायला तो सज्ज होतो–

*‘जेव्हा जेव्हा सर्वत्रच उदासले; तेव्हा तेव्हा ठरवले*
*हे आमंत्रण आम्हाला; अन् स्वार शिबिरात हजर होते.’*

नारायण सुर्वे यांच्या या कविता जीवनासाठी मार्गदर्शक कविताच आहेत; अक्षय ऊर्जेचा स्रोत आहेत.

◆ *‘फुलं’ आणि ‘खड्ग’ याचा समान आणि समतोल वापर शिकवणारी, मनाला उभारी देणारी, वर्तमानकाळ आपला नसला तरी भविष्यकाळ आपला असणार आहे, हा संदेश देणारी सुर्वे यांची आश्वासक कविता अत्यंत महत्त्वाची आहे.* ◆

आज मात्र आजूबाजूचे जग बदलले आहे. सुर्वेंनी मुंबईतील ज्या कापड गिरण्या आणि गिरणी कामगारांच्या जगाबद्दल लिहिले ते जवळजवळ संपुष्टात आले आहे. अर्थात म्हणून कामगार संपला नाही. कामगारांचे प्रश्न पूर्वीपेक्षा अधिक बिकट झाले आहेत. हे प्रश्न फक्त कामगारांपुरते मर्यादित राहिले नाहीत, तर इतर क्षेत्रांतही त्यांची लागण झाली आहे. कामगार चळवळ पूर्ण विखुरली गेली आहे, दुर्बळ झाली आहे. असंघटित कामगारांना कुणी वाली नाही अशी परिस्थिती आहे. जे लहान-सहान सकारात्मक प्रयत्न सुरू आहेत ते या जागतिकीकरणाच्या प्रचंड रेट्यापुढे कमी पडत आहेत. आजच्या कामगाराचा त्याच्या इतिहासाशी, सामाजिक मूल्यांशी, चळवळीशी विशेष संबंध राहिलेला नाही. पूर्वीसारखा त्यांच्यात एकोपा राहिलेला नाही. ‘कामगार’ म्हणून एकसंध अस्मिता राहिलेली नाही. जात आणि धर्म या आधारावर या अस्मिता अधिकाधिक टोकदार होतायत. या जागतिकीकरणाच्या काळात जग जवळ येते आहे, पण माणूस माणसापासून दुरावतोय. कामगारच ‘स्थिर’ झाला नाही, एक झाला नाही, तर या रेट्यापुढे टिकाव कसा लागणार?

प्रश्न आहेत, तर लढाई सुरू ठेवावीच लागेल. प्रश्नांचे स्वरूप बदलले असले तरी मूलभूत घटक तेच आहेत. शेतकऱ्यांचे प्रश्न अजूनही आहेत. ‘डोंगरी शेत’ या गाण्याचे महत्त्व अजून संपलेले नाही. त्या गाण्याच्या तपशिलांमध्ये काही बदल झाले असतील. ती ‘डोंगरी शेत’ गाणारी स्त्री आत्महत्या करण्याचा विचारही करत नाही. ती संघटित होऊन संघर्ष करण्याचा प्रयत्न करते. सुर्वेंच्या कवितेतील इतर पात्रेदेखील टिकाव धरून आहेत. त्यांच्या कवितेतील नायक संघर्षशील आहे. त्यांचे प्रेम सामंजस्य आणि माणुसकीवर आधारलेले आहे. जात-धर्म या आधारावर विभागले जाणे ते नाकारीत आहेत. ‘व्यक्ती आणि समष्टी’च्या एकत्वावर

◆ ***‘माफ करा’ या कवितेचा नायक असाच आशावादी आहे. जगणे कितीही कठीण झालेले असले आणि सहन करायचे अजून कितीही बाकी असले, तरी मला सारी आयुधे टाकण्यास सांगू नका, असे त्याचे म्हणणे आहे.*** ◆

त्यांची श्रद्धा आहे. नशीब आणि प्रारब्धापेक्षा त्यांचा विश्वास स्वतःच्या ऊर्जेवर आहे आणि ही ऊर्जा ते स्वतःमधून, स्वतःच्या माणसांमधून, आणि आजूबाजूच्या जगाशी असलेल्या माणुसकीच्या संबंधांमधून प्राप्त करून घेत आहेत. नारायण सुर्वे यांची कविता म्हणूनच या बदललेल्या काळातही महत्त्वाची आहे. माणसाने माणसासाठी सुरू केलेल्या या संघर्षात मार्गदर्शक ठरावी अशीच आहे. त्यामुळे सुर्वेंच्याच शब्दात सांगायचे तर निराश होण्याची गरज नाही. एक माणूस उदास झाला, तर आजूबाजूच्या व्यक्तींनासुद्धा उदास वाटणे शक्य आहे. अशा वेळी या उदास व्यक्तीसाठी ‘जाहीरनामा’ या काव्यसंग्रहातील ‘आयुष्य’ ही कविता खचितच उपयोगी पडेल –

*तूही आणखीन उदासीनच करणार आहेस काय?*

*-- तर मग कठीण होईल*
*कसेबसे आयुष्य ओढणे; हे लोढणे;*
*थकणे, पुन्हा फिरून उभे राहणे.*

*अगोदरच सर्वत्र धूळ भरलेले वारे*
*पाने मिटावीत तशी मिटलेली दारे*
*दिशाहीन चालणे, थांबणे,*
*वाटले होते, परत कधीतरी होईल सावरणे.*

*झळाळेल दिवस*
*अश्रद्ध मी; तरीही वाटले;*
*न करताही असा एखादा पावेल नवस.*

*थोडे थोडे वाटून घेऊ दुःख*
*थोडे सुखही,*
*वाटा सरळ होतील अन्,*
*पुन्हा आयुष्य घेईल वळणे.*

*तूही आणखीन उदासीनच राहणार आहेस काय?*

❖❖❖

# नारायण सुर्वे यांचे कवितासंग्रह

नारायण सुर्वे यांनी वयाच्या तिसाव्या वर्षात १९५६ पासून कविता लेखन सुरू केले. सुर्वे यांच्या कविता 'युगांतर', 'नवयुग', 'मराठा' ह्या नियतकालिकांतून प्रसिद्ध होत होत्या. अभिनव प्रकाशनच्या वतीने नारायण सुर्वे यांचा १९६० साली 'ऐसा गा मी ब्रह्म' हा पहिला कवितासंग्रह प्रसिद्ध झाला. त्याला कवी कुसुमाग्रज यांची प्रस्तावना आहे. अभिनव प्रकाशनचे वा. वि. भट हे डाव्या चळवळीतील सुर्वे यांचे सहप्रवासी होते.

'माझे विद्यापीठ' या दुसऱ्या संग्रहाच्या वेळी मात्र कवी केशव मेश्राम यांच्यामुळे सुर्वे पॉप्युलरकडे आले. 'माझे विद्यापीठ', 'जाहीरनामा' आणि 'नव्या माणसाचे आगमन' या तीन संग्रहांबरोबरच 'ऐसा गा मी ब्रह्म'ची नवीन आवृत्तीही पुढे पॉप्युलरनेच प्रसिद्ध केली. १९५६ ते १९९५ या चाळीस वर्षांत या चार संग्रहांमधल्या १४५ कविता सुर्वे यांनी लिहिल्या. सुर्वे यांनी लिहिलेल्या प्रत्येक संग्रहाला स्वतःचे असे व्यक्तिमत्त्व लाभले. याव्यतिरिक्त त्यांनी हिंदी-उर्दूमधल्या अनेक कवितांचे मराठीत अनुवादही केले. या अनुवादित कविता आणि चार संग्रह तयार करताना वगळलेल्या काही कवितांचे संकलन विजय तापस यांनी 'गवसलेल्या कविता' नावाने केले. संपादक विजय तापस आणि प्रकाशक प्रदीप कर्णिक यांचे हे योगदान महत्त्वाचे आहे. (संदर्भ – 'नारायण सुर्वे यांच्या समग्र कविता' प्रस्तावना - 'दिगंबर पाध्ये', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.)

'नारायण सुर्वे यांच्या समग्र कविता' या पुस्तकात त्यांच्या पुढील काव्यसंग्रहाचा उल्लेख केला आहे.

- ऐसा गा मी ब्रह्म (१९६२)
- माझे विद्यापीठ (१९६६)
- जाहीरनामा (१९७५)
- नव्या माणसाचे आगमन (१९९५)

- नारायण सुर्वे यांच्या गवसलेल्या कविता (१९९५, संपादक- विजय तापस)

त्यांच्या या काव्यसंग्रहातील कवितांचे काही भाग –

## गिरणीची लावणी

*सात वाजता सकाळी। भोंगा वाजवी भूपाळी।*
*सुरू पहिली पाळी। मोठ्या डौलात।*
*चाक फिरे गरगरा। सुत निघे भरभरा।*
*नटवाया वसुंधरा। आमच्या घामातून।।*

*लेवून सूत नऊवारी। नखरा बाबीणीचा भारी।*
*कांडी गोल फेरे मारी। मग साच्यातून।*
*झडपीनं घालून वारा। कापसा न देई थारा।*
*जोडून तुटलेल्या तारा। तारा जुळवून।।*

*ऐका घामाची कहाणी। फिरवी कळ ब्रह्मावानी।*
*तंतुतंतूला जोडूनी। वस्त्र गुंफून।*
*रंग घेऊन आभाळाचा। हिरव्या सोनाळ शेताचा।*
*सातरंगी इंद्रधनूत। वस्त्र गुंफून।*

*नाना ऋतूंच्या हो कळा। खुलवी माझा वस्त्रमळा।*
*मरवा मोतीया पिवळा। तुरा खोवून।*
*झोंबती चैत्राच्या झळा। भिजे श्रावणात शेला।*
*उब चोरितो हिवाळा। हेरून ऋतूंचा हा चाळा।*
*विणतो माझा कबीर भोळा। जगा नटवून।।*
*मलमल आणिक दोरवा। झोक साडीचा हिरवा।*
*शालू पैठणी भगवा। झळके पितांबर।*
*शोभे काळी चंद्रकळा। मोरपिसावानी डोळा।...*

*('ऐसा गा मी ब्रह्म!' या काव्यसंग्रहातील कवितेचा काही भाग)*

## माझे विद्यापीठ

*ना घर होते, ना गणगोत, चालेन तेवढी पायाखालची जमीन होती*
*दुकानांचे आडोसे होते; मोफत नगरपालिकेची फूटपाथ खुलीच होती.*

*अशा देण्यात आलेल्या उठवळ आयुष्याची ऊठबस करता करता...*
*टोपलीखाली माझ्यासह जग झाकीत दररोज अंधार येत जात होता.*

*मोजलेत सर्व खांब ह्या रस्त्यांचे, वाचली पाट्यांवरची बाराखडी*
*व्यवहाराच्या वजाबाकीत पाहिलेत; हातचे राखून कित्येक मारलेले गडी*

*हे जातीजातींत वाटलेले वाडे, वस्त्या, दारावरचे तांबडे नंबरी दिवे*
*सायंकाळी मध्यभागी असलेल्या चिडियाघराभोवती घोटाळणारे गोंगाटाचे थवे*

*अशा तांबलेल्या, भाकरीसाठी करपलेल्या, उदास वांदेवाडीच्या वस्तीत*
*टांगे येत होते, घोडे लोळण घेत होते, उभा होतो नालीचा खोका सांभाळीत*

*''ले, पकड रस्सी-हां-खेच, डरता है? क्या बम्मनका बेटा है रे तू साले*
*मजदूर है अपन; पकड घोडे को; हां; यह वाह रे मेरे छोटे नालवाले.''*
*याकूब नालबंदवाला हसे, गडगडे. पत्रीवाला घोडा धूळ झटकीत उभा होई*
*''अपने को कलाकांडी, तेरेको जलेबी खा.'' म्हणत दुसरा अश्व लोळवला जाई*

*याकूब मेला दंग्यात, नव्हते नाते; तरीही माझ्या डोळ्याचे पाणी खळले नाही*
*उचलले प्रेत तेव्हा 'मिलाद-कलमा'च्या गजरात मिसळल्याशिवाय राहिलो नाही.*

*त्याच दिवशी मनाच्या एका कोऱ्या पानावर लिहिले, ''हे नारायणा*
*अशा नंग्यांच्या दुनियेत चालायची वाट; लक्षात ठेव सगळ्या खाणाखुणा''*

*भेटला हरेक रंगात माणूस, पिता मित्र, कधी नागवणारा होऊन*
*रटरटत्या उन्हाच्या डांबरी तव्यावर घेतलेत पायाचे तळवे होरपळून*

*तरी का कोण जाणे! माणसाइतका समर्थ सृजनात्मा मला भेटलाच नाही*
*आयुष्य-पोथीची उलटली सदतीस पाने; वाटते, अजून काही पाहिलेच नाही,*

*नाही सापडला खरा माणूस; मीही तरी मला अजून कुठे पुरता सापडलो?*
*सदतीस जिने चढून उतरताना, मीही नाही का कैकदा गोंधळून सापडलो?*

*आयुष्य दिसायला पुस्तकाच्या कव्हरासारखे गोंडस, गुटगुटीत, बाळसेदार*
*आतः खाटकाने हारीने मांडावीत सोललेली धडे, असे आळेवर टांगलेले उच्चार*

*जीवनाचा अर्थ दरेक सांगीत मिटवीत जातो स्वतःला स्वतःच्याच कोशात*
*पेन्शनरासारखा स्मृती उजाळीत उगीचच हिंडतो कधी वाळूत कधी रामबागेत*

*हे सगळे पाहून आजही वाटते; ''हे नारायणा, आपण कसे हेलकावतच राहिलो.''*
*चुकचुकतो कधी जीव; वाटते, ह्या युगाच्या हातून नाहकच मारले गेलो.*

*थोडासा रक्ताला हुकूम करायचा होता, का आवरला म्यानावरचा हात*
*का नाही घेतले झोकवून स्वतःला, जसे झोकतो फायरमन फावडे इंजिनात*

*विचार करतो गतगोष्टींचा, काजळी कुरतडीत जणू जळत राहावा दिवा एक*
*उद्‌ध्वस्त नगरात काहीसे हरवलेले शोधीत हिंडावा परतलेला सैनिक*

*किती वाचलेत चेहरे, किती अक्षरांचा अर्थ उतरला मनात*
*इथे सत्य एक अनुभव, बाकी हजार ग्रंथराज कोलमडून कोसळतात.*

*खूप सोयरीक करतो आता ग्रंथांची; वाटते तेही आपणासारखेच बाटगे निघाले*
*हवे होते थोडे परिचारिकेसम, कामगारासम निर्मितीक्षम. पण दुबळेच निघाले.*

*जगताना फक्त थोड्याशाच शब्दांवर निभावते; मरताना तेही बापडे दडतील*
*स्ट्रेचर धरून पोशाखी शब्द रुख्या मनाने आमची तिरडी उचलतील*

*वाढले म्हणतात पृथ्वीचे वय संस्कृतीचेही; फक्त वयेच वाढत गेली सर्वांची*
*छान झाले, आम्हीही वाढतो आहोत नकाशावर, गफलत खपवीत जुळाऱ्यांची.*

*ह्या कथाः कढ आलेल्या भाताने अलगद झाकण उचलावे तसा उचलतात*
*रात्रभर उबळणाऱ्या अस्थम्यासारख्या अख्खा जीव हल्लक करून सोडतात.*

*कळले नाही. तेव्हा याकूब का मेला? का मणामणाच्या खोड्यात आफ्रिकन कोंडला?*
*का चंद्राच्या पुढ्यातला एकुलता पोर युद्धाच्या गिधाडाने अल्लद उचलला?*

*चंद्रा नायकीण; शेजारीण, केसांत कापसाचे पुंजक माळून घराकडे परतणारी*
*पंख काढलेल्या केसांवरून कापसाखळीची सोनसरी झुलपावरून झुलणारी*

*अनपढ़ रोजच विकत घेई पेपर, रोजचं कंदिलाच्या उजेडात वाचायची सक्ती होई*
*''खडे आसा रे माझो झील; ह्या मेरेर का त्या रे,'' भक्तिभावाने विचारीत जाई.*

*कितीतरी नकाशांचे कपटे कापून ठेवले होते तिने; जगाचा भूगोल होतात जवळ*
*भिरभिरायची स्टेशनांच्या फलाटावरून, बराकीवरून, मलाच कुशीत ओढी जवळ*

*मेली ती; अश्रूंचे दगड झालेत. चटके शांतवून कोडगे झाले आहे मन*
*बसतो त्यांच्या पायरीवर जाऊन, जसे ऊन उठताना उठवत नाही नाती तोडून*
*निळ्या छताखाली नांगरून ठेवल्या होत्या साहेबांच्या बोटी*
*दुखत होत्या खलाशांच्या माल चढवून उतरून पाठी...*

*कुठे असेल माझा गुरू, कोणत्या खंदकात, का? बंडवाला बंदिशाळेत*
*अजून आठवतो आफ्रिकन चाचाचा पाठीवरून फिरलेला हात*

*आता आलोच आहे जगात, वावरतो आहे ह्या उघड्या-नागड्या वास्तवात*
*जगायलाच हवे; आपलेसे करायलाच हवे; कधी दोन घेत; कधी दोन देत*

*('माझे विद्यापीठ' ही नारायण सुर्वे यांची आवडती कविता आहे. 'माझे विद्यापीठ' या संग्रहातील कवितेचा काही भाग)*

## बेअब्रू खूपच झाली

*बेअब्रू खूपच झाली अब्रूदारांच्या जगात*
*प्रत्येक पत-पेढीवर आमची चर्चा निघेल*
*तरी आम्ही जगता; असा लौकिक बाजारात*
*त्यांच्या नावासोबतच आमचेही नाव निघेल*

*हृदय नेऊन दाखवावे कोणत्याही घरात*
*बंद दारादारांतून आमची कहाणी कळेल*
*किती मोजलेत तारे दुपारच्या अंधारात*
*कितीदा तापला तवा त्याचेकडून कळेल...*

*बेअब्रू खूपच झाली; अब्रूदारांच्या जगात*
*तरी त्याच्या घरासमीप माझेही घर मिळेल...*

## जाहीरनामा

*आजच्या नावाने आणि*
*आजच्या दुःखाच्या नावाने*
*संथपणे प्रकाशात येत असलेला भू-भाग त्याच्या नावाने*

*आजच्या सृजनातील गरजेच्या*
*प्रतीक्षेतील प्रत्येक क्षणाच्या*
*औषध मागणाऱ्या व्यथांच्या*
*गोळी लागेल म्हणून धपापून उडणाऱ्या मनामनातील कबुतरांच्या नावाने...*

*उत्तर ध्रुवावरून सरकणारी हिमलाट*
*पॅरिसचा बाजार गरम असेल*
*पेंग्विनच्या झुंडीकडे पाहत, काप्रीत*
*एखादी वक्षावर टेकलीही असेल*

*टेम्स धपापत उतरत असेल अटलांटिकमध्ये*
*हॅम्लेट बावरला असेल*
*हिंदुस्थानच्या दिशेने एखादा टपोर काळभोर ढग संथपणे सरकत असेल*
*खुंटीवर स्वप्ने टांगून मान मोडून काम करणाऱ्या वास्तवाच्या*
*पोलाद वितळवून मनासारखा आकार देणाऱ्या झोतभट्ट्यांच्या*
*चहाच्या मळ्यातील पत्ती खुडून शिणलेल्या दळदार बोटांचा*
*भार पेलून मोकळी होऊ पाहणाऱ्या गर्भवती कवितेच्या नावाने*

*गर्भार गतीच्या नावाने*
*पणतीच्या मिणमिणत्या प्रकाशात आपणच आपली ज्याने कापली होती नाळ*
*दोस्तहो! त्या, ह्या शतकाची आता सुरू होत आहे संध्याकाळ.*

*टकटक करतो आहे नवा इसवी सन दारावर*
*लवकरच हेही सुरू करील आपली आवराआवर*
*थाटील बिऱ्हाड इतिहासाच्या पुढील पानावर*
*हक्क सांगेल मागील कर्तृत्वावर*
*शे-सतरात, सदतिसात, सत्तेचाळिसात*
*पुढच्या उरलेल्या अनेक अंकांत...*
*शिकवील शिक्षक अंक मांडून फळ्यावर*
*फार तर; छडी टेकवून नकाशातील एखाद्या रेषेवर*
*पण कुणी सांगेल काय? ह्या शतकात चंद्र महागला होता*
*कलकत्त्याच्या रस्त्यावर धोंडा होऊन माझा आत्मा बग्गी ओढीत होता*
*पण एवढे पुरे; आपणही आता धुरकटलेले चष्मे बदलून घ्यावेत*
*आपणही ह्या शतकात जन्मलो; आपलेही हिशेब चुकते करावेत...*

*दोस्तहो! ह्या शतकाची संध्याकाळ सुरू होत आहे...*

*सहजच उपडी होईल पृथ्वीची होडी ॲटमच्या एका गोळ्यात*
*पापणी लवता लवता मिळून जाऊ खोल खोल तळात*
*हिरोशिमाला नंतर फुले तरी आली-*
*अपणाला...*

*- तर संध्याकाळ सुरू झाली आहे*

*मी एक अलिखित अस्तित्व घेऊन हिंडतो आहे*
*थांबतो आहे; परंपरेच्या पाट्या वाचून*
*इथे आपले कोणी नाही म्हणून*
*पुढे वळतो आहे*
*एक दिवा पेटवून दुसऱ्या दिव्याकडे*
*लपकन वळणारा हात मला दिसतो आहे*
*आधार तेवढाच आहे*

*- संध्याकाळ सुरू होत आहे...*

*मी पाहतो आहे*
*माझ्या अस्तित्वाला फुटणारे पंख*
*पोलादी नसानसातून वाजताहेत शंख*
*मी एक सत्य पृथ्वी एक सत्य*
*सर्वांसाठी आपण हेही एक सत्य...*

*रक्त माझे; ठिबकत ठिबकत पसरते*
*दोन्ही ध्रुवांच्या मध्यातून*
*आणि दोस्तहो!*
*मी पाहतो आहे*
*एक क्षुब्ध नवागत गतीचे टोक धरून*
*लिहितो आहे;*
*हे शब्द हटवा... हे पुतळे... स्थितिस्थापक.*
*हवा आहे मनासारखा नवा जाहीरनामा म्हणून.*
*नवा जाहीरनामा म्हणून.*

*(‘जाहीरनामा’ या काव्यसंग्रहातील कवितेचा काही भाग)*

## पोर्टरची स्वगते

*१) आपनच आपल्याशी बोलत ऱ्हानं बरं वाटतं*
*येळबी जातो, अन् हिसाबकिताब व्हतो मनाचा.*
*बोगीतनं,*
*मानसं उतारत्यात, ढकलत चढत्यात, ही झुंबी*
*पुन्हा फलाट रिकामाच तस्सं हाय सालं हये मनाचं.*

*पण मास्तर येडा म्हनतो,*
*कामातनं गेल्याली केस म्हनतो,*
*कवा कवा त्योबी कावतो; करील काय?*
*अख्खी ढोसून तांबारल्यागत*
*ढुराकतो परतेकावर*
*लोखंडी जिन्याकडं बसलेला बगून*
*फुसासत येतो. भांडतो.*
*कडंला बसून टिपं गाळतो,*
*मनाचा झाडझाडोरा करून घेतो*
*उजाडलं; का त्यो खुर्चीतला सायब*
*आन् मी उगल्या*
*झंडीवाला*

*२) मास्तर, सगळी कामं सांगा*
*तेवढं ते घरटं पाडायचं काम सांगू नगा*
*जीव उदास व्हतो...*
*व्हय जीव उदास व्हतो आपला*
*पोरगं हगलं तर तिथं कुनी कापत न्हाई,*
*का शिवत न्हाईत...*
*शिटाक, शिटाक, शिटाकत्यात- हां शिटाकत्यात*
*खरं हाय- खरं...*
*माझा रामूबी कवा कवा असाच शिटाकतो...*

*ह्या- पर मीबी वस्ताद*
*रुळाजवळ वाळलं गवात अजून दिलं त्येस्नी*
*म्हनलं बांधा... बांधा घरटी*
*आपल्याला न्हायाला न्हाय तर न्हाय*
*पर अनजान पराण्यांसाठी तर हवंच.*

*३) गावातल्या साळंला मजला चढवायचा म्हनत्यात*
*आपनबी धा रुपय घालाय पायजे*
*तवा वाईच वंजं हलकं हुईल डुईवरलं*
*दोन बछडीबी शिकत्यात आपली*
*निसतं पोटार्थी व्हन्यात मानूस कंडम व्हतो*
*नमुन्यावरी जातो*
*नेहरू, बाबासाहेब ह्या वाटेवरनं गेले तवा तेंचा काय झोका*
*आता सगळेच बाळासाहेब झाल्यात...*

*४) अजून आटावलं का भडभडा वकाय व्हतं...*
*हीच होती मेळ,*
*हितंच; अस्साच इचारात व्हतो;*
*हाळी आली; आन् लटकन् उठलो...*
*नाकाला फडकं दाबीत उगाडला क्लॉकरूम*
*कुजलेल्या मानसाची पेटी खोल्ली*
*छी... छी... छी...*
*मळमाळलं, ढवाळलं, मीच भाईर पळालो,*
*मानसाला इतकी घान असती?*

*हा देह रोज आपन धुतो*
*गंधटिळा लावतो.*
*इट्टल गजरात सकाळधरनं मिरवतो,*
*इटाळ नगं म्हून सांभाळतो*
*पोथीपुराणं वाचतो...*

*म्हनलं-इटनेस! हां, लिवा माझं नाव*
*आन् माझा खांदाबी हाय मजबूत*
*पोटरचा.*
*आरं, जिवा हे अख्खं आभाळ*
*खांद्यावर घेन्यापरीस*
*मनसाला खांदा देनं पुन्याचं असतं*

*हित बसलं का आटवतं सालं एकेक...*

*५) सिंगल पडला*
*चला, उठा जिवा,*
*बूड हलवा*
*घंटा बडवा*
*नाईन्टीन डाऊन राइट टाइम आज*
*असंल एखादा मिनिस्टर आत*
*दिल्लीकी तबियत क्या है*
*सांगील आता सलीम डायवर*
*तेंच तोंड म्हंजी इंजानच एक*
*डायवर मोठा फाकडा*
*मिश्या न्हाईतच,*
*ह्या एकेक चिंचेचा आकडा*
*दानकन उडी मारून उतरल*
*म्हनल 'अपने घोडेको पानी पिलाव*
*और इंजिनको खोयला खिलाव*
*साला अपन लगेच पांडू है*
*इसलिए इंडियाका पॉलिटिक्स गांडू है।'...*

*(नव्या माणसाचे आगमन - काव्यसंग्रहातील काही भाग)*

## महाराष्ट्राच्या नावानं

*(गोंधळी आणि संबळवाला ही यांतील दोन प्रमुख पात्रे आहेत. प्रथम संबळवाला संबळ ठेक्यात वाजवत प्रवेश करतो. संबळची नांदी संपताच त्याला साथ करण्यासाठी गोंधळी पायांतील चाळ व उजव्या हातातील तुणतुणे वाजवून प्रवेश करतो. गोंधळी नाचतो त्यांचा क्षणभराचा नाच संपल्यांनतर गोंधळी कुळी सांगायला सुरुवात करतो.)*

*गोंधळी : देवाच्या नावानं*
*अरं दादाच्या नावानं-*
*संबळ : दादा ते नगं, माप ऐकलंय लोकांनी*
*गोंधळी : शाण्णव कुळींचा इतिहास*
*संबळ : त्यो कशाला भास? ते नगं*
*गोंधळी : दानधर्माची बात-*
*संबळ : तिला झाली युगं सात! ते नगं.*
*गोंधळी : बरं, झालेली कथा?*
*संबळ : हां, हां, तीच लाव गाथा! तीच सांग.*
*गोंधळी : सांगू? (सांगतो)*
*महाराष्ट्राच्या नावानं*
*ज्ञानदेवाच्या नावानं*
*राजा शिवाजीच्या नावानं*
*ज्योती फुलेंच्या नावानं*
*लोकमान्यांच्या नावानं*
*बाबासाहेबांच्या नावानं-*
*संबळ : (पुढची कडवी उचलतो)*
*राबणाऱ्यांच्या नावानं*
*कसणाऱ्यांच्या नावानं*
*झेंडा रोवून मरणार जे*
*त्या शहिदांच्या नावानं*
*(दोघेही) : आज म्या गोंधळ केला-*
*(दोघेही वंदन करतात.)*

*गोंधळी : आता कनच्या आळीनं जाऊ या?*

*संबळ : ही काय संबूर दिसतीया न्हवं, त्या महाराष्ट्राच्या आळीत चल.*

*गोंधळी : आता कनच्या आळीनं जाऊ या?*

*संबळ : ही काय संबूर दिसतीया न्हवं, त्या महाराष्ट्राच्या आळीत चल*

*गोंधळी : हां, चला (दोघेही तिथल्या तिथे गोल फिरतात)*

*संबळ : हां- ही आली महाराष्ट्राची आळी-...*
*या जनाईच्या लोकानं*
*या गाईच्या गा वासरानं*
*या सिंहाच्या गा छाव्यानं*
*या सूर्याच्या गा तेजानं*
*या शुक्राच्या गा ताऱ्यानं*

*गोंधळी : मायभाषेच्या हाकेनं*
*फौरनला गेला धावून*
*छातीत गोळी जिरवून*
*रक्ताची गुळणी थुंकून*
*महाराष्ट्राचे निशाण*
*त्यानं धरलं बघा तोलून*
*अमर झाला शहीद होऊन*
*गाभाऱ्यात पेटे निरांजन*
*जणू दीपगृह होऊन*
*तमात पसरे वेगानं*
*या शूर पुत्राच्या नावानं हो*
*आईनं धरम केला-*

*(दोघेही) : महाराष्ट्राच्या नावानं*
*ज्ञानदेवाच्या नावानं*
*(पुढच्या खोलीजवळ जातात. एक मध्यम वयाचा गिरणी कामगार येतो. तो त्याला आपलीच कथा लावायला सांगतो. गोंधळी*

*बोटांनी क्रिया करतो.)*

*संबळ : कारखाना उभा करून*
*मेलो तो बघा राबून*
*त्या तुकाराम बापानं*
*पुत्रास जन्म देऊन*
*धन्य कुळ केलं पावन*
*त्याच्या काशीराम लेकानं*
*तळहाती गिरण घेऊन*
*घामाची गंगा आटवून...*
*खांद्यावर याच्या बैसून*
*उगवे महाराष्ट्र-अरुण*
*विजयाचे बांधा तोरण*
*घरंदारं टाका रंगवून*
*अंगणात सडासंमार्जन*
*तुळशीचे डोले वृंदावन*
*याला सामोरे जाऊन*
*भावी महाराष्ट्र रचणाऱ्या*
*शिल्पकारास म्या वंदन*
*आज म्या भंडारा केला-*
*(इतक्यात गावाहून येणारा एक शेतकरी त्या चाळीत बोचक्यासह प्रवेश करतो. तोही आपली कथा लावायला सांगतो.)*
*जमिनीत बीज पेरून*
*फुलवितो धरणी सोन्यानं*
*खांद्यावर फाळ टाकून*
*ढवळ्यापवळ्या संग घेऊन*
*बळीराम चाले डौलानं*
*खोपटात त्याची धनीण*
*डोळ्यांच्या वाती पेटवून*
*चिमुरडी त्यांची दोन छान*

| | | |
|---|---|---|
| | | *आनंदानं जाती हरखून...* |
| *गोंधळी* | *:* | *आँ- काय झालं?* |
| *संबळ* | *:* | *कुटं चाललास दादा? अदुगर ह्याचं लाव- मग जित्रापाचं.* |
| *गोंधळी* | *:* | *अस्सं? बरं-*<br>*असा थोर माझा हलधर*<br>*राबवून घेई सावकार*<br>*धरतीचा पुत्र हा थोर*<br>*धरणीला झाला भार* |
| *संबळ* | *:* | *मायबोलीसाठी रणधीर*<br>*रणशिंग फुंकी सत्त्वर*<br>*गवताची केली तलवार*<br>*सत्तेला करी बेजार*<br>*जेरीस आणी मुजोर*<br>*मराठी गंगा आणि घरोघर*<br>*मराठी देश सुखी करणाऱ्या*<br>*माझ्या राजाला वंदून।।...* |
| *गोंधळी* | *:* | *म्होरं? ऐक-*<br>*नवमहाराष्ट्र राज्यात*<br>*साडेतीन कोटींचे हात*<br>*राबतील गिरणी-शेतात*<br>*नफेबाज कांडू उखळीत*<br>*भांडवलदार बांधू जोखडात*<br>*पिळणाऱ्या लावू या तात*<br>*छळणारे आवळू दोरीत* |
| *संबळ* | *:* | *डोईवर माती उधळीत*<br>*नांगर धावे बघा जोषात*<br>*नाचे मोर रानावनात*<br>*टिपऱ्या धरती पाण्याचे पाट*<br>*कृष्णा-कोयनेचा आगळा थाट* |

*पंढरी-घाट पाण्यात*
*मेघांचे कुंभ डोलतात*
*काळ्याभोर धरणी पिकतात*
*उगवेल सुखाची पहाट*
*धान्याची नाही ददात*
*बेकारीचं गाडूनिया भूत*
*सुखानं खाऊ साखरभात*

*गोंधळी : खरं हित समाजवादात*
*कष्टकरी - लोकशाहीत*
*अन्य उपाय नाही जगात*


*संबळ : मायबोलीचा महारथ*
*दौडत जाईल वेगात*
*पालखी मराठीची घेऊन*
*नाचेन म्या आनंदानं।।*
*(नाचत नाचत पडद्याआड होतो.)*

*- युगांतर (महाराष्ट्र राज्य स्थापना विशेषांक १ मे १९६०)*
*(काव्यसंग्रह - नारायण सुर्वे यांच्या गवसलेल्या कवितांचा काही भाग)*

❖❖❖

# नारायण सुर्वे नवे वळण...

सुर्वे यांच्या कवितेतून कविमनाच्या वृत्ती म्हणून जे जाणवते त्याचा मार्क्सवादी विचारसरणीशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संबंध आहे. भोवतालचे वास्तव सुर्वे यांना मान्य नाही. हे अप्रतिम वास्तव ते नाकारतात, परंतु हे वास्तव नाकारत असताना ते ज्यासाठी नाकारायचे त्या




नव्या वास्तवाचे चित्रही आपल्या कवितेतून सुर्वे साकार करतात. (सुर्वे यांच्या कवितेतील सहानुभाव व संघर्ष हा या नकार-होकाराशी संबंधित आहे.) हा नकार-होकार कविमनाच्या जीवनविषयक जाणिवेशी संबंधीत आहे. या नकार-होकारामागे असणारी मूल्ये व भावनात्मक कल पाहिले. तर त्यांच्या मार्क्सवादी विचारसरणीशी असणारा संबंध सहज लक्षात येण्यासारखा आहे. सुर्वे यांच्या कवितेतून ही जीवनविषयक जाणीव सातत्याने व अखंडपणे व्यक्त होत असल्यामुळे सुर्वे यांची कविता आणि मार्क्सवादी विचारसरणी यांचा अपरिहार्य संबंध आहे, असे म्हटले तर ते वावगे  ठरू नये.

मार्क्सवादी विचारसरणी सुर्वे यांच्या काव्यलेखनाला प्रेरक ठरली याचा अर्थ त्या विचारसरणीमुळे सुर्वे कवी झाले असे नाही. कोणतीही विचारसरणी निर्मितिशील मन घडवू शकत नाही. ते मुळात असावे

लागते. विचारसरणी केवळ त्या मनावर संस्कार करू शकते. म्हणून सुर्वे यांच्या कवी असण्याचा आणि मार्क्सवादाचा संबंध नाही. तसेच या कवितेचे कलात्मक मूल्य ठरविण्याच्या संदर्भातही मार्क्सवाद अप्रस्तुतच आहे. परंतु सुर्वे यांनी जी कविता लिहिली, त्या कवितेतील आशयामागे मार्क्सवादी मूल्ये व भावनात्मक कल आहेत म्हणून त्यांच्या कवितेच्या संदर्भात तो अप्रस्तुत ठरत नाही.

सुर्वे यांची कविता आणि मार्क्सवाद याचा विचार करताना आणखी एका प्रश्नाचा उल्लेख करणे आवश्यक आहे. हा प्रश्न म्हणजे सुर्वे यांच्या कवितेला मार्क्सवाद जसा प्रेरक झाला तसाच सुर्वे यांच्या कवितेतील मर्यादांनाही तो कारण झाला की नाही? सुर्वे यांच्या कवितेवर लिहिताना अनेकदा सुर्वे यांच्या कवितेतील मर्यादांचे संदर्भात मार्क्सवादी श्रद्धांचा उल्लेख झाला आहे. परंतु हे म्हणणेही काव्याच्या संदर्भात योग्य ठरणारे नाही. कोणतीही विचारसरणी ज्याप्रमाणे निर्मितीशील मन निर्माण करू शकत नाही, त्याचप्रमाणे ती निर्मितीचे स्वरूपही पूर्णपणे निर्धारित करू शकत नाही. म्हणूनच मार्क्सवादी विचारसरणाशी संबंधित कविता म्हटली की ती सुर्वे यांच्या कवितेसारखीच असली पाहिजे असे म्हणता येणार नाही. सुर्वे यांच्या जाणिवेच्या कक्षेत न येणारे, त्यांच्या मनाला न भावणारे असे किती तरी अनुभव व अनुभवांचे अर्थ मार्क्सवादाचा संस्कार असणाऱ्या निर्मितिशील मनाला जाणवणे शक्य आहे. या वेगळ्या अनुभवांचा वेगळा आविष्कारही असंभवनीय नाही. मार्क्सवादी दृष्टीने जग पाहणाऱ्याला सर्व काही सरळ आणि सोपेच दिसावे असा नियम नाही. किंवा आपल्या अनुभवांचे अमूर्तीकरण (अब्स्ट्रॅक्शन) त्या दृष्टीला करताच येणार नाही असेही नाही. म्हणूनच सुर्वे यांच्या कवितेच्या ज्या मर्यादा आहेत किंवा या कवितेत जे जे नाही त्याचा संबंध मार्क्सवादाशी नसून सुर्वे यांच्या निर्मितीशील मनाशी आहे. असेच म्हणायला हवे.

सुर्वे यांच्या कवितेच्या साधेपणाचे एक महत्त्व ती ज्या संदर्भात लिहिली गेली त्या संदर्भात आहे. सुर्वे यांच्या या कवितेमुळे मराठी कविता पुन्हा एकदा वास्तव जीवनाकडे वळली; सामान्य माणसांच्या सुख-दुःखांकडे वळली हे या कवितेचे श्रेय आहे. मराठी कवितेतील अनुभवांविषयीचे संकेत या कवितेने पुन्हा एकदा मोडून टाकले. कष्टकऱ्यांच्या जीवनातील

भावना, त्यांची स्वप्ने, त्यांच्या जीवनातील काव्य या कवितेने व्यक्त केले. अनेक दाहक वास्तव अनुभव सुर्वे यांच्या कवितेमुळे काव्यरूप पावले. सूक्ष्म व तरल अनुभवच काव्यरूप घेऊ शकतो अशी समजूत रूढ असताना सुर्वे यांनी आपल्या कवितेतून दणकट अनुभवविश्व साकार केले. वैफल्याशिवाय कवितेला खरी कलात्मकताच प्राप्त होत नाही अशी समजूत रूढ होण्याच्याच काळात आशावादी कविता लिहून आपले वेगळेपण सुर्वे यांच्या कवितेने वाचकांच्या मनावर ठसविले. कवितेच्या भाषेचा जो तोच तो किरटेपणा मराठी कवितेत जाणवू लागला होता त्याला सुर्वे यांच्या कवितेने धक्का दिला. सुर्वे यांच्या या अशा कवितेमुळे मराठी कविता पुन्हा एकदा मोकळी झाली. संकेतांनी जखडल्या जाणाऱ्या मराठी कवितेला असे मुक्त करणे हे मराठी कवितेच्या संदर्भातील सुर्वे यांचे श्रेय आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाच्या संधीचा विस्तार होऊन १९६० च्या सुमारास नवी शिक्षित पिढी साहित्यव्यवसायात प्रवेश करण्याच्या सुमारालाच सुर्वे यांची कविता आपली ठसठशीत वैशिष्ट्ये घेऊन वाचकांसमोर आली. भोवतालच्या वास्तवाला भिडण्याची या कवितेची प्रवृत्ती होती. एका बाजूने ज्ञान व संपत्ती यांची समाजात वाढ होत असतानाच अज्ञान व दैन्य यांचीही होणारी निर्मिती ही आधुनिकतेचीच नकारात्मक बाजू समाजासमोर येत होती. या नकारात्मक बाजूच्याच ठायी असणारे सामर्थ्य पाहण्याची, त्याच्या आधारे भविष्याचे स्वप्न पाहण्याची प्रवृत्ती या कवितेतून जाणवण्यासारखी होती. एक वेगळे भाव या कवितेत होते. साहाजिकच वेगवेगळ्या स्तरांतून येणाऱ्या नव्या कवींना ही कविता आपलीशी वाटली. परिणामी सुर्वे यांच्या कवितेसारखा एक प्रवाहच मराठी काव्यक्षेत्रात आकाराला आला. आज सामाजिक जाणिवेची जी विपुल कविता लिहिली जात आहे त्या कवितेवर सुर्वे यांचा किती आणि कसा संस्कार आहे ते पाहण्यासारखे आहे. हा संस्कार केवळ साठनंतर आलेल्या नव्या कवींवरच आहे असे नाही. सुर्वे कविता लिहू लागले तेव्हा प्रथितयश असणाऱ्या कवींवरही हा संस्कार दाखविता येण्यासारखा आहे. उपेक्षित जगाला आपल्या कवितेच्या अनुभवात स्थान देण्यापासून संथ गद्य लय असणारी भाषा योजण्यापर्यंत हा संस्कार म्हणजे मराठी

कवितेच्या क्षेत्रावर सुर्वे यांच्या कवितेच्या पडलेल्या प्रभावाचे दर्शक आहे. भोवतालच्या बदललेल्या वास्तवाचाही हा परिणाम आहे असे म्हटले तरी स्वातंत्र्योत्तर काळातील बदलत्या वास्तवाला अनुरूप अशी प्रवृत्ती प्रचलित करण्याचे श्रेय सुर्वे यांच्या कवितेलाच द्यावे लागते.

केशवसुत आणि मर्ढेकर या दोन्ही कवींनी मराठी कवितेला दिलेल्या वळणांच्या मुळाशी पाश्चात्त्य कवितेचा आघात होता. या दोन्ही वळणांचे प्रवर्तक इंग्रजी भाषा जाणणारे, त्या साहित्याच्या संस्कारांनी प्रभावित झालेले होते. साहजिकच पाश्चात्त्य साहित्यातील प्रवृत्तीचे मराठी काव्यपरंपरेशी नाते जोडण्याचा 'अर्थपूर्ण' प्रयत्न या दोन्ही वळणांत झाला. ही दोन्ही वळणे म्हणजे पाश्चात्त्य कवितेचे अनुकरण होते किंवा त्यातील वृत्ती या बाहेरून आयात केलेल्या वृत्ती होत्या असा याचा अर्थ नाही. परंतु पाश्चात्त्य साहित्याचा प्रभाव या दोन्ही वळणांतून जाणवण्यासारखा होता. या उलट, पाश्चात्त्य जगातील एकही भाषा मला येत नाही. पुस्तकाच्या दुकानाजवळून वळलो की, आतील ग्रंथांवरची सुरेख कव्हरे बघतो व पुढे सरकतो. भारतीय भाषांपैकी दोन भाषा मला येतात. एक उर्दू व दुसरी हिंदी. या दोन्ही भाषांतील मी कविताच मी अधिक वाचतो. उर्दूची काव्यशाखा संपन्न आहे व हिंदीतील नव्या प्रवाहांची तुरळकच कविता मी वाचली आहे,' असे सुर्वे यांनी स्वतःच एका लेखात म्हटले आहे. साहजिकच सुर्वे यांची कविता पाश्चात्त्य प्रभावापासून मुक्त आहे. त्यांच्या कवितेवर खोलवरचा संस्कार आहे तो उर्दू कवितेचा. सुर्वे यांच्यावर हा संस्कार कसा झाला याचे सुंदर उदाहरण सतीश काळसेकर यांनी 'अक्षर'च्या दिवाळी (२०१०)च्या अंकातील आपल्या लेखात केले आहे. तेथे ते लिहितात, 'नारायण सुर्वे त्यांच्या पोरवयातच साम्यवादी पक्षाच्या जवळ आले. साम्यवादी पक्षाची केंद्रीय कचेरी खेतवाडीच्या नाक्यावर होती. काळ स्वातंत्र्यापूर्वीचा. पक्षकचेरीच्या रक्षणासाठी राखणदार कॉम्रेड उभे असायचे. सुर्वे तिथे होते. पक्षाच्या कार्यकर्त्यांत उर्दू साहित्यिकांचा मोठा सहभाग होता. सज्जाद जहीर, कैफी आझादी, अली सरदार जाफरी, मखदूम मोहिद्दिन, जॉ निसार अख्तर, साहिर लुधियानवी, शकील बदायुनी, शंकर शैलेश अशी उर्दू साहित्यातली मातब्बर मंडळी पक्षात होती. शिवाय कॉम्रेड पी. सी. जोशींच्या नेतृत्वाखाली हिंदी भाषी

मुन्शी प्रेमचंद, बलराज सहानी, भीष्म सहानी, नामवर सिंह, शमशेर बहादूर सिंह असे अनेक वावरत होते. वाढत होते.'

'खेतवाडीचा हा नाका मुस्लिम बहुल वस्त्यांना जवळ होता. भेंडी बाजार, आग्रीपाडा, मदनपुरा, कामाठीपुरा, नागपाडा हे सगळे जवळपास होते. उर्दूला कवितेत मुशायऱ्यांची समृद्ध परंपरा होती. मोठ्यातला मोठा कवीही आपली शायरी श्रोत्यांसमोर सादर करत होता..., सुर्वेंच्या कवितेतले संवाद, गद्यात्मकतेकडे झुकणारी लय, श्रोत्यांशी थेट संवाद साधू पाहणारी सुबोध शैली हे सगळे सुर्वे यांच्या अर्जित वारसा सांगणारे आहे. सुर्वे यांनी उर्दू कविता इतकी चांगल्या अंगाने आपल्या कवितेत मुरवली आहे की, त्याला प्रभाव म्हणणे निखालस चूक आहे. ते सगळे त्यांचे स्वतःचेच आहे.' या संस्कारामुळेच सुर्वे यांनी मराठीतील रूढ रचनाबंध नाकारले. गझल सदृश्य रचना केली. गोष्टरूपाला महत्त्व दिले. समूह चित्रण करणारी कविता लिहिली. या सर्वांमुळेच सुर्वे यांच्या कवितेला एक वेगळे व्यक्तिमत्त्व प्राप्त झाले. पाश्चात्त्य प्रभावापासून मुक्त असणारी कविता असेही एक वैशिष्ट्य या कवितेला प्राप्त झाले. स्वातंत्र्योत्तर काळात अशा साहित्याची जी एक परंपरा सिद्ध होऊ पाहत आहे त्या परंपरेतील एक महत्त्वाचे कवी म्हणून सुर्वे यांचा उल्लेख करता येतो.

सुर्वे यांची कविता आशयाला प्राधान्य देणारी आहे, ती वाचकांशी सरळ संवाद करणारी आहे, 'मी' बरोबरच 'आम्ही' ला सामावून घेणारी आहे. इत्यादी वैशिष्ट्यांचा नेहमी उल्लेख केला जातो. मर्ढेकरांच्या वळणानंतर निर्माण झालेल्या वळणाच्या संदर्भात या वैशिष्ट्यांचे वेगळेपणही जाणवते यात शंका नाही. परंतु ही वैशिष्ट्ये मराठी काव्यपरंपरेलाच अपरिचित होती असे समजण्याचे कारण नाही. आशयाला प्राधान्य देणे, वाचकांशी थेट संवाद करणे किंवा त्यांना आवाहन करणे, समाजपरिवर्तनाची भाषा बोलणे इत्यादी वैशिष्ट्यांचे दर्शन केशवसुतांच्या कवितेतच घडण्यासारखे आहे. बोलण्याचा भाषेचा वापर हे वैशिष्ट्य घेतले तरी कवितेची भाषा व बोलण्याची भाषा यांतील द्वंद्व मिटविण्याचा प्रयत्न केशवसुतांच्या कवितेतही दाखविता येण्यासारखा आहे. हे विशेष खास केशवसुतांचे म्हणावेत तर तसेही नाही. ही सर्व वैशिष्ट्ये थेट संतकवितेतच पाहावयास

मिळण्यासारखी आहेत. नारायण सुर्वे यांचे शब्द वापरायचे तर 'उललेलं हृदय' हा तसा संत काव्याचा एक विशेषच आहे. याचा अर्थ संतांपासून सुर्वे यांच्यापर्यंतची सर्व कविता सारखीच आहे असे नाही. त्यामागील काव्यविषयक भूमिकांमध्ये खूप अंतर आहे. हे अंतर कालसापेक्ष आहे. मराठी कवितेच्या संदर्भात संत कविता ही मध्यवर्ती परंपरा आहे. मराठी कवितेला जडत्व येऊ लागले, रंजन व सांकेतिकता यांमुळे तिच्यात साचलेपणा आला की, कोणत्या वा कोणत्या प्रकारे संतपरंपरेला स्पर्श करून मराठी कविता पुन्हा चैतन्य प्राप्त करून घेते. केशवसुत आणि मर्ढेकर ही मराठी कवितेची दोन्ही वळणे संतपरंपरेला कालोचित स्पर्श करूनच घेतली गेली आहेत. मर्ढेकरांच्या वळणाला जडत्व आल्यावर त्यातून तिला मोकळे करण्याचे कार्य सुर्वे यांच्या कवितेने केले. या कवितेचेही संतपरंपरेशी नाते जुळण्यासारखे आहे. सुर्वे यांनी मराठी काव्यक्षेत्रात क्रांती केली असे म्हणता आले नाही तरी, कलात्मकतेच्या नावाखाली किरट्या होत चाललेल्या मराठी कवितेला पुन्हा एकदा वास्तव जीवनाच्या खुल्या मार्गावर आणण्याचे कार्य करून मराठी कवितेला एक नवे वळण देण्याचे कार्य सुर्वे यांच्या कवितेने केले आहे. सुर्वे यांच्या कवितेचे हे श्रेय वादातीत आहे.

*('सुर्वे - नारायण सुर्वे यांच्या समग्र कविता' या पुस्तकातील काही भाग)*

❖❖❖

# सुर्वे यांच्याशी बातचीत -
## पुष्पा राजापुरे, विजय तापस, प्रदीप कर्णिक

**प्रश्न :** गेल्या तीस वर्षांतल्या तुमच्या वाङ्मयीन कारकिर्दीबद्दल तुमचं स्वतःचं मत काय आहे?

**उत्तर :** माझा पहिला कवितासंग्रह १९६२ साली प्रसिद्ध झाला. त्याला आता ३१ वर्षे झाली. त्यानंतर 'माझे विद्यापीठ', 'जाहीरनामा' आणि 'सनद' हे संकलन प्रसिद्ध झाले. अनेक पारितोषिकं मिळाली. कौतुक झालं, माझ्यावर गेल्या तीस वर्षांत पाच पुस्तकं प्रकाशित झाली. बरीवाईट समीक्षा झाली, गौरव-कुचेष्टा झाली. इतकं सगळं घडतानाही केवळ माझ्या कवितेचा म्हणता येईल, असा गौरव दोनदा झाला. मराठी कवितेच्या इतिहासामध्ये इतर कुणालाही प्राप्त न झालेलं भाग्य मला लाभलं. रूपारेल महाविद्यालयाने माझ्या कविता नाट्यांकित करून रंगमंचावर आणल्या. आय.एन.टी.ने पुढे त्याचे पाच प्रयोग केले. मराठी कविता अशा प्रकारे रंगमंचावर पूर्वी कधी आली नव्हती आणि अशीच इतिहासात नमूद व्हावी अशी गोष्ट म्हणजे चांदवड या गावी भरलेल्या शेतकरी संघटनेच्या कष्टकरी महिलांच्या मेळाव्यात ४० हजार शेतकरी स्त्रियांनी 'डोंगरी शेत माझं ग' हे माझं गाणं एका सुरात गायलं. ही गोष्ट मला माझ्या कारकिर्दीकडे बघताना मोलाची वाटते. आता काही लोकांना माझं अति कौतुक झालं असं वाटेल, किंबहुना मलाही तसंच वाटतं.

**प्रश्न :** 'माझे विद्यापीठ' या काव्यसंग्रहाची जुळवाजुळव करण्यावेळची एखादी आठवण आहे का?

**उत्तर :** १९६२ साली 'ऐसा गा मी ब्रह्म' प्रसिद्ध झाला. त्यातल्या काही कविता आचार्य अत्र्यांच्या 'मराठा'मध्ये तसंच 'नवयुग' साप्ताहिक 'युगांतर', उमाकांत ठोंबऱ्यांचं 'वीणा' वगैरे ठिकाणी आल्या होत्या. पण वाङ्मयीन नियतकालिकात माझी कविता आली नव्हती. एक 'वृत्तपत्र्या कवी' अशी माझ्यावर नंतर टीकाही झाली. मला मोठी गंमत वाटते.

◆ ***शेतकरी संघटनेच्या कष्टकरी महिलांच्या मेळाव्यात ४० हजार शेतकरी स्त्रियांनी 'डोंगरी शेत माझं ग' हे माझं गाणं एका सुरात गायलं. ही गोष्ट मला माझ्या कारकिर्दीकडे बघताना मोलाची वाटते.*** ◆

वाङ्‌मयीन नियतकालिकातच आली तर ती 'कविता' इतरत्र कुठे आली तर ती निरर्थक 'बिविता'. म्हणजे ही आपली दृष्टी. अहो, मी जे लिहायचो त्याला कविता म्हणतात काय, हेसुद्धा मला माहीत नव्हतं. मी ना पदवीधर होतो, ना कोणत्या लेखकाचा सगासोयरा होतो. पदवीचा टिळा नसलेला हा नारायण सुर्वे आता अनेक विद्यापीठात 'बोर्ड ऑफ स्टडीज'चा मेंबर आहे. काळ बदलतो म्हणतात तो असा. त्यावेळी मी परेलच्या बोगदा चाळीत राहत होतो. तेव्हा केशव मेश्राम माझे मित्र. ते त्यावेळी अनेकदा भेटायचे. त्यांनी 'माझे विद्यापीठ' आणि 'सत्य' या माझ्या दोन कविता वाचल्यानंतर, ''तुम्ही या 'सत्यकथे'कडे का पाठवत नाही?'' म्हणून विचारलं. मग मेश्राम स्वतःच त्या कविता घेऊन राम पटवर्धनांकडे गेले. त्यांनी त्या वाचल्या 'फार चांगलं ऐवज आहे' म्हणाले आणि मग हे 'माझे विद्यापीठ' सत्यकथेच्या दिवाळी अंकात आणि सत्य 'मौजे'च्या पानांवर अवतरते. या कविता तिकडे छापून आल्याचा मला फायदाच झाला. कारण 'सत्यकथे'सारख्या वाङ्‌मयीन नियतकालिकांना एक वाचक वर्ग असतो. आणि त्यामुळे उलट-सुलट टीका झडते, कवीचा हुरूप वाढतो आणि तोही अधिक सजगतेने लिहू लागतो. याच सगळ्या प्रक्रियेतून गेलो आणि ६६ साली 'माझे विद्यापीठ' प्रसिद्ध झालं.

**प्रश्न :** सत्यकथेने तुमच्या कविता प्रसिद्ध केल्या मग मौजेनेच तुमचा संग्रह का काढला नाही? कारण तसं करणं एका अर्थाने स्वाभाविक झालं असतं.

**उत्तर :** मी हा संग्रह पॉप्युलरला दिला कारण तोवर मौजेनं संग्रहाबाबत मला विचारलं नव्हतं. पॉप्युलरलाही हा जरा बरा कवी आहे असं वाटत असावं. मेश्रामनेच पॉप्युलरकडे हा विषय काढला होता. पहिल्यांदा त्याचा प्रयत्न 'नवे कवी : नव्या कविता' या त्यांच्या मालिकेत हा संग्रह निघावा असा होता. पण मग वा. ल. कुळकर्णी यांच्या सूचनेनुसार त्यांनी

◆ *पदवीचा टिळा नसलेला हा नारायण सुर्वे आता अनेक विद्यापीठात 'बोर्ड ऑफ स्टडीज'चा मेंबर आहे. काळ बदलतो म्हणतात तो असा.* ◆

स्वतंत्रपणेच हा संग्रह काढण्याचं ठरवलं. पुस्तक आलं आणि लगेच त्याला ६७-६८ सालचं प्राईजही मिळालं. या पुस्तकाची एक कॉपी जेव्हा श्री. पुं.च्या हातात गेली तेव्हा त्यांचं मला एक पत्र आलं. त्यांनी लिहिलं होतं. 'तुम्ही कसे काय आमच्या यादीतून निसटलात? कळत नाही.'

**प्रश्न :** 'ऐसा गा मी ब्रह्म' ते 'जाहीरनामा'पर्यंत तुमच्या सर्वच कवितांमध्ये मी आणि आम्ही यांना स्वतंत्र स्थान आहे. असं असताना 'आमचे विद्यापीठ' असं न म्हणता तुम्ही 'माझे विद्यापीठ' असं शीर्षक संग्रहाला का दिलंत? 'माझं' हे अधोरेखित केल्यासारखं वाटलं, यावर तुम्ही काय म्हणाल?

**उत्तर :** तुमचा प्रश्न कळला. याच्याबाबत माझी एक भूमिका आहे. मी म्हणजे कामगार कष्टकरी हाच ब्रह्म आहे, तो स्वतःच ब्रह्म आहे असं मी मानतो. जो दिवसभर काबाडकष्ट करतो. ज्याच्याकडे राहायला जागा नाही आणि जो अति-अतिसामान्य आहे आणि तरीही जो चिवटपणे सर्वांना बरोबर घेऊन जगू मागतो, त्या माणसाशी माझा घट्ट संबंध आहे. हा माणूस हेच माझ्या समोरचं विद्यापीठ आहे. विद्यमान विद्यापीठांपेक्षा हे विद्यापीठ मी माझं मानतो... आता याला कोणी आत्मश्लाघा किंवा उद्धटपणा वगैरेही म्हणावं. ज्या संवेदना मी जगलो त्याच संवेदना मी कलारूप, कवितारूप दिलं आहे. 'माझं विद्यापीठ' हे कामगार, कष्टकरी, शेतकरी, जनता, शिक्षक मध्यमवर्ग यांचं विद्यापीठ आहे. या विद्यापीठात शास्त्रज्ञ-वैज्ञानिक असे सगळे लोक येतात. हे विद्यार्थी जीवन वाचीत असतात, या सर्व परिस्थिती वाचीत असतात आणि स्वतः एक 'लेसन' होत असतात. या सर्व माणसांपासून मी कुणी वेगळा आहे, 'बाहेरून' मी त्यांच्याकडे पाहतो आहे असं कधी मानलं नाही आणि म्हणून हे 'माझे विद्यापीठ' आहे.

**प्रश्न :** तुमच्या 'माझे विद्यापीठ' मधल्या अनेक कवितांमधून नाट्यात्म संवाद आणि काही वेळा नाट्यात्म घटनाही येताना दिसतात. एखाद्या

◆ *मी म्हणजे कामगार कष्टकरी हाच ब्रह्म आहे, तो स्वतःच ब्रह्म आहे असं मी मानतो. हा माणूस हेच माझ्या समोरचं विद्यापीठ आहे.* ◆

नटाने रंगमंचावर उभं राहून स्वगत म्हणावं अशीही रचना तुमच्या कवितांमध्ये आढळते. हे कसं घडलं?

**उत्तर :** मी कामगाराच्या घरात वाढलो. कामगार म्हणून जगलो आणि कामगारांच्या चळवळीत वावरत राहिलो. हे सगळं जगताना राजकीय, आर्थिक, सामाजिक अशा अनंत स्तरांवर त्यांच्या त्यांच्या पद्धतीनं भडाभडा बोलणारी माणसं मी पाहिली, अनुभवली. त्यामुळे माझ्या मनाशी चटकन जे शब्दरूप येतं ते कथनाचं असतं, संवादाचं असतं आणि जिथे संवाद तिथे नाट्य असतं. हे ज्या ज्या प्रसंगी कवितेच्या संदर्भात मला योग्य वाटलं. फायनल वाटलं तेव्हा मी तशी तशी रचना केली. उदाहरणार्थ, तुम्ही 'पोष्टर'सारखी कविता बघा. या कवितेत पोस्टर डकवण्यापेक्षा ती मुलं आणि त्यांच्यात घडणारा संवाद मला महत्त्वाचा वाटला. त्याच्यातल्या संवादातूनच ती मुलं उभी राहतात. त्यांचं बोलणं उभं राहतं. त्याच्यातले ताणतणाव उभे राहतात. त्यांचं मन उभं राहतं आणि त्यांचं जगणं उभं राहतं. यात तुम्ही म्हणता तसा कॅरेक्टरायझेशनचा भाग येतो.

*त्या खिडकीपाशी नको रे वाकू*
*काय कु रे*
*उसकी मैना रहती है ना उधर*
*सबकी नजर लगेगी तो वांदा...*

या संवादातून एक नाजूक नाट्य, एक पात्र-दुसरं पात्र असं सगळंच उभं राहतं की हो! आणि असाच प्रकार 'बरं का रे पोरा!' यातही आपल्याला दिसतो. ते स्वगतासारखं आहे, पण त्यातून दोन पिढ्यांचा इतिहास खाचऱ्यासारख्या चाळीतील अनेक पात्रं, संघर्ष अशा सगळ्याच गोष्टी येतात. त्यांच्या जगण्यातल्या एका नाट्यात्म क्षणाचा इथं वेध घेतला आहे. माझ्या कवितांमध्ये अशी नाट्यात्मता असल्यामुळेच तरुण पोरं त्याचा प्रयोग करू शकतात.

◆ *या कवितेत पोस्टर डकवण्यापेक्षा ती मुलं आणि त्यांच्यात घडणारा संवाद मला महत्त्वाचा वाटला. त्याच्यातल्या संवादातूनच ती मुलं उभी राहतात.* ◆

**प्रश्न :** तुमच्या काही कवितामध्ये वाचकाला सहजतेनं न उलगडणाऱ्या समस्या दिसतात. उदाहरणार्थ 'बेअब्रू खूपच झाली' या कवितेत शेवटच्या ओळीतील 'त्याच्या घरासमीप माझेही घर मिळेल' असा उल्लेख आहे. आता 'त्याच्या' पद बरोबर की 'त्यांच्या'? अनुस्वार आहे की नाही?

**उत्तर :** हे चूक. तिथं 'त्याच्या' असं असलं पाहिजे. त्याच्याबरोबर असं म्हणतो. कारण एकाच समाजाचे ते आणि आम्ही दोघंही घटक आहोत. त्यांच्यातही फार मोठे अब्रूदार कुणी असतात असं नाही आणि इकडे अब्रूदारांच्या अब्रूला त्यांच्या लेखी किंमत नसते, पण या दोन्ही गोष्टी (ते आणि आम्ही) एकाच समाज नावाच्या घरात राहतो आणि म्हणूनच त्यांच्या घरा समीप माझंही घर असणं टाळता न येण्यासारखं आहे.

**प्रश्न :** तुम्ही शब्दांना 'सावध' राहायला सांगितलंय?

**उत्तर :** हो, मी चळवळवाला आहे. गेली ४५ वर्षं मी कार्यकर्ता आहे. मी जेव्हा महापालिकेत शिपाई होतो तेव्हा कम्युनिस्ट चळवळ मोठी स्ट्राँग होती. मी युनियनवाला होतोच, त्यातही लिहिणारा, तेव्हा पोलिटिकल ब्रँच माझ्यामागे असणं स्वाभाविकच होतं. मी कम्युनिस्ट आहे अशा तक्रारी माझ्या वरिष्ठांपर्यंत आजूबाजूचेच लोक सतत करायचे. पोलिटिकल ब्रँचचा त्रास इतका वाढला की, पुढे मी शिक्षक झाल्यानंतर एकदा हे पोलिटिकल ब्रँचवाले माझ्या शाळेत येऊन माझा सगळा रेकॉर्ड बघून गेले. तेव्हा मीच माझ्या शब्दांना 'सावध' राहायला सांगणं हे तर अपरिहार्यच होतं.

**प्रश्न :** 'माझे विद्यापीठ' मधील स्त्रियांच्या चित्रणात स्त्रीचा लढाऊपणा किंवा तिच्या ठायी असणारी ताकद न दिसता केवळ तिचे मातृरूप आणि पत्नीरूप तेवढंच चित्रित झालं. असं का व्हावं?

**उत्तर :** लढाऊ स्त्रीचं वेगळं असं चित्रण विद्यापीठात झालं नाही हे खरं! पण तिच्या ठिकाणी असणारी अफाट सहनशक्ती, कष्ट प्रवृत्ती, सोशिकपणा आणि परिस्थितीचं तिला असणारं अफाट आकलन या

◆ *मी शिक्षक झाल्यानंतर एकदा हे पोलिटिकल ब्रँचवाले माझ्या शाळेत येऊन माझा सगळा रेकॉर्ड बघून गेले. तेव्हा मीच माझ्या शब्दांना 'सावध' राहायला सांगणं हे तर अपरिहार्यच होतं.* ◆

पद्धतीचं चित्रण विद्यापीठातील कवितांमध्ये झालं आहे असं मला वाटतं. माझ्या कवितांविषयी, म्हणजे त्यातील स्त्रीचित्रणाविषयी असं म्हटलं जातं की, एक भोग्यवस्तू म्हणून तिच्याकडे पाहण्याची जी मराठी कविता परंपरा होती. त्याला माझ्या कवितेत ब्रेक दिला आहे. स्त्रीकडे एक भोग्य वस्तू म्हणून पाहणं हे माणुसकीला 'माणूस' असण्यालाच लज्जास्पद आहे असं मला वाटतं. सहचारीबरोबरच रथाचं चाक, मातब्बर निर्माती अशी ही स्त्री मला कधी आईच्या रूपात, बहिणीच्या रूपात, प्रेयसीच्या रूपात दिसते. माझ्यासारखंच एक 'माणूस' म्हणून मी स्त्रीकडे पाहायला शिकलो. अर्थात ही शिकवण मला माझ्या चळवळीने दिली. एक कार्यकर्ता म्हणून वावरताना स्त्रिया किती लढाऊ, धैर्यशील असतात तेही मी अनुभवलं आहे. या स्त्रीवर्गाला आपल्याकडे कुणीच समजून घेतलेलं नाही, असं मला प्रामाणिक वाटतं. माझ्या कवितेतील स्त्री पत्नीच्या, मातेच्या किंवा अगदी वेश्येच्या रूपात दिसत असली, तरी या सर्व स्त्रिया एक नीती मानणाऱ्या आहेत आणि 'माणूस' म्हणून फार मोठ्या उंचीच्या आहेत असं मला वाटतं. 'बरं का रे पोरा', 'माझी विद्यापीठ', 'सत्य', 'नेहरू गेले त्यावेळची गोष्ट', 'विचार', 'पाणी घे', 'धीर' अशा कवितांमधून येणारी माझी स्त्री इतर मराठी कवितेतील स्त्रीपेक्षा वेगळी आहे असं मला वाटतं. कदाचित तुम्हालाही ते वाटू शकतं.

**प्रश्न :** तुम्ही जेव्हा तुमची कविता लिहू लागलात तेव्हा तिच्या पूर्वीची आणि तिला समकालीन असलेली आणि अर्थात त्याही नंतरची जी कविता आहे तिच्याशी तुमच्या कवितेचं नातं तुम्हाला कसं दिसतं?

**उत्तर :** माझी कविता आणि तिच्या मागची-पुढची कविता याविषयी खरंतर मी काही सांगणं बरोबर नाही. मी जेव्हा केव्हा लिहू लागलो तेव्हा जे लिहितो त्याला कविता म्हणतात, याचंही भान किंवा स्पष्ट जाणीव मला नव्हती. मी लिहीत होतो, ज्यांना जे ऐकवत होतो 'ते' तुम्ही चांगलं लिहिता

◆ *मी जेव्हा केव्हा लिहू लागलो तेव्हा जे लिहितो त्याला कविता म्हणतात, याचंही भान किंवा स्पष्ट जाणीव मला नव्हती. माझ्या मते मानवी दुःख हे सगळ्या साहित्याचा केंद्रबिंदू असतं* ◆

असं म्हणायचे आणि त्यामुळे माझ्या लिहिण्याला वेग येत गेला. माझ्या अनेक कविता लिहून झाल्यानंतरच्या काळात मी केशवसुत, मुक्तिबोध, कुसुमाग्रज, करंदीकर, बालकवी यांची कविता वाचत होतो. बालकवींची निसर्गकविता अगदी श्रेष्ठ दर्जाचीही असेल, पण त्यातला निसर्ग मला कधी भावला नाही. माझ्यासारख्या कष्टकऱ्यांच्या आयुष्याशी बालकवींच्या निसर्गाचा सांधा जुळताना मला अनुभवाला आला नाही. माझ्या मते मानवी दुःख हे सगळ्या साहित्याचा केंद्रबिंदू असतं आणि मराठी कवितेमध्ये हे दुःख एखाददुसऱ्या केशवसुत, मर्ढेकर आणि त्याहूनही पुढे जायचं तर करंदीकर आणि कुसुमाग्रज यांच्या कवितेतच बहुधा भेटतं. या सर्वांच्या कवितेमध्ये आयुष्याविषयीचं 'थिंकिंग' तुम्हांला दिसेल. केशवसुतांची 'तुतारी', 'नवा शिपाई', 'मजुरावर उपासमारीची पाळी' अशी कविता मर्ढेकरांची 'फलाटदादा', 'गणपती वाणी', कुसुमाग्रजांचा 'क्रांतीचा जयजयकार' करंदीकरांची 'ती जनता अमर आहे.' आणि मुक्तिबोधांच्या काही कविता यातील सूर आणि माझ्या कवितेचा आंतरिक सूर जुळणारा आहे. माझी कविता एका कळपाची कविता नाही, ती मोघम बोलत नाही. ती एकेक आयुष्य घेऊन येणारी कविता आहे. माझ्या कवितेला तिची स्वतःची संवेदनशीलता आणि जाणीवशीलता आहे आणि म्हणूनच ती संवादावर विश्वास ठेवणारी कविता आहे. ज्या कवीची कविता पुनः पुन्हा तपासावीशी वाटते, तो माझ्या दृष्टीने मोठा कवी असतो. माझी कविता या मार्गावर जाईल का? याबद्दल मी काही बोलणं गैरलागू ठरेल. लेखकानं इतरांशी नाही, पण स्वतःशी स्वच्छ आणि स्पष्ट नसेल तर त्याच्या लेखनात हा स्वच्छपणा येणार नाही. अशा स्वतःशी अस्पष्ट असणाऱ्या कवींच्या कवितासंबंधी कशा चर्चा होतात हे आपल्याला माहिती आहे. कवितेला जेव्हा भूमिका नसते तेव्हा त्या कवितेविषयीची चर्चा 'अमुक कवितेत किती नवे शब्द आलेत, किती

◆ *शब्दाचं उद्दिष्ट आणि त्याचा धर्म 'कम्युनिकेशन' हाच आहे. 'कम्युनिकेट' करण्यासाठी कवीनं, लेखकानं मुळात स्पष्ट आणि स्वच्छ असलं पाहिजे ते यासाठी.* ◆

नव्या शिव्या आल्यात' या वळणानेच मग जाऊ लागते आणि एकूण कवितेच्या विचारात या विचारांना महत्त्वही नसते. संवेदनाच्या पातळीवर आणि अभिव्यक्तीच्या पातळीवर तुम्ही जेव्हा 'शब्द' या माध्यमाला घेता तेव्हा त्याला अनेक पातळ्यांवर कवी वाकवू शकतो. असं मला वाटतं. शब्दाचं उद्दिष्ट आणि त्याचा धर्म 'कम्युनिकेशन' हाच आहे. 'कम्युनिकेट' करण्यासाठी कवीनं, लेखकानं मुळात स्पष्ट आणि स्वच्छ असलं पाहिजे ते यासाठी.

**प्रश्न :** तुम्ही म्हणता तशी तुमची भूमिका तुमच्या अनेक कवितांतून अनुभवाला येते, मग तरीही 'ऐसा गा मी ब्रह्म'मधल्या 'चार शब्द' या कवितेविषयी जो वाद झाला तो का?

**उत्तर :** मुळातच 'ऐसा गा मी ब्रह्म' या शीर्षकावरच तिखट प्रतिक्रिया उमटली. 'चार शब्द' मध्ये तर 'सारस्वतांनो! एक गुन्हा करणार आहे' अशीच मी सुरुवात केली आहे. एका नवागत कवीने हा उच्चार केल्याबरोबर 'हा बोलणारा कोण?' असं म्हणत सगळ्या नजरा टवकारल्या गेल्या माझ्यावर... 'मी एकटाच आलो नाही युगाची ही साथ आहे.' ही माझी भूमिका होती. आजही आहे. हा माझा आत्मविश्वास मूर्खपणाचा असेल. पण तो आहे. 'एकटाच आलो नाही, युगाचीही साथ आहे, सावध असा तुफानाची हीच सुरुवात आहे, कामगार आहे मी तळपती तलवार आहे.' असं म्हटल्याबरोबर कुणाला ते आगाऊपणाचं वाटलं. काही जणांना त्यात आत्मश्लाघा दिसली. त्यांना जे वाटलं, ते त्यांना दिसलं, त्याला मी काय करू? मी तर पुढे जाऊन म्हणत होतो माझे जग राजमुद्रा घडवत आहे. हा राजमुद्रा घडवण्याचा उपचार आणि खड्‌गाची भाषा हा सारस्वतांच्या दृष्टीने तेव्हा उद्धटपणा ठरला. पण माझ्या मते हा उद्‌गार कोटी कोटी देशवासीयांचाच होता. हे भान घेऊन तुम्ही त्या कवितेकडे पाहिलं नाहीत आणि 'इन-जनरल' बोलत राहिलात तर अवघड आहे. या कवितेला क्रांतीची, परिवर्तनाची आणि बदलाची

*एखादा कवी जेव्हा आपण तपासतो तेव्हा त्यांची कविता केवळ शैलीच्या काट्यावर तपासायची की, ज्या संवेदनातून ती कविता घडली त्या पातळीवरून तपासायची? ज्याला शैली म्हणतात ना, ती शैलीसुद्धा समाजांतर्गतच व्यक्त होणारी गोष्ट आहे.*

अपेक्षा आहे आणि या अपेक्षेला देशपरिस्थितीचा भक्कम आधार आहे.

**प्रश्न :** चिं. त्र्यं. खानोलकरांनी तुमच्या कवितेला 'अनुभव इथला नाही आणि कवीसुद्धा या देशाचा आहे किंवा नाही असा प्रश्न पडतो, सुर्वेंची कविता ही एक स्वप्नरंजनात्मक कविता आहे' असे आक्षेप घेतले आहेत. याबद्दल तुमची आजची प्रतिक्रिया काय?

**उत्तर :** उत्तर काय द्यायचं? माझी कविता समोर आहे आणि ती स्वतःच उत्तर आहे. मुख्य प्रश्न असा की, तुम्ही कवितेकडे कसं पाहता? पूर्वग्रहदूषित आणि डागाळलेली भूमिका घेऊन जर तुम्ही कवितेकडे पाहू लागलात तर चर्चा होणं अशक्य आहे. त्या लेखातील आरती प्रभूंची दृष्टी ही पूर्वग्रहदूषित आहे. त्यांच्या जीवनात काय घडलं हा त्यांचा प्रश्न. माझ्या जीवनात काय घडलं हा माझा. मी जर माझ्या आयुष्याला, अनुभवाला कलेचं रूप दिलं असेल, तर ते कला म्हणून किंवा कविता म्हणून पुढे येईल. दुसरी गोष्ट अशी की, माझी मार्क्सवादी भूमिका आणि मार्क्स, लेनिनवरील प्रेम जाहीर केल्यामुळे लोक बिथरले, बुजले, इथला लेखकांचा जो मध्यम वर्ग आहे त्यांच्या डोक्यामध्ये मार्क्सवादाविषयी किंवा साम्यवादाविषयी उथळ कल्पनाच आहेत. मार्क्सवादी हे परक्या देशातले त्यांना राष्ट्रनिष्ठा वगैरे नसते. अशी या वर्गाची पक्की समजूत. तेव्हा अशा कल्पनेतून आलेल्या आक्षेपांविषयी काय बोलावे?

**प्रश्न :** तुमची कविता शैलीने पोखरलेली आविष्कारी कविता आहे असं दिलीप चित्रे म्हणतात या आक्षेपाला तुमचं काय उत्तर आहे?

**उत्तर :** दिलीप चित्र्यांचा कवितेकडे पाहण्याचा जो दृष्टिकोन आहे, त्यातून त्याचं विधान आलेलं आहे. एखादा कवी जेव्हा आपण तपासतो तेव्हा त्यांची कविता केवळ शैलीच्या काट्यावर तपासायची की, ज्या संवेदनातून ती कविता घडली त्या पातळीवरून तपासायची? ज्याला

◆ *हे शहर घडल्यानंतर येथे जो औद्योगिक कामगार जन्माला आला, तो त्यात दिसत नाही. हा कामगार माझ्या कवितेत प्रमुख आहे.* ◆

शैली म्हणतात ना, ती शैलीसुद्धा समाजांतर्गतच व्यक्त होणारी गोष्ट आहे. कारण समाज आहे म्हणून भाषा आहे. भाषा आहे म्हणून त्यातून अभिव्यक्ती करणाऱ्या ज्या निरनिराळ्या शैली आहेत तीसुद्धा समाजाचीच एक अभिव्यक्ती आहे. ते त्यांच्या पद्धतीने अभिव्यक्ती घडवतात. माझ्या पद्धतीने त्यामुळे मी पोखरला गेलेलो आहे की नाही हे कोणी ठरवायचे? अश्व की घोडा असाही यांचा आक्षेप आहे. त्यात त्यांचं म्हणणं मला असं दिसतं की, नारायण सुर्वे हा एक न शिकलेला माणूस आहे. त्याला 'अश्व' शब्द वापरण्याचं कारण काय? आता मी माझ्या नव्या पुस्तकात म्हटलं आहे की, 'अश्व' हा शब्द वापरण्याची पॉवर फक्त तुम्हाला आहे काय? मी यालाच पूर्वग्रहदूषित दृष्टी म्हणतो. चित्र्यांनी 'सत्यकथेत' 'ऐसा गा मी ब्रह्म' वर परीक्षण लिहिलं तेव्हा माझी एकच कविता त्यांना बरी वाटली. माझ्यावर लिहिण्याचं निमित्त करून त्यांनी कुसुमाग्रज, बापट, पाडगावकर सगळ्यांचा समाचार घेतला आहे. चित्र्यांचा हा 'रोल' अजूनही चालू आहे. चालू दे. कुसुमाग्रजही जगतात, मीही जगतोय. सगळं चाललं आहे.

**प्रश्न :** 'मुंबई' ही तुमची एक बहुचर्चित आणि लोकांकडून वाखाणली गेलेली कविता आहे. या महानगराची संवेदनशीलता तुम्ही त्या कवितेमध्ये कशी आणली?

**उत्तर :** तुम्ही शाहीर परशुराम आणि पठ्ठे बापूराव यांच्या मुंबईचा उल्लेख केलात. पण या दोघांनीही मुंबईचं केवळ वर्णनच केलेलं आहे. अण्णा भाऊ साठेंनीही मुंबईचं वर्णनच केलं, पण अधिक बांधीव पद्धतीनं. अण्णा भाऊंची मुंबई मजुरांच्या वस्तीकडे येते आणि तिथं कुठंतरी नव्या क्रांतीचा विचार अण्णा भाऊ करताना दिसतात. माझी 'मुंबई' या सगळ्यांपेक्षा वेगळी आहे. हा तिचा वेगळेपणा मीच सांगणं योग्य नाही, हे मला पटतं. पण तिचा वेगळेपणा असा की, ही मुंबई मुंबईत राहणाऱ्या एका माणसाची आहे. तिच्यात एका चरित्राच्या 'शेड्स' आहेत. ती त्यांना

*मी स्वतः कविता आणि फिलॉसॉफी जरा जास्त वाचतो. तत्त्वज्ञान, इतिहास, कविता आणि समीक्षा हे माझे वाचनाचे आवडते विषय आहेत. मिळेल त्या भाषेतल्या पुस्तकातून जग जाणावं, जग आणि आपण यांत लिंक्स जोडाव्यात, असं मला वाटतं.*

एखाद्या कवितेसारखी मानली आहे. ही कविता घडवणारा त्याचा बाप आणि तोच आहे. या मुंबईच्या चरित्राची मांडणी करताना 'तू' आणि 'मी' एकमेकांवरचे संस्कार, एकमेकांची जडणघडण असं सगळं येतं. पट्ठे बापुरावांच्याही पूर्वी ज्यांनी मुंबईवर लिहिलेलं आहे, त्या सगळ्या गोष्टी माझ्याकडे आहेत. पण हे शहर घडल्यानंतर येथे जो औद्योगिक कामगार जन्माला आला, तो त्यात दिसत नाही. हा कामगार माझ्या कवितेत प्रमुख आहे. 'मुंबई' या माझ्या कवितेत आशय भाषिक अंग आणि सर्व तपशील (औद्योगिक जीवनाचे सर्व तपशील) याचा एकजीवपणा दिसेल. 'माझे विद्यापीठ' आणि 'मुंबई' अशा कवितांसारखीच कविता मी पुन्हा लिहीन असं वाटत नाही. ही कविता जशी सुचली तशी मी मांडली अनेकांच्या मते त्यात 'मीटर' चुकलेला असला तरीही तिला एक लयीचा भार आहे. काही जणांच्या मते ही लय कशी आहे? तर समुद्राच्या तळाशी जो लाटांचा निरंतर प्रवाह चालू असतो तशी ही लय आहे. ही कविता जेव्हा प्रथम 'मराठा'त छापून आली तेव्हा विजय तेंडुलकरांचं मला लगेच पत्र आलं. त्यांनी म्हटलं होतं, ''नारायणा, काय सुंदर लिहिलं आहेस तू!'' 'मराठा'ने ही कविता पानभर छापली. पण दखल कोण घेतो? कारण आम्ही पडलो वर्तमानपत्रे कवी.

**प्रश्न :** तुमच्या कवितांमधून लेनिन, मार्क्स यांचे उल्लेख येतात, त्यांच्या विचारांचा प्रभावही दिसतो पण 'असेल-नसेल' सारख्या कवितेत ज्यॉँ पॉल सार्त्र यांचाही उल्लेख येतो तो कसा?

**उत्तर :** सार्त्र हा एक फार मोठा फिलॉसॉफर आहे आणि त्याच्या सबंध लेखाचा गाभा सर्वसामान्य माणसाचं अस्तित्व, त्या माणसाभोवतीची जडणघडण हा आहे. अर्थात हे मला कळलं ते हिंदीमध्ये त्याच्याविषयी जे लिहिलं गेलं ते वाचून, मला इंग्रजी येत नाही. अर्थात त्यामुळे माझं काही

*◆ डांगे हे आमचे आदर्श आणि या आदर्शाचा माझ्यावर मोठा प्रभाव. त्या काळात गिरणी कामगारांमध्ये ज्या चर्चा चालत त्याचा केंद्रबिंदू डांगे हा असे. ◆*

फारसं नुकसान झालं असं नाही. कारण तुमची जर शिकण्याची इच्छा असेल तर तुम्ही अनेक माध्यमातून, चर्चेतून, निरनिराळ्या प्रकारातील आणि भाषेतील पुस्तकं वाचून आपलं ज्ञान वाढवू शकता. पण नुसती पुस्तकं वाचून ज्ञान वाढतं असा माझा समज नाही. अनुभवाची जोड ज्ञानाला आवश्यक आहे, असं माझं मत आहे. मी स्वतः कविता आणि फिलॉसॉफी जरा जास्त वाचतो. तत्त्वज्ञान, इतिहास, कविता आणि समीक्षा हे माझे वाचनाचे आवडते विषय आहेत. मिळेल त्या भाषेतल्या पुस्तकातून जग जाणावं, जग आणि आपण यांत लिंक्स जोडाव्यात, असं मला वाटतं. तर सार्त्रबद्दल कुठे वाचताना नगण्य माणसांबद्दल त्याला असलेलं प्रेम मला जाणवलं 'असेल-नसेल' मध्ये वेश्यांची वस्ती येते. वेश्यावस्तीवरच माझ्या पाच-सहा कविता आहेत. अपवाद वगळता इतक्या कविता मराठीत तरी कुणाच्या नाहीत. मर्ढेकर कांदेवाडीला टांग मारून पुढे गेले, ग. दि. माडगूळकर वगैरेचा 'जोगिया' म्हणजे मध्यमवर्गीय 'आऊटलुक' आहे. या सर्वांनी वेश्यावस्ती रोमँटिक प्रवृत्तीने आणि बाहेरून पाहिलेली आहे. मी शाळेत शिपाई होतो तेव्हा शेजारीच कामाठीपुऱ्याच्या वस्ती होत्या, तेव्हा ते सगळं मी जवळून पाहिलंय आणि या जगाविषयी आपण सार्त्रशी बोललं पाहिजे असं मला वाटलं.

**प्रश्न :** कॉ. डांगेंच्या चळवळीशी आणि प्रत्यक्ष डांग्यांशी तुमचा कितपत संबंध होता?

**उत्तर :** या दोन्ही गोष्टींशी माझा खोलवरचा आणि दीर्घ संबंध होता. डांग्यांवर माझी एक दीर्घ कविता आहे आणि इतरही दोनचार कवितांमध्ये त्यांचा उल्लेख आहे. या कविता अद्यापि कोणत्याही संग्रहात आलेल्या नाहीत. डांगे हे आमचे आदर्श आणि या आदर्शाचा माझ्यावर मोठा प्रभाव. त्या काळात गिरणी कामगारांमध्ये ज्या चर्चा चालत त्याचा केंद्रबिंदू डांगे हा असे. म. गांधी आणि डांगे या दोघांना मी एका पातळीवर बघायचो. हे मी कुठे तरी म्हटलं आणि त्याचे परिणामही मला भोगायला लागले.

◆ *कवी म्हणून माझी भूमिका व्यापकच आहे. माझ्या कवितेत शिगवाला येतो, पोर्टर येतो...* ◆

डांगे माझी कविता वाचायचे. ते मला महाकवी म्हणत. एकदा ते मला म्हणाले, ''तुझा जो मुक्तछंद आहे तो मला समजावून सांग.'' त्यांचा आणि माझा मोठा वादविवाद झाला. त्यांचं संस्कृतापासून जगभराच्या साहित्याचं वाचन अफाट. मी माझ्या परीनं मुक्तछंद म्हणजे काय हे त्यांना पटवून द्यायचा प्रयत्न केला, पण हरलो. मी माझं अज्ञान जाहीर करून टाकलं. त्या वादविवादात डांग्यांनी इतकी भराभर उदाहरणं माझ्यासमोर ठेवली की, मला पुढे काही बोलता येईना. त्याचं म्हणणं गेयतेमध्ये लिहिलं की कविता पॉप्युलर होते. माझं म्हणणं होतं की गेयतेमध्ये न लिहिताही सच्ची कविता पॉप्युलर होते. पण वैचारिक झटापटीत त्या विद्वान म्हाताऱ्याने माझा पार पराभव केला. ग्रेट माणूस!

**प्रश्न :** तुमच्या निवेदन शैलीवर मॅक्झिम गॉर्कीच्या निवेदन शैलीचा प्रभाव आहे असं मांडण्यात आलंय...

**उत्तर :** हा प्रभाव आहे की नाही मला माहीत नाही. कित्येक जण असं म्हणतात तेव्हा तो असेलही. मलाही तो चालेल, कारण हा माझा सगळ्यात आवडता लेखक. त्याचं विद्यापीठ वेगळं, माझं वेगळं. पण आमच्या 'लिंक्स' सारख्या आहेत. तो त्याच्या काळात जसं बोलला, मीही तसंच बोलतो. त्यामुळे माझं काहीही बिघडत नाही. त्याची 'आई' ही कादंबरी वाचूनही मी चळवळीकडे आलो. या एका मोठ्या साहित्यकाराशी माझं नातं कुणी जुळवत असेल, तर आनंदच आहे.

**प्रश्न :** तुम्ही श्रमजीवी वर्गाविषयी जितक्या आत्मीयतेनं बोलता तितक्या आत्मीयतेनं तर नाहीच किंबहुना तुसडेपणानं इतर जगाविषयी बोलता असा आरोप चिं. त्र्यं. खानोलकरांनी तुमच्यावर घेतला होता.

**उत्तर :** जो माणूस या जगात नाही त्याच्याविषयी आज बोलणं चुकीचं आहे. पण हा आक्षेप मागे म्हटल्याप्रमाणेच त्यांच्या डागाळलेल्या दृष्टिकोनातून आलेला आहे. कवी म्हणून माझी भूमिका व्यापकच आहे. माझ्या कवितेत शिगवाला येतो, पोर्टर येतो...

**प्रश्न :** हो पण पांढरपेशा मध्यमवर्ग जो आहे...

*शिक्षणाचा प्रसार झाला आणि आपलं आयुष्य साहित्यात शोधणारा नवा वाचक संख्येने वाढत गेला. पण आपले साहित्यिक 'स्वान्त सुखाय' वृत्तीने राहणारे.*

**उत्तर :** त्याच्यावर तुम्ही लिहिताय ना? लिहा. ज्या वर्गाची मला माहिती नाही त्याबद्दल मी कसं लिहावं? बरं या मध्यमवर्गाविषयी मी तुसडेपणानं बोलतो हा आक्षेप तर सर्वस्वी चुकीचा आहे. या मध्यमवर्गाविषयी आमच्या कम्युनिस्ट मंडळींचाही चमत्कारिक दृष्टिकोन आहे. 'मिडल क्लास' म्हणून या वर्गाची हेटाळणी करणं त्यांना आवडत असलं तरी ते मूर्खपणाचं आहे असं माझे मत आहे हे मागंही सांगितलं आहे आणि आत्ताही सांगतो. अगदी असंच्या असं छापून टाका. तुम्ही इतिहासाचा क्रम लक्षात घेणार की नाही? मार्क्स, लेनिन, माओ हे कोण होते हो? ही शहाणीसुरती विद्वान मध्यमवर्गीयच माणसं होती. त्यांना समाजातलं विषमतेतून निर्माण झालेलं दुःख दिसलं आणि त्याविरुद्ध त्यांनी चळवळ उभारली आणि एक मोठी फिलॉसॉफी तयार करून दिली. महाराष्ट्राकडे बघा एक फुले सोडले तर आगरकर, टिळक, लोकहितवादी, न्या. रानडे आणि मग अगदी कम्युनिस्टांचे आदर्श डांगे हे कोण होते? हे सर्व मध्यमवर्गीय होते. ते त्यांच्या वर्गीय जाणिवेच्या पुढे होते. शिकलेला, वाचलेला आणि काहीतरी करावं असं वाटणारा हा शिक्षितांचा वर्ग होता. या मंडळींनी जे जे केलं ते त्यांच्या काळात करणं गरजेचंच होतं. यांना मध्यमवर्गीय म्हणून हेटाळत राहणं हे सर्वस्वी गैर आहे. अहो, हा शिक्षित वर्ग होता. किंबहुना माझं तर असं मत आहे की, महाराष्ट्रामध्ये मध्यमवर्गानं जे लेखन केले ते बरोबर आहे. कारण त्या काळात हाच वर्ग लिहीत होता, तोच शिकत होता आणि तोच शिकवीत होता आणि तो वाचतही होता. या लिहिणाऱ्या वर्गाचं पुढे चुकत गेलं, त्यामुळे मोठे नुकसान झालं. काय नुकसान झालं? वाचक म्हणून साहित्याकडे येणारा नवा वर्ग त्यांच्या लक्षातच आला नाही. शिक्षणाचा प्रसार झाला आणि आपलं आयुष्य साहित्यात शोधणारा नवा वाचक संख्येने वाढत गेला. पण आपले साहित्यिक 'स्वान्त सुखाय' वृत्तीने राहणारे. आम्ही लिहितो

*''भरल्या पोटाने अगा पाहतो जर चंद्र*
*आम्ही ही कुणाची याद केली असती''*

तेच साहित्य असं मानणारे आणि तेच साहित्याचे मानदंड आहेत असंही म्हणणारे... बरं यांनी जे मानदंड स्वीकारले ते खोटे आहेत. कसे? तर, ते त्याला इंग्रजीचा आधार घेणार, संस्कृतचा आधार घेणार. याचं स्वतःचं निरीक्षण असं काहीच नाही. असे हे यांचे मानदंड आहेत. त्याचीच आवृत्ती आता चित्रे, नेमाडेंमध्ये आलेली आहे. अशी ही एक लिंक आहे. ही मानसिकता, एकदा जरा तपासून घ्या. याला तुसडेपणा असं म्हणणं चुकीचं आहे. ही तर रियल फॅक्ट आहे. केशवसुत, बालकवी, मर्ढेकर कोणत्या वर्गाचे आणि जातीचे होते हे आम्ही कधी लक्षात घेतलं नाही. या माणसांनी काय दिलं, त्यांची कलाकृती कशी आहे. त्यातून साकारणारे विचार कोणते हे महत्त्वाचं आहे. बाबासाहेबांनी जो विचार केला, आयुष्यभर ते जे झगडले ते महत्त्वाचं आहे आणि महाराष्ट्राला अशा प्रबोधनाची परंपरा आहे.

खरं म्हणजे महाराष्ट्रातला पूर्वीचा सगळा लेखन करणारा मध्यमवर्ग आहे तो अतिशय कनिष्ठ मध्यमवर्ग आहे. हा श्रीमंत वर्ग नाही. त्याच्या उलट तुम्ही बंगालकडे गेलात, पंजाबकडे गेलात किंवा हिंदी भाषिक जगात गेलात तर तुम्हाला त्यांचे लेखक रयीस मध्यमवर्गातून आलेले दिसतील. उर्दूतले साहित्यकार, जमीनदार वर्गातून आलेले आहेत. टागोर, बंकिमबाबू, सरदार जाफरी, अमृता प्रीतम, साहिर लुधियानवी हे कोण आहेत? कुठून आले हे? एक प्रेमचंद सोडले तर, बाकीचे सगळे उच्च मध्यमवर्गातून आलेले आहेत. आणि ते गैर नाही. त्यांच्या संवेदनशीलतेला महत्त्व आहे, त्यांच्या विचारांना महत्त्व आहे. मी हा विचार महत्त्वाचा मानतो. हे लक्षात घ्या. ज्यांनी आक्षेप घेतले. त्यांचं काय करायचं? त्यांचे आक्षेप नव्या समीक्षकांनी खोडायला पाहिजेत. 'गाणे' या कवितेत 'मी' म्हटलं आहे,

*''भरल्या पोटाने अगा पाहतो जर चंद्र*
*आम्ही ही कुणाची याद केली असती''*

एवढ्या एका ओळीवरून खानोलकर म्हणाले, ''ज्याचं पोट भरलेलं

◆ *आपल्या मराठी कवितेचा जीवनाकडे पाहण्याचा जो दृष्टिकोण आहे तो साचेबंद आहे. ही कविता जीवनाचा अनुवाद करण्यातच रमते.* ◆

आहे, त्यांना हा हिणवतो'' हे काहीतरी 'वडाची साल पिंपळाला लावल्यासारखे' किंवा 'सुतावरून स्वर्ग गाठल्यासारखं' आहे. आता मी त्याला काय करू बाबा? पण शेवटी ही फॅक्ट उरतेच की कोणाची भरली आहेत पोटं? तर मध्यमवर्गाची आणि श्रीमंतवर्गाची.

**प्रश्न :** 'माझे विद्यापीठ' ही तुमची दीर्घ कविता ह्या संग्रहात समाविष्ट करण्यात आलेली आहे. तेच या संग्रहाचं शीर्षक आहे. आज इतक्या वर्षांनंतर तुम्हांला या कवितेतल्या अनुभवविश्वाविषयी काय वाटतं?

**उत्तर :** माझी ही कविता हे एक प्रकारचं आत्मनिवेदन आहे. 'मुंबई' ह्या कवितेला जी एक चरित्रात्मक बाजू आहे तशीच ह्या कवितेलादेखील चरित्रात्मक बाजू आहे. या कवितेत 'ऐसा गा मी ब्रह्म'पेक्षाही मी अधिक वेगळ्या प्रकारच्या थिंकिंगकडे वळलो आहे. मी स्वतः माझ्या अवतीभवतीचं जग आणि एकूण वास्तव याविषयीचा एक आऊटलूक या कवितेत आहे. 'वाढले म्हणतात पृथ्वीचे वय, संस्कृतीचेही; छान झाले आम्हीही वाढतो आहोत नकाशावर, अशी माझी प्रतिक्रिया मी इथं नोंदवतो आहे.' ह्या कवितेचा बाज माझ्या समजुतीप्रमाणे मराठी कवितेमध्ये वेगळा आहे, त्याला एक अंगभूत वळण आहे. या कवितेत नव्या प्रतिमा, नवेच शब्द येतात. 'खूप सोयरीक करतो मी त्यांच्याशी, वाटलं तेही आपल्या सारखेच बाटगे निघाले,' आता ह्या ओळींमध्येच माझं संबंध थिंकिंग आहे, हे थिंकिंग साकारण्यासाठी मला शब्द हवे होते ते एखाद्या नर्ससारखे किंवा जग घडवणाऱ्या कामगारांसारखे आणि तसा प्रयत्न मी या कवितेत केल्यामुळे या कवितेला, त्यातल्या इमेजरीला एकात्मता लाभली आहे, असं मला वाटतं. माझ्या कवितेत येणाऱ्या अनेक शब्दांबद्दल हे शब्द मलाच कसे सुचतात याचबद्दल मला अनेकदा विचारलं जातं, 'आता ते सुचतात बाबा...' एवढंच आपण म्हणू शकतो. आता 'हल्लक' ही अवस्था अगदी भयानक असते. त्या अवस्थेत आपण जवळपास काहीच नसतो. असाच दुसरा शब्द 'बाटगे'. हा शब्द आला

कसा? आपण जगतो एक आणि ग्रंथात येतं दुसरंच. हे ग्रंथ आपलं जगणं त्यांच्या पद्धतीनं कन्व्हर्ट करून घेतात; म्हणूनच हे ग्रंथ मला बाटगे वाटतात. हा शब्द अनेकांना खटकतो. पण ती तर फॅक्ट आहे. आपल्या मराठी कवितेचा जीवनाकडे पाहण्याचा जो दृष्टिकोण आहे तो साचेबंद आहे. ही कविता जीवनाचा अनुवाद करण्यातच रमते.

**प्रश्न :** तुमच्या कवितांमधून कधी प्रथम पुरुषी निवेदन येतं तर कधी तृतीयपुरुषी निवेदन येतं. तर कधी एकाच कवितेत ह्या दोन्ही पद्धतींच्या निवेदनाची सरमिसळ झालेली आढळते?

**उत्तर :** याचं कारण असं आहे की 'मी' आणि 'समाज' ह्या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत, असं मी मानत नाही. कधी निवेदनात ह्या दोन वेगवेगळ्या भासल्या तरी खरं तर मला त्यांना एकत्र बांधायचं असतं. निवेदनाच्या ओघात कधी हा निवेदकच स्वतःला 'नारायण' अशी हाक घालतो. त्यात मला काही गैर वाटत नाही. एक 'मी' दुसरा 'मी' असे मिळूनच 'आम्ही' होतो. 'आम्ही' मध्येच 'मी' असतो आणि हीच तर माझी भूमिका आहे.

**प्रश्न :** तुमच्या एका कवितेचं शीर्षक 'एक आम्ही असे निघालो' असं आहे, ह्या कवितेच्या शेवटच्या ओळीत येणाऱ्या 'आम्हीच' या शब्दातील 'च'मुळे मोठा वाद झाला. ह्या वादाच्या संदर्भात तुम्ही कधी काही स्टेटमेंट केलं नाही, ते का?

**उत्तर :** आत स्टेटमेंट काय करायचं बुवा? 'आम्हीच' ह्या म्हणण्यामध्ये माझी एक भूमिका आहे...

**प्रश्न :** पण कवितेच्या शीर्षकात हा 'च' तुम्ही वापरलेला नाही असं का?

**उत्तर :** तो माझा दोष आहे. हा 'च' तिथं निश्चितच यायला हवा होता...

**प्रश्न :** कदाचित असं झालंय का की, तो 'च' शेवटी येण्यातच एक अपरिहार्यता आहे. त्या कवितेतल्या निवेदकाने सुरुवातीला 'तो' कसा वेगळा आहे हे सांगितलं आहे. दर वळणावर त्याने कसे नवीन मुक्काम केले ते तिथं येतं. दुसऱ्या कडव्यात घरदार सोडून जाण्याची वेळ आली तेव्हा कसल्याही पाशात तो अडकून राहिला नाही. असं म्हटलेलं आहे.

◆ *माणूस जेव्हा खाणीत उतरतो ना तेव्हा त्याच्या डोक्यावर छत्र असतं, पण ते हरवलेलं असतं, ते केव्हा खाली पडून त्यात तो गाडला जाईल हे त्यालाही सांगता येत नाही.* ◆

मात्र स्वतःला शोधण्याच्या त्याच्या क्रियेत 'अडखळणं' आहे. तिसऱ्या कडव्यात तर आपण नेहमीच स्वतःला शोधू शकतो. असं होत नाही असा कबुली जवाबही तो देतो. आता ह्या संपूर्ण निवेदनात एक चढता क्रम आलेला आहे आणि स्वतःविषयी सांगत असतानाच तो मग शेवटी 'च' ची अपेक्षा पूर्ण करतो आणि म्हणूनच तो 'च' तिथं येतो. तो तिथंच अपरिहार्य ठरतो. त्या 'च'वर लोकांनी इतका का वाद घातला असा प्रश्न पडतो.

**उत्तर :** त्याला हो आपण काय करणार? कोण कशावर वाद घालील काही सांगता येत नाही. माझ्या बाबतीत तरी माझा असा अनुभव आहे, की कोणी कशावरही वाद घालतो मराठीत!

**प्रश्न :** तुमच्या विचार कवितेमध्ये 'विचार' हीच एक प्रतिमा बनून येते आणि ही प्रतिमा कामगार जगताशी घट्टपणे बांधली गेलेली आहे असं वाटतं?

**उत्तर :** या कवितेतील इमेजरी नवीनच आहे. या कवितेत विचारांची एक मालिका आहे आणि त्या मालिकेमध्ये विचार करून करून थकलेलं असं एक जग आहे. ते जग मला 'तिसऱ्या पाळीच्या कामगारांसारखं' रस्ता खोदता खोदता घामानं चिंब भिजून सावलीत बसल्यासारखं मला दिसतं. मला एका गोष्टीचं आश्चर्य वाटतं की, 'कविता आणि प्रतिमा' लिहिणाऱ्या सुधीर रसाळांना ह्या इमेजेस कशा दिसल्या नाहीत? त्या पुस्तकात आजच्या वास्तवातलं कुठेही काहीही नाही असं झालं याला कारण डागाळलेला दृष्टिकोन! रिॲलिटी एका बाजूला आणि ही मिडल क्लास थिंकिंगची प्रोसेस एका बाजूला. माझ्या कवितेत जेव्हा थर्ड पर्सन एकदम येऊन बोलतो, शब्द मांडतो, तेव्हा ती इमेजरी असते. रसाळसारख्यांना ही मात्र 'इमेजरी' वाटत नाही. हे ज्याला इमेजरी म्हणतील ती इमेजरी, काय म्हणून? ह्या सबंध कवितेत मी 'विचार'वर

बोलतोय. ते कसे वागतात ते दाखवतोय. आता माझ्यासारख्या फाटक्या माणसानं थिंकिंगवर बोलणं बरं नाही, कारण आम्हांला 'थिंकिंगचं जग' नाही असं समजतात हे लोक! म्हणजे थोडक्यात बोलायचं तर थिंकिंग हा मध्यमवर्गाचा किंवा बुद्धिवंतांचाच विषय आहे. अशी यांची कल्पना! मी सेन्चुरी मिलमध्ये वाइंडिंग खात्यात कामाला होतो. पहाटे चार वाजता सुटायचो. वरळीपासून येताना माहीमला चालत जी 'झोप' डोळ्यावर यायची ती अनुभवायलाच हवी. ही कविता आज मी वाचतो तेव्हा अजूनही हादरून जातो. या कवितेतील प्रत्येक कडव्यातील शेवटच्या तीन ओळी मला महत्त्वाच्या वाटतात. ज्यांना कामगारांचं लाइफ माहीत नाही त्यांना सगळे प्रश्नच पडतील. आता त्यातला कोलारच्या खाणीचा संदर्भ तर नॅशनल रेफरन्स आहे. शेवटी संवेदना म्हणजे काय हो? तुम्हाला माहीत नसेल तर मी सांगतो. आता इलेक्ट्रॉनिक्स गोष्टी आल्यात. पण पन्नास वर्षांपूर्वी जेव्हा कामगार ह्या कोलारच्या खाणीत उतरायचे तेव्हा ते खांद्यावर साळुंकी घेऊन जात असत. साळुंकी हा अतिशय संवेदनशील पक्षी आहे. जोवर ह्या साळुंकीचा आवाज होत नसे तोवर आपण निर्धोक आहोत असं कामगार समजत. पण ती जेव्हा गडबडायला लागे, चित्कारायला लागे, तेव्हा कामगार धोक्याची सूचना जाणून लगेच थांबत असे म्हणजे या कामगाराचा आधार ती साळुंकी असे आणि इतिहासामध्ये याची नोंदही आहे. मी ज्याला संवेदना म्हणतो ती संवेदना त्या साळुंकीसारखी असायला पाहिजे. आपल्याकडच्या किती समीक्षकांना हे माहीत आहे हो! मघाशी तुम्ही अनिलांच्या कवितेचा उल्लेख केलात. आता अनिलांच्या 'शांतता स्वतःच निवारा शोधत थकून आलेली असते' यात आणि माझ्या तिसऱ्या पाळीचे लोक थकून येणं यात फार मोठा फरक आहे. अगदी जीवन-संदर्भातलाच फरक आहे. आता हा फरक लक्षात न घेता जे समीक्षा करतात त्यांनी कसलाच विचार केलेला नसतो. याच्याच बरोबरीने तुम्ही सांगितलेली ती स्त्री-रूपं तर या कवितेत आहेतच. हा निवेदक स्ट्रगलमध्ये गुंतलेला आहे. एक माणूस आहे. या लढाईत त्याला सावरणारं दुसरं कुणी नसेल ती एकटी असेल. ह्या 'छत्ररूपी'ला आणखी एक वेगळा अर्थ आहे तो असा की, माणूस जेव्हा खाणीत उतरतो ना तेव्हा त्याच्या डोक्यावर छत्र असतं,

*चळवळीचा क्रमही पिढ्यान् पिढ्यातून पुढे सरकतो ◆ आहे. या पिढ्यान् पिढ्यांच्या घट्ट आठवणीत राहणारी ◆ घटना कोणती? तर मे दिनाची.*

पण ते हरवलेलं असतं, ते केव्हा खाली पडून त्यात तो गाडला जाईल हे त्यालाही सांगता येत नाही. अशा वातावरणात जगणाऱ्या त्याला, तिचे हात 'छत्ररूपी' वाटतात. अहो एवढं सगळं इलेक्ट्रॉनिक्स असूनसुद्धा अजूनही कामगार खाणीत गाडले जातातच! भूगर्भात शिरायचं म्हणजे नवा आऊटलुक हवा, व्यापक संवेदना हवी.

**प्रश्न :** 'पाणी घे-' ही एक तुमची ह्या संग्रहातील वेगळीच कविता आहे. त्याविषयी थोडं बोलाल का?

**उत्तर :** ही वेश्यांच्या वस्तीचं वर्णन करणारी एक कविता आहे. आता 'पाणी घे' हे एक फार मोठं प्रकरण आहे. माझ्या अनेक कवितांमधून आणि 'पाणी घे' मधूनही एक वेगळी बांधणी तुम्हाला दिसेल. मी वेश्यांच्या वस्तीत जाऊन आलोय, त्यांच्यात वावरून आलोय. वेश्यांच्या प्रत्येक खोलीत पाचपंचवीस तरी देव असतात. त्या धंदा सुरू करण्यापूर्वी या पाचपंचवीसांची पूजा करतात आणि मगच देहविक्रय सुरू करतात. मी माझ्या 'नेहरू गेले त्यावेळची गोष्ट' मध्ये काय म्हटलंय? तिथं सुंद्री म्हणते, 'लोबन मत जला', लोबन म्हणजे धूप. 'हे परमेश्वरा, मी हा देहविक्रय करते मला क्षमा करा' ही ह्या सर्व कृतीमागची त्यांची भावना असते... अहो, माणूस किती अंगानं गुंतला आहे. आयुष्यात, किती अंगांनी स्वतःला शुद्ध करून जगण्याचा खोटा प्रयत्न तो करतो पाहा. पण तो जगण्याचाच प्रयत्न करतो. 'चंद्रे पाणी घे लवकर' एक चंद्रा नावाची बाई एका गिऱ्हाईकाला सांभाळतेय, तो बाहेर आला की ती 'पाणी घेते.' हे पाणी घेणे म्हणजे वेश्येने दुसऱ्या गिऱ्हाईकाकरता शुद्ध होणे. वेश्या व्यवसायातील त्यांची ही नैतिक कृती आहे. आता, त्यांना फसवणारेही निघतात; पण त्या तशा गिऱ्हाईकाला हटकतात. 'चल ला पैसे बदमाश, क्या करता है रे धरम' म्हणतात. कारण हा पोटाचा प्रश्न आहे. एक वेश्या दुसरीबद्दल असूयेनं बोलते. दुसरी तिसरीची थट्टा करते. असं हे सगळं वेश्यांचं जग. आपले मर्ढेकर कांदेवाडीपर्यंत जाऊन थांबले. कांदेवाडीच्या

> ◆ *१ मे हा दिवस 'कामगार दिवस' आहे आणि म्हणूनच हुतात्मा चौकात कामगार आणि शेतकरी जोडीने उभे आहेत...* ◆

आत त्यांनी कधी डोकावूनच पाह्यलं नाही आणि त्याबद्दल मी मर्ढेकरांना अजिबात दोषही देणार नाही. पण आहे ही वस्तुस्थिती आहे. त्याच्यात त्यांची मर्यादा आहे. आणि माझ्या कवितेत माझीही मर्यादा आहे.

आता नामदेव ढसाळांच्या कवितेतही वेश्यांचं जग आहे. पण तिथं अनुभवाला कमी वाव आहे. तिथं बोलणं फार येतं. माझ्या कवितेतील वेश्यांची एक 'इंटर्नल स्ट्रगल' महत्त्वाची होते. 'पाणी घे' मध्ये शुद्ध नाही, पण किमान स्वच्छ झाले पाहिजे ही भूमिका आहे, आणि ही भूमिका या वेश्या प्रामाणिकपणे सांभाळताना दिसतात. हा सगळा अनुभव मराठी कवितेत नवा असल्यानेच, बहुधा 'पाणी घे' वर कुणी लिहिलं नसावं.

**प्रश्न :** 'बरं कारे पोरा!' या कवितेत किती पिढ्या येतात?

**उत्तर :** या कवितेत दोनच पिढ्या आहेत. तुम्ही त्याप्रमाणे कवितेच्या अखेरीस येणाऱ्या टिंबामुळे पुढच्या संभाव्य पिढ्यांनाही त्यात गुंतवून घेतले आहे. कारण हा सबंध लढाच चालू आहे. चळवळीचा क्रमही पिढ्यान्‌पिढ्यातून पुढे सरकतो आहे. या पिढ्यान्‌पिढ्यांच्या घट्ट आठवणीत राहणारी घटना कोणती? तर मे दिनाची, आता या घटनेला शिकागोच्या संदर्भातला दुवा आहे. त्या संदर्भाने शिकागोतल्या चळवळीच्या घटनेपासून कामगार चळवळीचा इतिहास सुरू झाला, असा तो भाग आहे. माझ्या कवितेतला कामगार काय सांगतो? ''बाप सांगत होता, ऐकत होतो आम्ही सर्वजण-'' या कवितेतील 'प्रकाशपुरा'लाही एक अर्थ आहे बरं का! तो बाप आपल्या आयुष्यातील एक प्रकाशाची आठवण सांगतो आहे. तो पुढारी झाल्याचेही तो सांगतो. कामगारांच्या मनामध्ये प्रेम वगैरे काहीच नसते. ही गोष्ट तर साफ खोटी आहे. हा कामगारही बायकोवर प्रेम करतो. तिला दारात उभी पाहून मोहरतो. आपले पुढारी होणे ती पाहते आहे याचा आनंदही त्याला आहे. ''वाढत गेलो-महासागर झालो. आकाशाला रूपलो, बरं कारे पोरा, कळसांना खुपलो'' याच भाषेत त्यानं बोलणं मला स्वाभाविक वाटतं.

◆ *तरी 'माझे विद्यापीठ' ही जास्त आवडते. कारण त्यात कथेचा भाग आहे, चिंतनाचा भाग आहे. प्रकटीकरणात ती जास्त उजवी आहे.* ◆

**प्रश्न :** तुमच्या डोळ्यासमोर एखादा विशिष्ट मे दिन होता काय?

**उत्तर :** या संदर्भात मी तुम्हाला एक गोष्ट सांगतो. आपल्याकडे महाराष्ट्र दिन साजरा होतो, १ मे रोजी. त्याचं कारण काय? तर संयुक्त महाराष्ट्र मिळवला. १ तारखेला खरं तर त्याच्या पाठीमागची मूळ भूमिका काय? या चळवळीच्या लढ्यामध्ये कॉ. डांगे, एस. एम. जोशी आणि अत्रे हे नेते होते. त्यांनी संयुक्त महाराष्ट्र मागितला तो १ मे ला. कारण हा दिवस 'कामगार दिवस' आहे आणि म्हणूनच हुतात्मा चौकात कामगार आणि शेतकरी जोडीने उभे आहेत...काँग्रेस सरकारने हा कामगार दिन सोडून दिला आणि त्याचा महाराष्ट्र दिन केला. १ मे हा 'इंटरनॅशनल डे' आहे. आपले राज्यकर्ते त्यांना सोयीस्कर वाटेल ते घेतात. सुट्टी देतात तीसुद्धा लाजेकाजेस्तव. कवितेतल्या कामगाराचा ऊर मे दिनाच्या आठवणीने भरून येणारच! आणि या आठवणी तो मुलांना, शेजाऱ्यांना सांगणार, कारण त्याला परिवर्तनवादी दृष्टिकोन पुढे न्यायचा आहे. असं काही आपल्या मुलाला सांगणारा बाप मराठी कवितेत आहेच कुठे? याला मी 'इंटरनॅशनल लिंक' म्हणतो. माझ्या कामगाराच्या मनात कामगाराचे राज्य झाले नाही याची व्यथा तर आहेच आहे.

**प्रश्न :** 'धीर' ह्या कवितेतील 'थांब! अजून पहाट झाली नाही, दिवे मालवून कसे चालेल?' ह्या ओळींतील 'पहाट' आणि 'दिवे मालविणे' हा संदर्भ पुरेसा स्पष्ट होत नाही असं काही जणांचं म्हणणं आहे.

**उत्तर :** बाहेर पहाट होऊनही घरात दिवे जळत असतात हा आपला नेहमीचा अनुभव. दुसरी गोष्ट म्हणजे बोलणे चालू आहे आणि पहाट झाली तरी थांबण्याची गरज नाही हा यातला दुसरा भाग. हे दिवे मालवून चालणार नाही. हे दिवे कवितेतील त्याच्या, तिच्या मनातील दिवे आहेत. तो कार्य करणारा आहे आणि त्याने कार्य करताना थांबणं तिला मान्य नाही. त्याला सर्व पाठबळ द्यायला ती तयार आहे. कवितेतल्या तिच्या बोलण्यातून हे सगळं स्पष्ट होत आहे. 'धूसर धुक्यातील जगात.

हातात हात घेतले आपण' असे ती जेव्हा म्हणते तेव्हा ज्या जगाला नवी मानवी कल्पना, नव्या जगाचे विचार अस्पष्ट आहेत अशा जगात आपण हातात हात घेतले असं तिला म्हणायचं आहे. ती मोठ्या धीराची आहे. ती कोणते शब्द उच्चारते ते बघा. गलबत, किनारा, ओझी आणि त्याचे दुःख हे सगळं एकसंध होऊन या कवितेत आलं आहेत. धीर हा विश्वासाचा असतो. प्रगतीचा असतो. पुढे पडणाऱ्या पावलासाठी असतो आणि तशीच तिची भूमिका मला या कवितेत दिसते. माझ्या या कवितेवर कुणीतरी लिहायला हवं. माझ्या 'बेतून दिलेले आयुष्य' या कवितेबद्दल बोलू का?

हे 'बेतून दिलेले आयुष्य' लादलेलं आयुष्य आहे आणि ते तुम्ही स्वीकारा असा घोषही त्यामागे आहे. मी बेतलेलं, बेतलेला असं म्हणता म्हणता 'थूः' पर्यंत येतो. या तुच्छतापूर्ण उद्‌गाराबद्दल मी स्वतःच 'माणूस कलावंत आणि समाज' या पुस्तकात लिहिलंय. एक हंगेरियन कवी हे 'थूः' तुम्ही कसं उच्चारता असं मला विचारीत होता. या 'थूः'च्या द्वारे सबंध जगावर थुंकून तुम्ही कसे मोकळे होता असे विचारत होता आणि यालाच डायलेक्टिक्स म्हणतात. असाही त्याचा अभिप्राय होता. इतकंच नव्हे तर त्या 'थूः'चं भाषांतर करता येत नाही म्हणाला.

**प्रश्न :** तुमची आवडती कविता कोणती?

**उत्तर :** हे सांगणं जरा अवघड आहे महाराज, तरी 'माझे विद्यापीठ' ही जास्त आवडते. कारण त्यात कथेचा भाग आहे, चिंतनाचा भाग आहे. प्रकटीकरणात ती जास्त उजवी आहे. भाषेचं वैभव म्हणाल तर सरळ, साध्या, सोप्या शब्दात ही कविता बोलते. तळागाळातला माणूस ह्या 'विद्यापीठा'त आलाय. एकूणच कवितेच्या जगात किंवा 'सारस्वतां'च्या विद्यापीठात म्हणा, मला मार्क्स चांगले मिळाले. गेल्या तीस वर्षांत पाच-सहा पुस्तके. तीही हयात असताना आली म्हणजे फारच झालं, नाही का? केशवसुतांपेक्षाही हे माझं भाग्य मोठं. त्यांचा कवितासंग्रह मरणोत्तर आला आणि त्यानंतर अवघ्या महाराष्ट्राला कळलं की, 'केशवसुत मोठा कवी होता.' महाराष्ट्राच्या प्रबोधनाची चेष्टा करावी असाच की हो हा भाग आहे! त्यांच्या तुलनेत मला खूपच मिळालं; अर्थात त्यामुळेच अगदी जोखीम वाटते, दादल्यासारखं वाटतं.

◆ ***शेतकरी, अधिकारी, कामगार, मध्यमवर्ग, प्राध्यापक अशा सर्व थरांत माझ्या कवितेला प्रतिसाद असतो. मी 'कविता' घेऊन आलो. मत घेऊन नव्हे; हा मोठा फरक आहे.*** ◆

**प्रश्न :** श्रमिक वर्गातल्या माणसाची तुमच्या कवितेबद्दल कोणती प्रतिक्रिया तुम्हाला जाणवते?

**उत्तर :** ह्या वर्गाची प्रतिक्रिया फारच चांगली आहे. मी महाराष्ट्रभर फिरत असतो. खेड्यांमध्ये, शेतकऱ्यांमध्ये, कामगारांमध्ये जाऊन, कविता वाचतो. एकदा शिवडीतल्या कामगारांसमोर कविता वाचली. मोठा प्रतिसाद मिळाला. दुसऱ्या दिवशी सकाळीच तिथला एक कामगार घरी आला म्हणाला, ''साहेब कालच्या कविता ग्वाड वाटल्या'' ह्या साध्या माणसाला घरी येऊन प्रतिक्रिया द्यावीशी वाटली हे माझ्या कवितेचं यश आहे, असं मी म्हणतो. शेतकरी, अधिकारी, कामगार, मध्यमवर्ग, प्राध्यापक अशा सर्व थरांत माझ्या कवितेला प्रतिसाद असतो. माझ्या कवितेसारखा प्रतिसाद इव्हन दलित कवितेला मिळालेला नाही. सुधीर बेडेकरसारख्यांनी तर माझ्यावर लिहिलंच पण मुख्य गोष्ट म्हणजे, समाजाचा साठोत्तरी कालखंड आणि माझी कविता याच्यात एक सांधा जुळत गेला आहे हे तुमच्या लक्षात येईल. ह्या सर्व काळात लेखक बदलला, वाचक बदलला, साहित्याचा प्रवाह बदलला आणि चळवळीही बदलल्या. ह्या सर्वांबरोबर मी आपला वावरतोय. एक अधिक मुद्दा म्हणजे मी 'कविता' घेऊन आलो. मत घेऊन नव्हे; हा मोठा फरक आहे. अहो, अनुभव आणि मत यात मोठा फरक असतो. मतं ही घडवलेली असतात तर अनुभव एका वेगळ्या प्रकारे घडत असतो. एखाद्या 'महापुरुषा'ला आपल्या 'जाती' पुरता बांधून ठेवणं हेच आजच्या काही लोकांचं भांडवल आहे. माझं थिंकिंग अशा पातळीचं नाही. काही लोकांना चिंचेएवढंच जगणं पुरेसं होतं. मला सुपाएवढं होऊन जगायचं आहे. आयुष्याकडे बघणं, त्यातल्या दुःखावर बोलणं, कविता लिहिणं हे सर्व मी समाजकारण मानतो. दुःखावर हजारो वर्षे लोक लिहीत आहेत. परंतु अजूनही ह्या दुःखाच्या छटा काही संपत नाहीत आणि अशा वेळी तुम्ही माणसाला

जातीत वाटायला लागलात तर तुम्ही मरणारच की हो! आता तर लोक 'देशीवादा'वर बोलू लागलेत आणि हे वाईट, ते चांगलं, हे आपलं, ते परक्याचं असं म्हणत स्वतःचं एक वेगळं सोफिस्टेकेटड म्हणणं मांडताहेत. मांडोत. आपण आपल्या मार्गाने जावं हे उत्तम.

ही मंडळी समीक्षाही करतात. एकूणच आपल्याकडच्या समीक्षेचा गोंधळ लक्षात येण्यासाठी तुम्हाला एक मेंढपाळाची गोष्ट सांगतो. एक मेंढपाळ एका सकाळी उठला आणि मेंढ्या चरायला घेऊन गेला डोंगरावर. अनेक वर्षं मेंढ्या चरवत असल्यामुळे त्या मेंढ्यांची भाषा त्याला कळत असे. त्या मेंढ्यांचं लागट बोलणंही त्याला कळे. तर त्या दिवशी पाचपंचवीस मेंढ्या घेऊन निघाला. मेंढ्यांमध्ये आणि माणसांमध्ये एक पद्धत असते, की वृद्ध एका बाजूला, मध्यम वयाची एका बाजूला आणि अगदी अल्लड वयातील तिसऱ्या बाजूला. तर असा तो म्हाताऱ्या मेंढ्या चरवत चालला असताना म्हाताऱ्या मेंढ्याकडे पाहून मध्यम वयाच्या मेंढ्या काय म्हणाल्या, 'काय मेल्या चालल्यात, अगदीच नागड्या की हो! ह्यांना काही लाजबिजा आहे की नाही?' आता ह्या मध्यमवयीन मेंढ्यांच्या मागे तरण्या मेंढ्या चालल्या होत्या, त्या म्हणाल्या, 'ह्यासुद्धा नागड्याच की ह्या कशाला हसतात त्यांना?' त्यांच्याही मागे अल्लड वयाच्या मेंढ्या चालल्या होत्या, त्या म्हणाल्या, 'ह्या सुद्धा निलाजऱ्या नागड्याच की! ह्या कशाला दात काढताहेत?' ह्या सर्वांच्या मागे मेंढपाळ चालला होता. तो मनाशी म्हणाला, 'ह्या तरी इतरांना का हसताहेत? ह्या कुठे आहेत पेहराव करून? ह्याही नागड्याच की!' तर असंच आहे आपल्या मराठी समीक्षकाचं! एकानं दुसऱ्याला नागडं म्हणायचं असाच हा क्रम पिढी-पिढीतून चाललाय आणि त्यांच्यापैकी कुणीच समतोल विचारांनी पुढे जाण्याचा प्रयत्नही करताना दिसत नाही. दिलीप चित्रेंनी सांगायचं हे नागडे. अरुण म्हात्रेने सांगायचं हेच नागडे, आणखी कुणी तरी म्हणायचं ते नागडे. ह्या सर्व प्रवृत्तीमुळे साहित्याचा किंवा समीक्षेचाही विकास होत नाही. फक्त तुच्छता आणि नावड तेवढी वाढते.

**प्रश्न :** तुमच्या कवितेवर आजवर जी समीक्षा झालेली आहे त्यावर तुमची प्रतिक्रिया काय? त्यात समतोल विचार आणि न्याय आहे असं तुम्हाला वाटतं का?

◆ *मी स्वतः कसलेच वर्ग मानत नाही. जिथं जिथं दुःख आहे, माणूस आहे त्याला मी माझा मानतो.* ◆

**उत्तर :** आजवर माझ्या कवितेवर ज्यांनी लिहिलं, त्यात सुधीर बेडेकर यांनी आणि कुरुंदकरांनी जे ॲनॅलिसिस केलं आहे ते अप्रतिम आहे. अजून दोघातिघांनी त्यांच्या परीनं न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. बाकी आम्हाला धोपटतायत. धोपटू द्यात! हे धोपटणं असंच चालू राहणार. एक कवी येतो, त्याची कविता येते, त्यातून त्याचा खास आशय येतो, या गोष्टीकडे समोरच्या माणसांनी मनात काही न ठेवता बघितलं पाहिजे, अशी माफक अपेक्षा. या कवीची भाषा अशी का? अमुक एक प्रकारचा आशयच त्याच्या कवितेत का येतो? त्याच्या भाषेचं वळण असंच का, हे तपासायला नको? आता माझ्या कवितेचं भाषिक वळण आणि त्यातला अनुभव अख्ख्या मराठी कवितेपेक्षा वेगळा आहे, असं आपलं मला वाटतं. या वेगळ्या कवितेकडे समीक्षकांनी समतोल वृत्तीनं पाहिलं पाहिजे. मागे मला एका मुलाखतीत असा प्रश्न करण्यात आला की, ''केशवसुत-मर्ढेकर-सुर्वे अशी जर साखळी मानली तर त्यावर तुमचं काय म्हणणं आहे?'' मी त्यांना म्हटलं, ''अशी तुलना करणं बरोबर नाही.'' आता तुम्हाला सांगतो, केशवसुत आणि मर्ढेकर म्हटल्यावर, त्यानंतर येणाऱ्या नारायण सुर्वेचं काही म्हणणं आहे ते सगळं मेलं की हो! म्हणजे हे उमलणाऱ्या माणसाला झाकून टाकायचं. मला हे मान्य नाही. नारायण सुर्वे हा नारायण सुर्वेच राहणार. बरं, केशवसुत, मर्ढेकर आणि सुर्वे यांचे कालखंड तरी सारखे आहेत का? केशवसुतांच्या काळात फक्त दोन टक्के लोकच शिक्षित होते. आताही तेच प्रमाण उतरलंय असं तुम्ही म्हणणार का? मधल्या काळात सगळे ऐतिहासिक संदर्भ बदललेले आहेत. ज्या महाराष्ट्राला आपल्यात एक मोठा कवी होऊन गेला हे त्याच्या मरणानंतर कळलं, त्याबद्दल काय बोलणार? हीच जर महाराष्ट्राची सांस्कृतिक मानसिकता असेल तर मराठी साहित्याचीही संस्कृती वगैरे सारख्या गोष्टी सांगता कशाला? मर्ढेकर हे तर त्यानंतर ७० वर्षांनी आले. तोपर्यंत आणखी बरंचसं पाणी वाहून गेलं होतं. १८८४ मध्ये पहिली गिरणी निघाली आणि ८९ साली केशवसुतांनी या मजुरावर कविता

लिहिली. मर्ढेकर सुरुवातीला माधव ज्यूलियनांच्या छायेत वावरले. मग युरोपात गेले, नंतर कविता लिहिल्या आणि तोपर्यंत दोन युद्धे जमा झाली होती. जगभराच्या दुःखावर मर्ढेकर लिहीत होते. इकडे बंगालमध्ये दुष्काळ पडला. हा दुष्काळ मर्ढेकरांच्या कवितेत आला नाही. यातले मर्ढेकरांनी काय घेतले? तरी सुर्वे मर्ढेकरांच्या नंतर! एका बाजूला मर्ढेकर आणि दुसऱ्या पारड्यात आजचं सर्व साहित्य असं कधी तोलाल की नाही? मी तर म्हणतो या समीक्षेचीच समीक्षा व्हायला पाहिजे. प्रस्थापित समीक्षेतला चाललेला वात्रटपणा तपासला पाहिजे. पण असं असलं तरी मी केशवसुत ते सुर्वे अशी लिंक वगैरे मानणं आणि अमक्याला तमक्याचा वंशज म्हणणं हे मला आश्चर्यकारक वाटतं. असे वंशज ठरवताना मधला वाहून गेलेला काळ आणि साहित्यात आलेले नवे प्रवाह हे तथाकथित समीक्षक लक्षात घेत नाहीत. सुर्वेने मर्ढेकरांवर कविता लिहिली म्हणून त्याला मर्ढेकरांचा वंशज म्हणणारे समीक्षक माझ्या मते 'संपलेले समीक्षक' आहेत. मर्ढेकरांनी 'गिरणोदय' झाला एवढंच म्हटलं. गिरणीत कधी काही ते गेले नव्हते. अहो मी म्हणतो या गिरणोदयाबरोबर गिरणीतल्या माणसाचाही उदय झाला हे तुम्ही ध्यानात घेणार आहात की नाही? या सर्वांपेक्षा सच्चे आणि एकवचनी निघाले ते फक्त विंदा करंदीकर. आम्ही कामगारविषयी बोलायला लागलो की, हे म्हणणार यांना मध्यमवर्गाचा 'नॉशिया' आहे. असा नॉशिया माझ्या कवितेत कुठे आहे तो दाखवा? मी स्वतः कसलेच वर्ग मानत नाही. जिथं जिथं दुःख आहे, माणूस आहे त्याला मी माझा मानतो, असो.

❖❖❖

# संदर्भ सूची :

**लेखाचे संदर्भः**

सुर्वे, कृष्णाबाई (२०१८) : मास्तरांची सावली, डिम्पल प्रकाशन, वसई

कृष्णन, शेखर (२०१८) : मुंबईत साकारतेय वस्त्रोद्योग संग्रहालय, रविवार लोकसत्ता, ११ नोव्हेंबर, पृष्ठ. ७

पाध्ये, दिगंबर (२०११) : सुर्वेः नारायण सुर्वे यांची समग्र कविता, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

सुर्वे, नारायण (२०१०) : कहाणी कवितेची, डिम्पल प्रकाशन, वसई

सुर्वे, नारायण (१९९५); लोककवी सुर्वे (आत्मकथा), शलाका प्रकाशन, मुंबई

सुर्वे, नारायण (१९९२) : माणूस, कलावंत आणि समाज, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

https://en.wikipedia.org

https://pad.ma/YM/player/00:00:00

**चर्चा**

* आत्मसिद्ध, नंदिनी, ‘नव्या साहित्य संमेलन अध्यक्षांचा जाहीरनामा’ साप्ताहिक, सकाळ, १९ नोव्हेंबर १९९४
* कदम संभाजी, ‘नारायण सुर्वेंच्या कवितेविषयी काही विचार’, सत्यकथा, एप्रिल १९६७
* चित्रे दि. पु., ‘माझे विद्यापीठ’, सहा मुद्यांसंबंधी, आलोचना, सप्टेंबर १९६७
* जोग वि. स., सत्यकथा, ऑगस्ट १९७८
* भावे नीलिमा, सत्यकथा, १९७८
* राजवाडे अशोक, ‘नारायण सुर्वे यांची कविता’ सत्यकथा मे १९७४च्या विलास सारंगांच्या लेखाच्या संदर्भात सत्यकथा, ऑगस्ट १९७४
* सोमण, सुभाष, ‘माझे विद्यापीठ’च्या परीक्षणाच्या संदर्भात सहा मुद्दे, आलोचना, जुलै १९६७

### ग्रंथ

* ‘निवडक नारायण सुर्वे’ - कुसुमाग्रज, लोकवाङ्मय गृह, मुंबई, १९९९
* तायडे, मनोज, नारायण सुर्वे यांची कविता आणि काव्यदृष्टी, सुगावा प्रकाशन, पुणे २००५
* देसाई, बाळ (संपादक), लोककवी नारायण सुर्वे, शलाका प्रकाशन, मुंबई १९९५
* पाध्ये दिगंबर, नारायण सुर्वे यांची कविता, लोकवाङ्मय गृह, मुंबई १९८२
* भोसले, एस. एस., सूर्ययुगाची सुरुवात, अभिनय प्रकाशन, १९७७
* राजापुरे, पुष्पा (संपादक), सुर्वे यांचे विद्यापीठ, संदर्भ प्रकाशन, ठाणे, १९९३
* शिरवाडकर, वसंत, सर्व सुर्वे, डिंपल पब्लिकेशन, ठाणे १९८५
* सबनीस, श्रीपाल, सुर्वेंच्या कवितेची इहवादी समीक्षा, मधुराज पब्लिकेशन, पुणे, १९९५

### प्रबंध लेखन

* चौधरी मधुकर, ‘कवी श्री. नारायण सुर्वे यांच्या काव्याचा चिकित्सक अभ्यासक’, विक्रम विश्वविद्यालय (मध्य प्रदेश)
* शिंदे फ. मुं. ‘नारायण सुर्वेंची कविता : आशय आणि अभिव्यक्ती’ मराठवाडा विद्यापीठ
* तायडे, मनोज, ‘नारायण सुर्वे यांची कविता आणि काव्यदृष्टी’ अमरावती विद्यापीठ.

### सुर्वे यांच्यावर चित्रपटनिर्मिती

* ‘नारायण गंगाराम सुर्वे’ - दिग्दर्शन : अरुण खोपकर, खयाल, खयाल ट्रस्ट
* ‘साचा’ - दिग्दर्शक : अंजली मॉंटेरो व डॉ. के. पी. जयशंकर, टाटा समाज विज्ञान संस्था
* लघुचित्रपट - दिग्दर्शक दिलीप चित्रे, साहित्य अकादमी
* लघुचित्रपट - दिग्दर्शक : माधवी वैद्य
* लघुचित्रपट - यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ


❖❖❖

## नारायण गंगाराम सुर्वे : संक्षिप्त माहिती

**नाव** : नारायण गंगाराम सुर्वे
**जन्म** : २५ ऑक्टोबर, १९२६
**मृत्यू** : २०१०
**पालक** : गंगाराम सुर्वे, काशीबाई सुर्वे
**शिक्षण** : इयत्ता सातवी
**पत्नी** : कृष्णाबाई सुर्वे
**व्यवसाय** : मुंबई महानगरपालिकेच्या शाळेत प्रथम शिपाई आणि नंतर प्राथमिक शिक्षक

**काव्यसंग्रह :**

- 'ऐसा गा मी ब्रह्म' (१९६२) अभिनव प्रकाशन, मुंबई
- 'माझे विद्यापीठ' (१९६६) पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
- 'जाहीरनामा' (१९७५) पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
- 'नव्या माणसाचे आगमन' (१९९५) पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
- 'नारायण सुर्वे यांच्या गवसलेल्या कविता' (१९९५) संपादक - विजय तापस, संदर्भ प्रकाशन, ठाणे

**संकलने :**

- 'सनद' निवडक कविता (१९८२) पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
- 'निवडक नारायण सुर्वे' (११९४) संपादक - वि. वा. शिरवाडकर, लोकवाङ्मय गृह, मुंबई
- 'सुर्वे : नारायण सुर्वे यांच्या समग्र कविता' (२०११) पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

**संपादने :**

- 'कॉम्रेड डांगेः भारतीय राजकारणातील वादळ' (१९८८) शलाका प्रकाशन, मुंबई
- 'चळवळीची गाणी' (१९९१) लोकवाङ्मय गृह, मुंबई
- 'दलित काव्यदर्शन' (१९९२) लोकवाङ्मय गृह, मुंबई
- 'कविता श्रमाची' (१९९३) महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, मुंबई

**अनुवाद :**

- 'तीन गुंड आणि सात कथा' (१९६४) मूळ उर्दू कथा - कृष्णचंद्र, पीपल्स पब्लिशिंग हाऊस, मुंबई

- ‘दादर पुलाखालची मुले’ (१९७५) मूळ उर्दू कादंबरी - कृष्णचंद्र, वरदा बुक्स, पुणे
- ‘ब्रेख्तची कविता’ (१९९८) वसंत आबाजी डहाके आणि सतीश काळसेकर यांच्यासह, लोकवाङ्मय गृह, मुंबई

**निबंध :**

- ‘माणूस, कलावंत आणि समाज’ (१९९२) पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
- ‘कहाणी कवितेची’ (२०१०) डिम्पल प्रकाशन, वसई

**इतर भाषांमध्ये अनुवादित झालेले संग्रह :**

- ‘ऑन द पेव्हमेंट्स ऑफ लाईफ’ इंग्रजी (१९७३) अनुवाद - कृष्णा चौधरी आणि पी. एस. नेरुरकर, लोकवाङ्मय गृह, मुंबई
- ‘मेरा विद्यापीठ’ हिंदी (१९८३) अनुवाद - मनोज सोनकर, प्रकाशन संस्थान, मुंबई
- ‘नारायण सुर्वेंची कविता’ गुजराथी (१९७८) अनुवाद - वसंत जोशी, गंगोत्री ट्रस्ट, अहमदाबाद
- ‘मेरी दरस्गह’ उर्दू अनुवाद - राफिया शबनम अबिदी
- ‘नारायण सुर्वे निवडक कविता’ कन्नड अनुवाद - एल. आर. पंडित, साहित्य अकादमी, बेंगळुरू

**माहितीपट :**

- ‘नारायण सुर्वे : अ पोएट ऑफ द प्रोलेटॅरिएट’ (२०००) दिग्दर्शक दिलीप चित्रे, साहित्य अकादमी
- ‘नारायण गंगाराम सुर्वे’ (२००३) दिग्दर्शक अरुण खोपकर, खयाल ट्रस्ट.
- ‘साचा’ (द लूम) दि. अंजली मॉन्टेरो आणि के. पी. जयसंकर, सेंटर फॉर मीडिया अँड कल्चर स्टडीज, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई
- ‘ऐसा गा मी ब्रह्म’ (१९८९) दिग्दर्शक माधवी वैद्य, ‘कवी शब्दांचे ईश्वर’ मालिका, मुंबई दूरदर्शन.


**-: सौजन्य आणि आभार :-**

१) नारायण सुर्वे यांच्या समग्र कविता, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

२) सुर्वे यांचे विद्यापीठ, संपा. पुष्पा राजापुरे, प्रकाशक - प्रदीप कर्णिक, संदर्भ प्रकाशन, ठाणे.


❖❖❖